# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## // महासभा बैठकीचे कार्यवृत्त // (ऑनलाईन अपद्वारे)

**सभा क्रं. - ३५** **दि.१४/०२/२०२२**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.१४/०२/२०२२ सोमवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक:कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/न.वि-१४ दि.०३ जानेवारी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे) मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी ऑनलाईन पध्दतीने खालील मा.सदस्य महासभेस उपस्थित होते.

**मा. सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | पाटील सचिन भिमराव | ढेकळे सदाशिव गणपत |
| जोहरे प्रिया मधुकर | चौधरी मनोज सुरेश | पाटील राजेंद्र झिपरु |
| नेरकर सरिता अनंत | भोईटे लताबाई रणजीत | महाजन सुनिल सुपडु |
| पोकळे दिलीप बबनराव | पाटील प्रतिभा सुधीर | शेख शबानाबी सादीक |
| खान रूकसानाबी गबलु | पाटील चंद्रशेखर शिवाजी | नाईक प्रशांत सुरेश |
| सोनवणे कांचन विकास | कापसे मयुर चंद्रकांत | अत्तरदे रजनी प्रकाश |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | कापसे प्रतिभा चंद्रकांत | काळे रेश्मा कुंदन |
| शिंदे गायत्री उत्तम | देशमुख प्रतिभा गजानन | आहुजा मनोज नारायणदास |
| बाविस्कर किशोर रमेश | पाटील विजय पुंडलिक | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| सपकाळे मिना धुडकु | सोनवणे सुरेश माणिक | सोनार रंजना विजय |
| कोळी दत्तात्रय देवराम | बारी शोभा दिनकर | खडके सुनिल वामनराव |
| सपकाळे रंजना भरत | शेख हसीनाबी शरिफ | खडके विश्वनाथ सुरेश |
| कोल्हे प्रविण रामदास | भिल पार्वताबाई दामु | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| सनकत चेतन गणेश | पाटील उषा संतोष | देशमुख सुन्नाबी राजु |
| सोनवणे भारती कैलास | कोल्हे सिंधु विजय | शेख सैईदा युसूफ |
| चौधरी चेतना किशोर | कोल्हे ललीत विजय | पटेल इब्राहिम मुसा |
| सोनवणे राखी शामकांत | बरडे नितीन मनोहर | निता मंगलसिंग सोनवणे |
| तायडे ज्योती शरद | बेंडाळे उज्वला मोहन | सोनवणे विक्रम किसन |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | राणे गायत्री इंद्रजित | भापसे जिजाबाई अण्णासाहेब |
| काळे अमित पांडुरंग | जोशी अनंत हरिश्चंद्र | **स्विकृत सदस्य** |
| चौधरी मंगला संजय | तायडे सुरेखा नितीन | कैलास नारायण सोनवणे |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | चव्हाण ज्योती बाळासाहेब | विशाल राधेशाम त्रिपाठी |
| सोनवणे धीरज मुरलीधर | मराठे जितेंद्र भगवान | राजेंद्र नारायण मराठे |
| भोळे सिमा सुरेश | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | महेश रतन चौधरी |
| काळे दिपमाला मनोज | पाटील रेखा चुडामण | |
| सोनवणे अश्विन शांताराम | सोनवणे सुरेखा सुदाम | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतीश कुलकर्णी, मा.अतिरिक्त आयुक्त, डॉ.सौ.विद्या गायकवाड, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त श्री.शाम गोसावी, उपायुक्त श्री.प्रशांत पाटील, नगरररचनाकार श्री.अशोक करवंदे व मुख्यलेखाधिकारी श्री.कपील पवार तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.

**नगरसचिव :-** आजच्या ऑनलाईन महासभेत सर्व सन्मा.सदस्यांचे स्वागत आहे. सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करण्यात येते की सर्वांनी वंदे मातरमसाठी उभे राहायचे आहे.

**वंदे मातरमने सभेस सुरूवात करण्यात आली.**

**(नगरसचिव यांनी श्रध्दांजलीच्या प्रस्तावांना वाचायला सुरुवात केली.)**

**नगरसचिव :-** सर्व सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी दोन मिनीट श्रध्दांजलीसाठी उभे राहायचे आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.७३३ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | महाजन जयश्री सुनिल,<br>मा.महापौर | स्वरसम्राज्ञी स्व.लतादीदी मंगेशकर तसेच तिन वर्षापुर्वी पुलवामा येथे दहशतवादयांच्या भ्याड हल्ल्यामध्ये शहीद झालेले भारतीय जवान यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| २. | भोळे सिमा सुरेश | १) श्री.पांडुरंग सोमा भोळे यांचे वडील स्व.सोमा दोधू भोळे २) श्री.संजय पाटील यांचे वडील स्व.भास्कर राजाराम पाटील ३) जिल्हा परिषद माजी शिक्षण सभापती श्री.पोपट एकनाथ भोळे यांच्या आई स्व.शकुंतलाबाई एकनाथ भोळे ४) श्री.विक्रम रघुनाथ नेमाडे यांचे वडील स्व.रघुनाथ सोमा नेमाडे ५) श्री.पंढरीनाथ जगन्नाथ काळे यांच्या आई स्व.कमलबाई जगन्नाथ काळे ६) जनता बँकेचे माजी चेअरमन श्री.संजय चंपालाल बिर्ला यांचे वडील स्व.चंपालाल छगनलाल बिर्ला यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ३. | भंगाळे विष्णू रामदास | १) गाण संम्राज्ञी भारतरत्न कै.लतादीदी मंगेशकर २) शिवसेना महानगर प्रमुख श्री.शरद तायडे यांच्या आई व नगरसेविका सौ.ज्योती तायडे यांच्या सासू कै.पार्वताबाई श्यामराव तायडे ३)श्री.किरण पाटील यांचे वडील ग.स.सोसायटीचे माजी अध्यक्ष सहकार महर्षी कै.बी.बी.पाटील (सहकार गट) ४) श्री.आनंद व रविंद्र रेणापूरकर यांचे वडील जेष्ठ पत्रकार, जिल्हा पत्रकार संघाचे विश्वस्त साप्ताहिक मधुविचार चे संपादक स्व.वैजनाथ स्वामी रेणापूरकर ५) प्राचार्य श्री.नितीन पाटील व डॉ.जयश्री पाटील यांचे वडील निवृत्त प्राचार्य कै.विनायकराव त्र्यंबक पाटील ६) श्री.संजय, राजेश व किरण पाटील यांच्या आई कै.नलिनी हरी पाटील ७) कै.पुंडलिक अर्जुन बडगुजर उ.म.वि.चे माजी संचालक व शहादा कॉलेज प्राचार्य डॉ.शांताराम बडगुजर यांचे वडील ८) श्री.इंद्रराव शामराव पाटील योग सेंटरचे संचालक यांच्या पत्नी कै.शैलजा इंद्रराज पाटील यांचे दु:खद निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**नगरसचिव :-** तद्नंतर अभिनंदनाचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. यानंतर मी महापौर महोदया यांना विनंती करतो की, त्यांनी अभिनंदनाबाबत बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** या ठिकाणी प्राप्त झालेले अभिनंदनाचे प्रस्ताव महाराष्ट्र राज्याचे मा.ना.श्री. गुलाबरावजी पाटील साहेब, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा पालकमंत्री जळगांव जिल्हा यांनी आजपावेतो जळगांव शहर महापालिकेस यांनी विविध शिर्षाखाली निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्याद्वारे आज रोजी जळगांव शहरामध्ये विविध ठिकाणी विकास कामे

ही कार्यपथावर सुरु आहे. तसेच त्यांनी जिल्हा नियोजन समिती अंतर्गत १० कोटी ठक्कर बाप्पा योजनेअंतर्गत १० कोटी व दलितेत्तर वस्ती सुधार योजने अंतर्गत १५ कोटी निधी देखील जळगांव मनपास उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिलेले आहे. त्यासाठी मा.ना.श्री.गुलाबरावजी पाटील साहेब यांनी जळगांव शहर महापालिकेस वेळोवेळी विकास कामांसाठी पुरेपुर निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. तसेच भविष्यात देखील त्यांनी जळगांव मनपास त्यांचे सहकार्य लाभणार आहे हे निश्‍चितच आहे. करीता जळगांव शहर महानगरपालिकेतर्फे आभार व्यक्त करण्यासाठी आणि जळगांव वासीयांचे आणि सर्व नगरसेवकांचे याबाबत अभिनंदन या महासभेच्या पटलावर घेण्यात येत आहे. त्याचप्रमाणे आपल्या महापालिकेतील नगरसेविका आणि माजी सभापती, ॲड.सौ.शुचिताताई हाडा यांना सौ.दिपमाला मनोज काळे यांच्याकडुन त्याचप्रमाणे सर्व सन्मा.नगरसेवक, महापौर आणि आपल्या महापालिकेतील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सर्वांतर्फे त्यांना लोकमत वुमन अचिव अवार्ड -२०२१ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले याबद्दल त्यांचा अभिनंदन करण्याचा प्रस्ताव या ठिकाणी मांडत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आदरणीय महापौरताईंनी मांडलेल्या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** त्याचप्रकारे सन्मा.आयुक्त साहेब, अतिरिक्त आयुक्त मॅडम, सर्व विभागांचे उपायुक्त, अधिकारी, कर्मचारी, सर्व सन्मा.नगरसेवक, नगरसविका तसेच पत्रकार बंधुंनो नमस्कार, स्वातंत्र्यपुर्व काळापासुन आजपर्यंत देशभरात अनेक महिलांनी विविध क्षेत्रांत अभुतपुर्व अशा स्वकर्तृत्वातुन अविस्मरणीय कामगिरी बजावत देशाचे नाव उंचावले आहे. त्यात नामोल्लेख करायचा झाल्यास अगदी राजमाता जिजाऊंपासुन झाशीची राणी लक्ष्मीबाई, माजी राष्ट्रपती सौ.प्रतिभाताई पाटील, खान्देशकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी, स्वरकोकिळा स्व.लतादीदी मंगेशकर अशी कितीतरी नावे आपल्याला सांगता येतील. आज अशाच जळगांव शहराचे नव्हे, तर संपुर्ण जिल्हयासाठी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर गौरवपर, भुषणावह आणि अभिमानास्पद बाब ठरलेल्या जळगांवातील नुतन मराठा महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु.सोनाली विकास पाटील (रा.रामेश्वर कॉलनी, मेहरुण, जळगांव) मुळजी जेठा महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु.मोक्षदा चौधरी (रा.ज्ञानदेवनगर, कालिंकामाता चौकाजवळ, जळगांव) तसेच चि.शिवांगी प्रसाद काळे (रा.कोल्हेनगर, जळगांव) या तिघांनी जळगांवच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या पार्श्वभुमीवर आज समस्त जळगांवकरांच्या वतीने जळगांव शहर महानगरपालिकेतर्फे या तिघांना यथोचितपणे सन्मानपत्र देऊन आपण गौरविणार आहोत.

१) कु.सोनाली पाटील हीने २६ जानेवारी २०२२ रोजी नवी दिल्लीत प्रजाकसत्ताक दिन पथसंचलन २०२२ अंतर्गत 'आजादी का अमृत महोत्सव' चा एक भाग म्हणुन राजपथावर भारताचे लष्करी सामर्थ्य आणि सांस्कृतिक वैविध्य दाखविले गेले. यात राष्ट्रीय छात्रसेनेची सीनिअर अंडर ऑफिसर म्हणुन महाराष्ट्रातील मुलींचे प्रतिनिधीत्व करीत पंतप्रधानांना गार्ड ऑफ ऑनरमध्ये गार्ड कमांडर म्हणुन मानवंदना दिली. त्यामुळे तिला संरक्षण मंत्रालयातर्फे प्रथम गार्ड कमांडर म्हणुन सन्मानित करण्यात आले.

२) कु.मोक्षदा चौधरी हीने सुध्दा २६ जानेवारी २०२२ रोजी नवी दिल्लीत प्रजासत्ताक दिन पथसंचलन २०२२ अंतर्गत 'आजादी का अमृत महोत्सव' चा एक भाग म्हणुन राजपथावर भारताचे लष्करी सामर्थ्य आणि सांस्कृतिक वैविध्य दाखविले गेले. यात राष्ट्रीय छात्रसेनेतर्फे महाराष्ट्रातील मुलींमध्ये पंतप्रधानांना गार्ड ऑफ ऑनरमध्ये मानवंदना देतांना सहभाग नोंदविला त्यामुळे तिला संरक्षण मंत्रालयातर्फे सन्मानित करण्यात आले.

३) त्याचप्रमाणे चि.शिवांगी काळे हिने केवळ सहा वर्षे वयाची असतांना स्वत:मधील धैर्यता दाखविली. तसेच स्वत: समयसुचकता दाखवत आपली आई सौ.गुलबक्षी काळे व लहान बहीण कु.इशान्वी काळे यांना विजेचा धक्का बसण्यापासुन बचावत त्यांचे प्राण वाचविले. एवढया कमी वयात असतांना तिने दाखविलेले साहस अन धैर्य अतिशय कमी प्रमाणात समाजामध्ये पाहावयास मिळते. तिच्या या बालवीरतेच्या कार्यतत्परतेची प्रधानमंत्री कार्यालयाने दखल घेऊन प्रधानमंत्री राष्ट्रीय बालपुरस्कार २०२२ देऊन तिला येथोचितपणे गौरविले. महाराष्ट्रातील एकुण २९ मुलांना प्रदान करण्यात आलेल्या या पुरस्कारांच्या श्रेणीत बालगटात तिचा समावेश केला गेला.

या तिघांचे मी जळगांव शहराची प्रथम नागरिक अर्थात महापौर या नात्याने मनापासुन अभिनंदन करते आणि त्यांनी आयुष्यातील वाटचालीत आगामी काळातही असेच स्वत:सह आई-वडील, आपले जळगांव शहर, महाराष्ट्र अन देशाचे नाव सदोदित उंचावत राहावे ही या प्रसंगी मन:पुर्वक शुभेच्छा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आदरणीय महापौरताईंनी मांडलेल्या सुचनेला आमचे अनुमोदन आहेत.

**नगरसचिव :-** मी विनंती करतो, कुमारी शिवांगी प्रसाद काळे, कु.मोक्षदा चौधरी, कु.सोनाली पाटील आणि त्यांच्या सोबत आलेले त्यांचे पालक त्यांनी स्टेजवर यावे. कु.शिवांगी प्रसाद काळे यांना मी विनंती करतो की, त्यांनी या

ठिकाणी मा.महापौर महोदया यांच्या हस्ते मानपत्र स्विकारावे. त्यांचे पॅरेंटस असतील त्यांनी सुध्दा येथे यावयाचे आहे.

(मा.महापौर यांच्या हस्ते कु.शिवांगी प्रसाद काळे यांना सन्मानित करण्यात आले.)

**नगरसचिव :-** कु.मोक्षदा चौधरी व त्यांचे पॅरेंटस असतील त्यांनी सुध्दा या ठिकाणी मा.महापौर महोदया यांच्या हस्ते मानपत्र स्विकाराणेसाठी येथे यावयाचे आहे.

(मा.महापौर यांच्या हस्ते कु.मोक्षदा चौधरी यांना सन्मानित करण्यात आले.)

**नगरसचिव :-** कु.सोनाली पाटील व त्यांचे पॅरेंटस असतील त्यांनी सुध्दा या ठिकाणी मा.महापौर महोदया यांच्या हस्ते मानपत्र स्विकाराणेसाठी येथे यावयाचे आहे.

(मा.महापौर यांच्या हस्ते कु.सोनाली पाटील यांना सन्मानित करण्यात आले.)

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७३४ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | महाजन जयश्री सुनिल<br>मा.महापौर | स्वातंत्र्यपूर्व काळापासून आजपर्यंत देशभरात अनेक महिलांनी विविध क्षेत्रांत अभूतपूर्व अशा स्वकर्तृत्वातून अविस्मरणीय कामगिरी बजावत देशाचे नाव उंचावले आहे. त्यात नामोल्लेख करायचा झाल्यास अगदी राजमाता जिजाऊंपासून झाशीची राणी लक्ष्मीबाई, माजी राष्ट्रपती सौ.प्रतिभाताई पाटील, खान्देशकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी, स्वरकोकिळा स्व.लतादीदी मंगेशकर अशी कितीतरी नावे आपल्याला सांगता येतील.<br>आज अशाच जळगांव शहराचे नव्हे, तर संपूर्ण जिल्हयासाठी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर गौरवपर, भूषणावह आणि अभिमानास्पद बाब ठरलेल्या जळगांवातील नूतन मराठा महाविदयालयाची विदयार्थिनी कु.सोनाली विकास पाटील (रा.रामेश्वर कॉलनी, मेहरुण,जळगांव) मुळजी जेठा महाविदयालयाची विदयार्थीनी कु.मोक्षदा चौधरी (रा.ज्ञानदेवनगर, कालिंकामाता चौकाजवळ,जळगांव) तसेच चि.शिवांगी प्रसाद काळे (रा.कोल्हेनगर,जळगांव) या तिघांनी जळगांवच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या पार्श्वभूमीवर आज समस्त जळगांवकरांच्या वतीने जळगांव शहर महानगरपालिकेतर्फे या तिघांना यथोचितपणे सन्मानपत्र देऊन आपण गौरवित आहोत.<br>१) कु.सोनाली पाटील हीने २६ जानेवारी २०२२ रोजी नवी दिल्लीत प्रजासत्ताक दिन पथसंचलन २०२२ अंतर्गत ‘आजादी का अमृत महोत्सव’चा एक भाग म्हणून राजपथावर भारताचे लष्करी सामर्थ्य आणि सांस्कृतिक वैविध्य दाखविले गेले. यात राष्ट्रीय छात्रसेनेची सीनिअर अंडर ऑफिसर म्हणून महाराष्ट्रातील मुलींचे प्रतिनिधीत्व करीत पंतप्रधानांना गार्ड ऑफ ऑनरमध्ये गार्ड कमांडर म्हणून मानवंदना दिली. त्यामुळे तिला संरक्षण मंत्रालयातर्फे प्रथम गार्ड कमांडर म्हणून सन्मानित करण्यात आले.<br>२) कु.मोक्षदा चौधरी हीने सुध्दा २६ जानेवारी २०२२ रोजी नवी दिल्लीत प्रजासत्ताक दिन पथसंचलन २०२२ अंतर्गत ‘आजादी का अमृत महोत्सव’चा एक भाग म्हणून राजपथावर भारताचे लष्करी सामर्थ्य आणि सांस्कृतिक वैविध्य दाखविले गेले. यात राष्ट्रीय छात्रसेनेतर्फे महाराष्ट्रातील मुलींमध्ये पंतप्रधानांना गार्ड ऑफ ऑनरमध्ये मानवंदना देताना सहभाग नोंदविला त्यामुळे तिला संरक्षण मंत्रालयातर्फे सन्मानित करण्यात आले.<br>३) त्याचप्रमाणे चि.शिवांगी काळे हीने केवळ सहा वर्षे वयाची असताना स्वत:मधील धैर्यता दाखविली. तसेच स्वत: समयसूचकता दाखवत |

| | | |
|---|---|---|
| | | आपली आई सौ.गुलबक्षी व लहान बहीण कु.इशान्वी यांना विजेचा धक्का बसण्यापासून बचावत त्यांचे प्राण वाचविले. एवढया कमी वयात असताना तिने दाखविलेले साहस अन धैर्य अतिशय कमी प्रमाणात समाजामध्ये पाहावयास मिळते. तिच्या या बालवीरतेच्या कार्यतत्परतेची प्रधानमंत्री कार्यालयाने दखल घेऊन प्रधानमंत्री राष्ट्रीय बालपुरस्कार-२०२२ देऊन तिला येथोचितपणे गौरविले. महाराष्ट्रातील एकूण २९ मुलांना प्रदान करण्यात आलेल्या या पुरस्कारांच्या श्रेणीत बालगटात तिचा समावेश केला गेला.<br>या तिघांचे मी जळगाव शहराची प्रथम नागरिक अर्थात महापौर नात्याने मनापासून अभिनंदन करते आणि त्यांनी आयुष्यातील वाटचालीत आगामी काळातही असेच स्वत:सह आई-वडील, आपले जळगांव शहर, महाराष्ट्र अन् देशाचे नाव सदोदित उंचावत राहावे,ही याप्रसंगी मन:पूर्वक शुभेच्छा.<br>४) महाराष्ट्र राज्याचे मा.ना.श्री.गुलाबरावजी पाटील सो.,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा, पालकमंत्री जळगांव जिल्हा यांनी आजपावेतो जळगाव शहर महानगरपालिकेस विविध शिर्षाव्दारे निधी उपलब्ध करुन दिलेला असून त्याव्दारे आज रोजी शहरात विविध विकास कामे कार्यपथावर सुरु आहेत. तसेच जिल्हा नियोजन समिती अंतर्गत १० कोटी, ठक्कर बाप्पा योजने अंतर्गत १० कोटी व दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत १५ कोटी निधी देखिल जळगाव मनपास उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिलेले आहे. मा.ना.श्री.गुलाबरावजी पाटील सो., यांनी जळगांव शहर महानगरपालिकेस वेळोवेळी विकास कामांसाठी पुरेपुर निधी उपलब्ध करुन दिलेला आहे तसेच भविष्यात देखिल त्यांचे जळगांव मनपास याच प्रकारचे सहकार्य लाभणार आहे हे निश्चितच आहे या करीता जळगांव शहर महानगरपालिकेतर्फे त्यांचे आभार व्यक्त करणेत येत आहे. |
| २ | काळे दिपमाला मनोज | जळगांव शहर महानगरपालिकेच्या नगरसेविका व माजी स्थायी समिती सभापती ॲड शुचिता अतुलसिंह हाडा यांना लोकमत Women Achievers Award २०२१ पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल हार्दीक अभिनंदन |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने वरील सर्व पदाधिकारी, सन्मा.नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक संस्था विदयार्थींनी यांचे हे सभागृह अभिनंदन करीत असुन उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहे.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करण्यात यावी.

**नगरसचिव :- विषय क्रं:-** १) दि.१५/१२/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त तसेच दि.१०/०१/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या ऑनलाईन (ॲपव्दारे) विशेष महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कार्यवृत्त कायम करण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला शुचितताई.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, विषय क्र.२ जो आहे मनपाच्या दैनंदिन कामे करुन घेण्यासाठीचे मजुर पुरविण्याबाबतच जाहिर निविदेला,

**मा.महापौर :-** ताई, ताई विषय क्रमांक १ बाकी आहे. विषयपटलावरील विषय क्र.१ हा मंजुर करण्यात येत आहे. सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. विषय क्र.२ घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७३५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.१५/१२/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त तसेच दि.१०/०१/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या ऑनलाईन (अॅपव्दारे) विशेष महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** २) मनपा मालकीच्या ट्रॅक्टर वाहनांवर दैनंदिन कामे करण्यासाठी दररोज २४ मजुर प्रती मजुर ५४५/- याप्रमाणे दि.०१/१२/२०२१ ते दि.३०/११/२०२२ पर्यंत एक वर्षाच्या कालावधी करीता मक्तेदाराकडुन उपलब्ध करुन घेणे कामी येणारा अंदाजीत रक्कम रु.४७,७४,२००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. विषय क्र.३ घेण्यात यावा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** शुचिताताई

**अॅड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई विषय क्र.२ वर मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला शुचिताताई.

**अॅड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, विषय क्र.२ बद्दल मला काही गोष्टी सभागृहाच्या निदर्शनास आणुन द्यायचे आहे की, प्रशासकीय कामकाज कश्या दिशेने चाललेले आहे. मुळात हा विषय आहे. दैनंदिन कामी मजुर पुरविणे आणि त्या खर्चाला आणि जाहिर निविदा प्रसिध्दीला मान्यता देणेबाबत आहे. जाहिर निविदेला मान्यता देणेबाबत कोणताही आक्षेप असल्याचे कारण नाही. दैनंदिन कामी मजुर हे लागणारच आहे. ते निश्चित आहे. आणि मागच्या ठरावानुसार आपण जी मान्यता दिली होती. दि.२४/११/२०२० ला, कार्यादेश आपण त्याला दिला होता दि.०२/१२/२०२० ला. याची मुदत संपलेली आहे. दि. ०१/१२/२०२१ ला. मुदत संपली म्हणजे हे सहाजीक आहे की, नविन निविदा प्रसिध्द करावी लागणार. पण प्रशासन अजुन कितीदा त्याच त्याच चुका करत राहणार आहे ताई, दि.०१/१२/२०२१ ला मुदत संपत आहे. हे कार्यादेश देण्याच्या तारखेपासुन प्रशासनाला माहित असतांनाही २-३ महिन्या आधी ही प्रक्रिया प्रशासनाकडुन का राबविली जात नाही. मागे सुध्दा अनेक प्रकरणांमध्ये मी स्वत: या अश्या कार्यपध्दतीवर तिव्र आक्षेप नोंदविलेला आहे. तरी सुध्दा प्रशासनाचा हा भोंगळ कारभार असाच सुरु आहे. याच्या बद्दल काय एक्सप्लेनेशन आहे प्रशासनाकडे. आयुक्त साहेबांनी सदर प्रकरणी अभिप्राय दिलेला आहे की, सदर बाबत धोरण निश्चिती कामी महासभेत सादर करणे. साहेब मी तुम्हाला येथे सांगु ईच्छिते की, सभागृहाने यापुर्वी देखील अत्यंत स्पष्ट शब्दात प्रशासनाच्या लक्षात आणुन दिलेले आहे की, कोणत्याही कार्यादेशाची मुदत संपण्यापुर्वी दोन ते तिन महिन्या आधी त्याबाबतची पुढची कार्यवाही प्रशासनाकडुन सुरु झाली पाहिजे.

**मा.महापौर :-** ताई या विषयावर आपल्याला प्रशासन उत्तर देत आहे.

**अॅड.सौ.शुचिता हाडा :- काय ताई.**

**मा.महापौर :-** ताई, आपल्याला याच्यावर उत्तर मिळत आहे. प्रशासन उत्तर देत आहे.

**श्री.व्ही.ओ.सोनवणी, शहर अभियंता** :- सदर प्रकरणी दि.१०/१२/२०२१ ला सदरचा प्रस्ताव तयार करुन सादर केलेला होता. परंतु स्टॅण्डींग कमिटी फॉर्म नसल्यामुळे, तो प्रस्ताव मागच्या सभेला येवु शकला नाही. महासभेला घेतला होता मागच्या महासभेला तो विषय येवु शकला नाही. आता तो प्रस्ताव ठेवलेला आहे. प्रशासनातर्फे आता दि.१०/१२/२०२१ ला सदर प्रस्ताव तयार करुन ठेवलेला आहे.

**अॅड.सौ.शुचिता हाडा :-** सोनवणी साहेब, दोन मिनीट बोलु द्या. सोनवणी साहेब, दि.१०/१२/२०२१ ला प्रस्ताव तयार केला म्हणत आहे तुम्ही. कार्यादेशाची मुदत केव्हा संपत होती साहेब. दि.०१/१२/२०२१ ला मुदत संपत होती. त्याचे २ ते ३ महिने अगोदर हे करणे तुमची जबाबदारी होती. काय करत आहे प्रशासन. हा अतिशय सादा सोपा विषय आहे

महापौर ताई. यामध्ये अनोळखीचे कोणतेही धोरण नाही. हे काम करणे आवश्यक आहे याला आम्ही मान्यता देत आहोत. पण प्रशासनाचा जो भोंगळ कारभार चालविलेला आहे. याच्यावर नियंत्रण कधी मिळविणार आपण.

**श्री.व्ही.ओ.सोनवणी, शहर अभियंता** :- नाही, याच्या पुढे नोंद घेण्यात येईल.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** लोकप्रतिनिधींना कायमच वैठीस का धरले जाते. दि.०१/१२/२०२१ रोजी कार्यादेशाची मुदत संपत होती हे तुम्हाला कार्यादेश देतांनाच माहित होते वर्षभरापुर्वीच तिन महिन्या आधी प्रशासकीय कामकाज सुरु झाले नाही. दि.१०/१२/२०२१ ला प्रस्ताव दिला. हे आता सभागृहापुढे सांगत आहे प्रशासन.

**श्री.व्ही.ओ.सोनवणी, शहर अभियंता** :- ताई, याच्यापुढे त्याची नोंद घेण्यात येईल. दोन महिन्या अगोदरच सदर प्रस्ताव दिला जाईल.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** यापुर्वी सुध्दा अनेक प्रकरणांमध्ये तिव्र आक्षेप नोंदविलेले आहेत आम्ही. कार्यादेशाची मुदत संपल्यानंतर

**मा.महापौर :-** प्रशासनाने शुचिताताईने दिलेल्या सगळया सुचनांचे पालन करावयाचेआहे. कोणत्याही कार्यादेशाची मुदत संपण्याच्या अगोदर, दोन महिने अगोदर तो प्रस्ताव महासभेमध्ये येणे आवश्यक आहे. याची नोंद प्रशासनाने घ्यावी. विषयपत्रिकेतील पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७३६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील विविध प्रभागातील शाखा अभियंता यांच्या अधिपत्या खालील मनपा मालकीच्या ट्रॅक्टर वाहनावर दैनंदिन कामे करण्याकरीता आवश्यक मजुर पुरवठा करणे कामी मक्तेदार न्यु ज्वॉला सिक्युरिटी फोर्स जळगांव यांचे वाटाघाटी नंतरचे आलेले दर प्रति मजुर प्रति दिन ५४५/- मात्रचे दरास मनपा स्थायी समिती ठराव क्र.२९० दि.२४/११/२०२० अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्या नुसार मक्तेदार यांना कार्यादेश क्र.पवडी/१३८ दि.०२/१२/२०२० अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. या कार्यादेशाची मुदत दि.०१/१२/२०२१ रोजी संपलेली आहे.

पूढील एक वर्षा करीता मक्तेदार यांचे मार्फत आवश्यक मजुर पुरवठा करणे कामी शाखा अभियंता यांना आवश्यक असलेल्या मजुरांचा तपशिल खालील प्रमाणे.

| प्रभाग क्र. | शाखा अभियंता | आवश्यक मजुर |
|---|---|---|
| ०१ व ०२ | श्री.संजय पाटील | ०३ मजुर |
| ०३ व ०४ | श्री.मनिष अमृतकर | ०३ मजुर |
| ०३, १६ व १७ | श्री.जितेंद्र रंधे | ०३ मजुर |
| १२ व १३ व १४ (भाग) | श्री.संजय नेमाडे | ०३ मजुर |
| १०, ११ | श्री.मनोज वन्नेरे | ०३ मजुर |
| ०६ व ०७ | श्री.योगेश वाणी | ०३ मजुर |
| ०८ व ०९ | श्री.प्रकाश पाटील | ०३ मजुर |
| १५, १८ व १९ | श्री.विजय मराठे | ०३ मजुर |
| | एकुण :- | २४ मजुर |

उपरोक्त नमुद केल्या प्रमाणे एकुण २४ मजुर दि.०१/१२/२०२१ ते दि.३०/११/२०२२ पर्यंत म्हणजेच एक वर्षाच्या कालावधी करीता मक्तेदाराकडुन उपलब्ध करुन घेण्या कामी येणारा अंदाजीत खर्च २४ मजुर X ३६५ दिवस X ५४५/- प्रति मजुर प्रति दिन = ४७,७४,२००/- मात्रचा खर्च मनपाच्या सन २०२१-२२ या वर्षाच्या अर्थसंकल्पातील रस्ते दुरुस्ती या शिर्षाखालील रक्कम रुपये १५,००,००,०००/- मात्र केलेल्या तरतुदी पैकी रस्ते दुरुस्तीचे काम मक्तेदारास देण्यात आलेल्या सन २०२०-२१ च्या कार्यादेशा नुसार रक्कम रु.९.०० कोटी वजावट गृहीत धरुन उर्वरीत रक्कम रु.६.०० कोटी रक्कमेतुन सदर खर्च करणेस व या कामाची जाहिर निविदा प्रसिध्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६५ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ३) शाह रेहान अहमद रियाज अली, उपशिक्षक म.न.पा.नवीन उर्दू शाळा क्र.८ मालेगाव यांच्या एकतर्फी आंतरजिल्हा बदलीस नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रशासन अधिकारी,म.न.पा.शिक्षण मंडळ,जळगांव यांचेकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई एक विनंती आहे आपल्याला.

**मा.महापौर :-** बोला शुचिताताई बोला.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, विषय क्र.०३ ला मान्यता आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७३७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगांव या आस्थापनेवरील कार्यरत शाह रेहान अहमद रियाज अली, उपशिक्षक म.न.पा.नवीन उर्दू शाळा क्र.८, मालेगांव येथे दि.२४/०२/२००९ पासून सेवेत कार्यरत आहे. त्यांचे मुळगांव शिरसोली ता.जि.जळगांव येथील रहिवासी असून त्यांचे वडील ह्दय विकारामुळे सतत आजारी असल्याने त्यांची देखभाल करणेसाठी शिरसोली ता.जि.जळगांव येथे राहणे आवश्यक आहे. तसेच त्यांचे मुळगाव शिरसोली ता.जि.जळगांव ते मालेगाव शहरापासूनचे अंतर १६० किलोमीटर आहे. म्हणून संबंधीतांनी जळगांव महानगरपालिका शिक्षण मंडळ जळगांव या आस्थापनेवर एकतर्फी आंतरजिल्हा अंतर्गत बदली होणेसाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणेकरिता दि.०६/०८/२०२१ रोजी प्रशासन अधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ,मालेगाव येथून प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

तथापि, शासन निर्णय दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ नुसार संबंधीतानी नियमानुसार प्रशासकीय अधिकारी यांच्याकडे आंतरजिल्हा बदलीसाठी विनंती अर्ज व परिपूर्ण प्रस्ताव सादर केलेला आहे. तरी उक्त शासन निर्णयात दिलेल्या अटी व शर्ती नुसार नियुक्ती प्राधिकाऱ्याचे नाहरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे.

तसेच प्रशासन अधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव यांनी जा.क्र.मनपाशिमं.मालेगाव/आस्था/२४६/२०२१ दि.०६/०८/२०२१ रोजी च्या पत्रान्वये शाह रेहान अहमद रियाज अली, उपशिक्षक, नविन उर्दू शाळा क्र.८ मालेगांव यांच्या एकतर्फी आंतरजिल्हा बदलीस म.न.पा.शिक्षण मंडळ,जळगांव या आस्थापनेवर सामावून घेत असल्यास व तशी मंजूरी दिल्यास संबंधीत शिक्षकास महानगरपलिका शिक्षण मंडळ,मालेगाव येथून कार्यमुक्त करण्याबाबत कोणतीही हरकत नाही असे पत्र दिलेले आहे.

| क्र. | माध्यम | विदयार्थी पटसंख्या | कार्यरत शिक्षक संख्या |
|---|---|---|---|
| १ | उर्दू | ३०८८ | ८४ |

वरील तक्त्यातील नमुद विदयार्थी पटसंख्या प्रमाणे शिक्षकांची संख्या ही नियमानुसार ३५:१ म्हणजे ३५ विदयार्थी मागे एक शिक्षक असणे महत्वाचे आहे. तरी उर्दू माध्यमची विदयार्थी संख्या ३०८८÷३५ =८८ प्रमाणे ४ शिक्षक कमी आहे. तरी संबंधित एकतर्फी जिल्हाबदलीने आल्यास व उर्दू माध्यमांच्या विदयार्थ्यांची पटसंख्या लक्षात घेता विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान तसेच कार्यरत शिक्षक यांचेवर अतिरिक्त ताण कमी होणार असल्याने शाह रेहान अहमद रियाज अली, उपशिक्षक म.न.पा.नवीन उर्दू शाळा क्र.८ मालेगाव यांना जळगांव शहरमहानगरपालिका जळगांवचे आस्थापनेवर एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने सामावून घेणेस तसेच याकामी नाहरकत प्रमाणपत्र देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६५ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ४) जळगांव शहर महानगरपालिका जळगांव हद्दीत खाजगी जागेत तसेच मनपा जागेत लावण्यात येणाऱ्या आकाश चिन्हे, जाहिरात, बॅनर व फलक करीता पुढील आर्थिक वर्षापासुन (२०२२-२३ पासुन) धोरण ठरविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, मला बोलायचे आहे. महापौरताई मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला अप्पा बोला.

**श्री.कैलास सोनवणे :-** हा विषय तहकुब ठेवण्यात यावा. अशी माझी सभागृहास विनंती आहे. महापौरताई आवाज ऐकु येत आहे का महापौरताई ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** बोला अप्पा साहेब.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई आवाज येत आहे का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** बोला अप्पा साहेब.

**श्री.कैलास सोनवणे :-** मला तुमचा आवाज येत आहे नितीनभाऊ, मला महापौरांशी बोलायचे आहे. महापौरताई.

**मा.महापौर :-** कैलास अप्पा बोला आपण.बोला बोला.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई मी बोलतो, परंतु माझी विनंती आहे. ही जी आपली ऑनलाईन मिटींग चालु आहे. आम्हाला आवाज ऐकु येत नाही. याच्यापुढचे जे विषय झाले ते आम्हाला काहीच ऐकु आलेले नाही. हॅलो, महापौर साहेब ऐकु येत आहे का ?

**मा.महापौर :-** अप्पा आम्हाला आपला आवाज क्लियर ऐकायला येत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** बरं, मग महापौर मॅडम आपल्याला, म्हणजे महापौरांना व विरोधी पक्ष नेत्यांना. माझ्याकडुन वॅलेनटाईनडेच्या माझ्याकडुन हार्दिक शुभेच्छा. आज नितीनभाऊ यांचाही लग्नाचा वाढदिवस आहे त्यांनाही हार्दिक शुभेच्छा. आणि एक विनंती आहे की, वॅलेनटाईनडेच्या दिवशी मिटींग काढु नये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** थँक यु अप्पा, थँक यु.

**श्री.कैलास सोनवणे :-** आणि वॅलेनटाईनडेच्या दिवशी मिटींग काढु नका याच्यापुढे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** अप्पांनाही शुभेच्छा.

**श्री.कैलास सोनवणे :-** आम्हाला कश्याचे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तुमचं १२ ही महिने वॅलेनटाईनडे असतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** ठिक आहे पुढचा विषय घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदरचा विषय तहकुब करण्यात यावा महापौरताई, कारण याच्यामध्ये काही अमरावती न्यायालयामध्ये न्यायालयीन निवाडे झालेले आहेत. आणि त्या न्यायालयीन निवाड्यांच्या अनुषंगाने त्या न्यायालयीन निवाड्यांची माहिती घेणे. अलाहबाद हायकोर्टाने सुध्दा याच्यामध्ये एक वेगळा निकाल दिलेला आहे. या सर्वांची माहिती घेवुन पुढील महासभेमध्ये हा विषय ठेवण्यात यावा. एवढी माझी सभागृहाला विनंती आहे.

**मा.महापौर :-** मला वाटतं या विषयामध्ये आपण प्रशासनाला सुध्दा आपली बाजु मांडु द्यावी. प्रशासनाने सुध्दा या संदर्भात खुलासा करावा.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, नितीनभाऊंची किती नंबरच्या विषयाबद्दल ही सुचना होती.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्र.०४ च्या बद्दल.

**श्री.प्रशांत पाटील, उपायुक्त :-** सन्मा.महापौरताई, विषय क्र.४ जो आहे जाहिरात शुल्काच्याबाबतीत यापुर्वी देखील आपण जाहिरात शुल्काची आकारणी आपल्या महापालिकेच्या हद्दीत आकारणी करत आहोत.खाजगी जागेच्या बाबतीत आणि मनपाच्या जागेवरचे जाहिरात आकाश चिन्ह लावली जातात.याच्यावर आपण जाहिरात शुल्काची आकारणी करत आहोत. आणि त्याच्यातच त्या संदर्भातच हा प्रस्ताव आहे. यापुर्वी आपण जो शुल्क आकारत होतो. या शुल्कामध्ये याच्यात अधिक काही प्रमाणात वाढ करत आहोत. यापुर्वी आपण खाजगी जागेत २.२५ रुपये प्रति स्के.फुट प्रति महिना अशी आकारणी करत होतो जाहिरात शुल्काची तर आपण ती २.५० रुपये प्रति महा अशी आकारणी करण्याला प्रस्तावीत केलेले आहे. तसेच मनपाच्या जागेत यापुर्वी साधारण १ रुपये स्कु.फुट प्रति दिवस अशी आकारणी करत होतो जाहिरात शुल्काची तर आपण फक्त १.२५ रुपये स्के.फुट अशी आकारणी करण्याचे प्रस्तावीत करीत आहोत. त्यामुळे यापुर्वी देखील आपण जाहिरात शुल्काची आकारणी आपण करत होतो. आणि त्या संदर्भातलाच हे धोरण आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, पाटील साहेबांनी विस्त्रुतपणे माहिती दिली.परंतु या संदर्भात ज्या वेळेला जी.एस.टी. ॲपलीकेबल झाला. त्यावेळेला जाहिरात शुल्क घेण्यात येवु नये अश्या पध्दतीचे धोरण केंद्र शासनाकडुन ठरविण्यात आलेले होते. मध्यंतरी तर कोविडच्या काळामध्ये जाहिरातीच्या क्षेत्रावरती सुध्दा याचा उद्योगावरती मोठा परिणाम जाणवायला लागलेला आहे. या संदर्भात सविस्तर माहिती घेऊन पुढच्या महासभेमध्ये या संदर्भातील धोरण ठरविण्याच्या बाबतीत भुमिका निश्‍चितच सभागृह घेईल. आणि म्हणुन तुर्त हा विषय जो आहे आज तहकुब करण्यात यावा एवढी माझी विनंती आहे.

**श्री.प्रशांत पाटील, उपायुक्त :-** आदरणीय नितीनभाऊ, जाहिरात कर आपण आकारत नव्हतो. आपण जाहिरात शुल्क आकारत होतो. आपल्या महापालिका अधिनियमात ३८६ जी कलम आहे. त्यात कुठलीही परवानगी देण्यासाठी लायसन्स किंवा लेखी परवानगी देण्याबाबतची तरतुद आहे. त्या तरतुदीच्या अधिन राहुन आपण हे शुल्क आकारत आहोत. आपण जाहिरात कर आकारत नाही. त्यामुळे न्यायालयीन निवाडा जो आहे. जाहिरात कराच्या संदर्भातला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पाटील साहेब, विषय मला तो लक्षात आलेला आहे. फक्त आपण काय केलेले आहे हेड बदललेले आहे. शुल्कच्या ऐवजी आपण त्याला परवाना शुल्क म्हणुन आकारणी करीत आहोत. तरी सुध्दा महापालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही. आणि जाहिरात उद्योजकांना सुध्दा त्याचा भार सोसावा लागणार नाही. अश्या पध्दतीचे काही तरी योग्य धोरण ठरविण्याच्या दृष्टीकोणातुन पुढील महासभेसमोर या संदर्भातले धोरण आपण निश्चित ठरवु या.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, नितीनभाऊंनी आता जे काही सुचना दिलेल्या आहे. त्यामध्ये अजुन थोडेसे मी ॲड करु ईच्छिते की, पुढच्या महासभेमध्ये प्रशासनाने हा प्रस्ताव आणतांना या संदर्भातली अजुन सुव्यवस्थित नियमावली समोर आणायला पाहिजे. नगरसेवकांकडुन सुध्दा आणि जनतेकडुन सुध्दा या संदर्भातल्या सुचना आणि हरकती मागविल्या पाहिजे. कारण मुळात या होर्डींग बोर्डचा त्रास हा सामान्य नागरीकांना सगळयात जास्त सहन करावा लागतो.मला एवढे आठवत आहे महापौरताई त्यानुसार मागे आपले सन्मा.सदस्य बंटीभाऊ जोशी यांनी एक ठराव महानगरपालिकेमध्ये केलेला होता. काही ठिकाणी आपण स्पेसीफाय केलेले होते की, त्या ठिकाणी होर्डींग बोर्ड लावले जाणार नाही. सर्वानुमते हा ठराव झाला होता. पण याची अंमलबजावणी अजिबात झालेली नाही. नो होर्डिंग बोर्ड झोन हा एक अत्यंत महत्वाचा विषय आहे. याची प्रशासनाने नोंद घ्यावी. हायवे, चौक, धार्मिक स्थळे आणि डिव्हायडरमध्ये सुध्दा ट्रॅफिकला त्रास दायक होईल. अश्या पध्दतीच्या होर्डिंग बोर्डला कुठेच मान्यता देण्यात येऊ नये. या संदर्भातला सविस्तर प्रस्ताव पुढच्या महासभेसमोर आणावा. याची नियमावली सभागृहासमोर प्रशासनाने आणावी.नगरसेवकांच्या सुचना हरकती मागवाव्या. त्या स्विकाराव्या.आणि त्यानुसार परिपुर्ण असा प्रस्ताव आणावा. आणि नितीन भाऊंनी ज्या ज्या गोष्टी मेनशन केलेल्या आहेत.त्यासंदर्भातला सुध्दा अभ्यास होणे गरजेचे आहे. त्यामुळे आमच्या वतीने सुध्दा हिच मागणी आहे की, आजचा हा विषय तहकुब ठेवावा आणि या सगळया बाबींचा अंतरभुत असणारा सुस्पष्ट प्रस्ताव पुढच्या महासभेसमोर आणावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** धन्यवाद ताई.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर, जी काही मुद्दे सन्मा.सदस्यांनी येथे उपस्थित केलेले आहे. त्याच्या बाबतीमध्ये एक मुद्दा आपण लक्षात घेतला पाहिजे की, जाहिरात कर आणि जाहिरात फी या दोन गोष्टी स्वतंत्र आहे. महानगरपालिका जाहिरात फीच्या नावाखाली जाहिरात कर लावते असे बिलकुल नाही.जाहिरात कराची तरतुद महानगरपालिकेच्या कलम १२७ मध्ये होती. ज्या वेळेला १ जुलै २०१६ पासुन केंद्र सरकारने सर्व स्थानिक कर रद्द करुन त्या ऐवजी एकच जी.एस.टी.कर आणला वस्तु आणि सेवा कर, त्याच्या मध्ये कोण कोणते दर कोण कोणते कर हे मर्ज झाले, त्याच्या मध्ये ऑक्ट्राय असेल, मुंबई महापालिकेचा ऑक्ट्राय रद्द झाला, लोकल बॉडी टॅक्स असेल, तो त्याच्यामध्ये मर्ज झाला, आणि जाहिरात कर अश्या प्रकारचे कर जी आहे ते त्याच्यामध्ये मर्ज झालेले आहेत. आता कुठल्याही स्थानिक स्वराज्य संस्थांना जाहिरातींवरती जाहिरात कर लावता येणार नाही. आपण तो जाहिरात कर लावत नाही. जाहिरात शुल्क जी आहे, जरी जाहिरात कर शासनाने माफ केलेला असला तरी तो जी.एस.टी.मध्ये मर्ज झालेला असला तरी सुध्दा महानगरपालिका हद्दीमध्ये नगरपालिका हद्दीमध्ये कुठेही जाहिरात फलक जी लावायचे असतील किंवा आकाश चिन्ह लावायचे असेल. तर आता उपायुक्तांनी सांगितल्या प्रमाणे कलम ३८६ खाली महानगरपालिकेचा त्यांनी परवाना घेणे गरजेचे आहे. अश्या प्रकारे परवाना घेत असतांना त्याचा परवाना शुल्क ठरविण्याचा अधिकार हे महानगरपालिकेला आहे. शुल्क आणि करामध्ये फरक आहे. कर लावण्याचा अधिकार आपल्याला नाही. कर आपण पुर्वी ही लावलेला नव्हता आज ही लावलेला नाही. पुढे ही लावणार नाही आपण शुल्क लावण्याच्या सदंर्भामध्ये यापुर्वी सुध्दा आपण शुल्क आकारणी केलेली आहे. आताही आपण शुल्क आकारणीच्या दरामध्ये वाढ करतो.राहिला काही सन्मा.सदस्यांनी याच्या बद्दल काही न्यायालयाचा संदर्भ दिला. उदहारणार्थ सिव्हील कोर्ट अमरावती आणि मा.उच्च न्यायालय कानपुर अलाहबाद याच्या संदर्भामध्ये, जाहिरात कराच्या संदर्भामध्ये हे दोन दावे आहेत. या दोन दाव्यांमध्ये सन्मा. न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची प्रशासनाने दखल घेतलेली आहे त्याचा अभ्यासही केलेला आहे. हे दोन्ही ही निर्णय जाहिरात कर लावता येणार नाही याच्या संदर्भामध्ये आहे. आपण जाहिरात कर लावत नाही. त्यामुळे त्याला न्यायालयाच्या निर्णयाची कुठेही बाधा येणार नाही. राहिला विषय नियमावलीच्या संदर्भामध्ये महाराष्ट्र शासनाने संपुर्ण राज्यातल्या महानगरपालिकांसाठी जे जाहिरातीचे धोरण आहे

त्याच्यासाठी २००३ चे नियम केलेले आहे. आणि या २००३ च्या नियमाप्रमाणे कोणत्या ठिकाणी जाहिरात परवानगी देता येईल. कोणत्या ठिकाणी देता येणार नाही. काय साईज असेल वाहतुकीला अडथळा होईल ना होईल वगैरे ही सगळी नियमावली आहे. त्यामुळे राज्य शासनाने संपुर्ण राज्याच्या महानगरपालिकांसाठी नियमावली तयार केलेली असल्यामुळे आपल्याला आपल्या शहरासाठी स्वतंत्र नियमावली ठेवण्याची गरज नाही. मात्र स्थानिक परिस्थिती विचारात घेवुन काही ठिकाणी आपण जाहिरातीला बंदी लावायला हरकत नाही. अर्थात ते परवानगी देण्याचे विषय आहेत. जाहिरात शुल्क ज्या ठिकाणी महानगरपालिका परवानगी देईल. अश्या ठिकाणी परवाना जो दोन वर्षाकरीता दिला जाणार आहे .याच्यासाठी शुल्क घेण्याच्या संदर्भामधला आहे. मला असे वाटते की, सन्मा.सभागृहाने याचा विचार करावा. याची कायदेशीर बाजु आणि महानगरपालिकेचे आर्थिक हित आणि याच्या संदर्भामध्ये असलेले नियम विचारात घेवुन या विषयावर आपण निर्णय घ्यायला काही हरकत नाही. अशी माझी विनंती आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.आयुक्त महोदय, आपण जे सांगितले ते मान्य आहे. परंतु ज्या काही या व्यवसायीकांच्या अडचणी आहे. त्यासुध्दा विचारात घेवुन या संदर्भातले योग्य धोरण जे आहे ना. ते निश्चितपणे पुढील महासभेच्या समोर ठेवण्यात येईल. महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होईल अश्या पध्दतीची कुठलीही भुमिका सभागृह घेणार नाही. परंतु स्थानिक पातळी वरती असलेल्या उद्योजकांचा सुध्दा विचार करणे गरजेचे आहे. आणि या अनुषंगाने पुढील महासभेमध्ये सविस्तरपणे याच्यावरती चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल. तुर्त हा विषय स्थगित करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०४ हा पुढील सभेपर्यंत तहकुब ठेवण्यात येत आहे. सर्वानुमते तहकुब ठेवणेस मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७३८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सदर विषयी न्यायालयाचे निवाडे यांची माहिती घेणेकरिता तसेच व्यावसायीक व मनपाचे आर्थिक नुकसान होणार नाही याची काळजी घेवून त्यानूसार धोरण ठरविणेकामी प्रशासनाने नियमावली प्रमाणे सविस्तर प्रस्ताव तयार करावा व स्पष्ट नियमावलीसह प्रस्ताव पूढील महासभेत सादर करावा त्यानंतर याबाबत योग्य ते धोरण महासभेत ठरविण्यात येईल त्यास्तव सदरचा प्रस्ताव तहकूब करण्यात येत आहे.

**सर्वानुमते तहकूब**

**अनुकूल मते :- ६५ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ५) जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये भुमिगत केबल टाकण्यासाठी धोरण ठरविणे व दर निश्चितीस मंजुरी देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. परंतु याच्या संदर्भात बहुसंख्य सदस्यांचे म्हणणे असे आहे की, भुमिगत केबल योजना करणेच्या अनुषंगाने ज्या ज्या कंपनींकडुन आपण जी शुल्क भरुन घेतो ती रस्ते खोदकामच्या संदर्भातले, परंतु तो निधी जो आहे तो इतरत्र वेगवेगळया विभागांमध्ये वापरला जातो. सर्व सन्मा.सदस्यांची याप्रमाणे मागणी आहे की, या संदर्भात भुमीगत केबल खोदतांना ज्या पध्दतीने रस्त्यांचे नुकसान होते. आणि त्या रस्त्यांची नुकसानीची नुकसान भरपाई रक्कम जी आहे. ती संबंधीत कंपनी महानगरपालिका प्रशासनाकडे भरत असते. परंतु तो निधी प्रत्यक्ष त्याच कामावर खर्च न होता तो इतरत्र वळविला जातो. आणि त्याच्यामुळे रस्त्यांच्या खड्डयांची परिस्थिती जी आहे ती अत्यंत विदारक असते म्हणुन या संदर्भात महानगरपालिकेने एक स्वतंत्र एस्क्रो अकाऊंट उघडावे, आणि या रस्ते खोदकामाच्या संदर्भातला प्राप्त झालेला निधी हा संपुर्ण त्याच खात्यामध्ये ठेवुन ज्या ज्या वेळेला या रस्त्यांची जी कामे होतील. प्राथमिकतेने केबलचे काम पुर्ण झाल्यानंतर तातडीने त्याची दुरुस्ती हाती घेण्याचे संदर्भातली भुमिका प्रशासनाने स्विकारावी. ऐवढी माझी सुचना आहे. आणि हा प्रस्ताव मान्य करण्यात यावा अशी विनंती आहे.

**मा.उपमहापौर :-** महापौर महोदया, त्याच बरोबर ज्या ज्या ठिकाणी आता नव्याने रस्त्यांचे कामे हाती घेण्यात आलेले असतील किंवा ज्या ठिकाणी रस्त्यांचे कामे पुर्णत्वास आलेले असतील. अश्या ठिकाणी देखील त्यांनी स्वतंत्र व्यवस्था करुन किंवा पुर्वनियोजन करुन अश्या पध्दतीने केबल अंडरग्राऊंड टाकत असतांना त्या रोडाचा त्रास होणार नाही किंवा तो रोड खराब होणार नाही. त्या दृष्टीने त्यांनी पुढचे काम करायचे आहे आणि माझा या विषयाला अनुमोदन आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई,

**मा.महापौर :-** बोला शुचिताताई,

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** मी ज्या वेळेला स्थायी समिती सभापती म्हणुन काम करत होते. त्यावेळेला सुध्दा नागेश्वर कॉलनी, महाबळ येथे मी प्रत्यक्ष पाहणी करुन बेकायदेशीर पध्दतीने मनपाची कोणतीही परवानगी न घेता, सुरु असलेले केबलचे काम तेथील स्थानिक अभियंता श्री.संजय नेमाडे यांच्या निदर्शनास आणुन दिले होते. आणि माझ्याच प्रभागात लगेच दुसऱ्या किंवा तिसऱ्या महिन्यात सरदार वल्लभभाई पटेल सभागृहाच्या समोर वायफायच्या पोलचे सुध्दा काम सुरु होते. त्या संदर्भात सुध्दा मी प्रशासनाकडे तक्रार केलेली होती. त्या तक्रारींची प्रशासनाने नेमकी काय दखल घेतली. अश्या बेकायदेशीर सुरु असलेल्या कामांवर काय कार्यवाही केली. या बद्दल अजुनही सभागृहाला प्रशासनाने काहीही अवगत करुन दिलेले नाही. मुळात होतं काय ताई, आपण लोकप्रतिनिधी म्हणुन नागरीकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशिल असतात. हे अगदी मिडीयाला त्यावेळेच्या वर्तमानपत्रामध्ये या बातम्या सुध्दा लागल्या होत्या. असे अनाधिकृत बांधकाम तत्कालीन सभापतींनी शोधुन काढले, चालु असेलेले काम प्रशासनाच्या निदर्शनास आणुन दिले, पण त्यानंतर प्रशासनाने त्याच्यावर चुप्पी साधली, आणि कोणताच खुलासा केला नाही. काहीच कार्यवाही सुध्दा केली नाही. खर तर ही भविष्यातली गरज आहे. तांत्रिकज्ञानाशी संबंधीत ही सगळी कामे आपल्याला करावीच लागणार आहे. ती आवश्यक आहे. पण याच्यावर प्रशासनाचे नियंत्रण असणे तेवढेच महत्वाचे आहे. स्थानिक इंजिनिअरला माहित सुध्दा नसतं की, त्यांच्या एरिया मध्ये असे काही काम सुरु आहे. परवानगी घेतलेली आहे किंवा नाही. विना परवानगीने हे काम सुरु आहे. याच्या बद्दल ते सुध्दा काही वेळेला अज्ञात असतात आणि काही वेळेला त्यांना माहिती असतं पण ऑनपेपरवर ते कुठेच दाखविण्यात आलेले नसते. सभागृहाला माझ्या या वाक्याचा अर्थ निश्चितच कळत आहे. खरं तर या सगळया कामांमध्ये सर्वात जास्ती सफर कोण होतं तर सामान्य नागरीक होतो. आणि सगळयात जास्त बोलणे कोणाला खावे लागतात तर ती नगरसेवकांना खावी लागतात. महापालिकांच्या अधिकाऱ्यांकडे किंवा आयुक्तांकडे कोणतेही नागरीक या संदर्भातल्या तक्रारी करायला येत नाही. पण नागरीकांना रोजच हा खोदुन ठेवलेल्या रस्त्याचा जो त्रास सहन करावा लागतो. त्याच्या तक्रारी नगरसेवकांकडे केल्या जातात. आणि रोषाला सुध्दा नगरसेवकांनाच सामोरे जावं लागतं. या विषय संदर्भात त्या कंपनीला स्पेसीफिक सुचना दिल्या गेल्या पाहिजे की, जिथे हे काम सुरु त्या ठिकाणी काम सुरु असल्याबद्दलचे दिशादर्शक फलक किंवा तसे सुचना फलक लावणे, गार्डस लावणे आवश्यक आहे. सभागृहाला आठवत असेल की, मागे असेच कुठेतरी काम सुरु असतांना त्यामध्येच एक मुलगा पडला होता. एक गाडी पलटी झाली होती. या सुध्दा बातम्या त्या त्या वेळेला मिडीया मध्ये येवुन गेलेल्या आहे. कोणती तरी घटना घडते त्यावेळेला, मिडीया मध्ये ते छापुन येते. त्याच्यावर वेगवेगळे मतमतांतरे होतात. सगळे आपआपले मते मांडतात. पण प्रशासन मात्र दर वेळेला तसेच सुस्त पडुन असतो.प्रशासनाला जाग मात्र काही येत नाही. याच्यामध्ये एक महत्वाची सुचना मी येथे देऊ ईच्छिते ताई की, येथुन पुढे भविष्यात जेव्हाही ही कामे होतील. त्यावेळेला एक नविन टेक्नोलॉजी आहे. आडवा बोर असे म्हणतात त्याला. टेक्नीकल एक्सपर्ट जे कोणी असतील आपल्या महापालिकेतले या विषयातले त्यांना मी काय म्हणत आहे ते समजत असेल. एच.डी.डी. असे म्हटले जातात त्याला. होरीझोंटल ड्रेनेज तर आडवा बोर या पध्दतीनेच ते काम झाले पाहिजे. जेणे करुन काय होत की, खुप मोठी जागा जी खोदली जाते. ती खोदली जाणार नाही. आणि एका विशिष्ट टेक्नीकल पध्दतीने ती जागा खोदली गेल्यामुळे त्याचे दुरुस्तीचे काम करत असतांना सुध्दा वाढीव खर्च लागणार नाही आणि ते लवकर आणि चांगल्या पध्दतीने काम होवु शकेल. आणि नागरीकांना खुप मोठा रस्ता किंवा खुप जास्त जागा खोदुन ठेवल्यामुळे त्रास होतो.त्या त्रासापासुन सुध्दा काही प्रमाणात रिलीफ मिळु शकेल. सगळयाच नगरसेवकांची अशी एक सार्वत्रिक मागणी आहे की, नगरसेवकांच्या प्रभागात जेव्हा अश्या कोणत्या कामाला परवानगी प्रशासन देतो तर त्या नगरसेवकांना पुर्वसुचित केले पाहिजे. अर्थातच प्रशासनाचे आपण सगळेच भोंगळ कारभार बघत आहोत. प्रशासन किती सुस्त आहे हे आपल्याला सगळयांना ज्ञात आहे. त्यामुळे मला वाटत नाही की, प्रशासन पुर्व सुचना आज आपण ठराव जरी केला, तरी नगरसेवकांना पुर्व सुचना देईल. मग अश्या वेळेला असे करावे लागेल की, आपल्याला महासभेचे पुर्वपरवानगीनेच फक्त परवानगी देण्यात यावी. म्हणजे दर वेळेला एखाद्या कंपनीचा अर्ज आला की, तो महासभेसमोर आणावा लागेल आणि त्यानंतर त्या नगरसेवकांना ज्ञात होईल. जेणे करुन ते नागरीकांना या सुचना देऊ शकतील की, या भागाकरीता हे काम होणार आहे. त्याच्याकडे लक्ष ठेवु शकतील. आणि ज्या काही कामांना रेकॉर्डवर न घेता परस्पर परवानगी दिली जाते, तोंडी परवानगी दिली जाते. त्या सुध्दा गोष्टींना कुठेतरी आळा बसेल. त्यामुळे मी सभागृहाला, महापौरताई तुम्हाला अशी विनंती करते की, आजच्या या ठरावामध्ये या गोष्टींचा उल्लेख करुन

घ्यावा.येथुन पुढे होणारे काम हे एच.डी.डी. प्रणाली वापरुन आडवा बोर पध्दतीने करण्यात यावा, महासभेच्या पुर्वपरवानगी शिवाय कोणत्याही कंपनीला परवानगी देण्यात येवु नये. आणि येथे मला प्रशासनाला महत्वाचा प्रश्न असा विचारायचा आहे की, येथे त्यांनी एक तक्ता दिलेला आहे या विषयामध्ये. या तक्त्यामध्ये डांबरी रस्ते / काँक्रीट रस्ते, महापौरताई डांबरी रस्ते / काँक्रीट रस्ते असे येथे मेनशन केलेले आहे. मला प्रशासनाकडुन हा खुलासा हवा आहे की, काँक्रीट आणि डांबरी रस्त्यांचा दर एकच कसा काय असु शकतो ? कृपया प्रशासनाला सुचना द्यावी ताई, या संदर्भात सभागृहाला माहिती द्यावी.

**श्री.व्ही.ओ.सोनवणी, शहर अभियंता :-** महापौरताई, डांबरी रस्त्यामध्ये ही जी प्रोव्हीजन घेतलेली आहे त्याच्या मध्ये बी.बी.एम., बी.एम., आणि एल.जी.बी.सी.चा जो घेतलेला आहे तो त्या बी.एम.सी.च्या दरानुसार घेतलेला आहे आणि त्याचा रेट काँक्रीट रोडच्या जवळपास सेमच येतो त्यामुळे आपण काँक्रीट आणि डांबरी रोड हे एकाच कॅटेगीरी मध्ये घेतलेले आहे. आपण कारपेट सिलकोट न घेता, बी.सी.बिटुमिनस कारपेटचा रेट घेतलेला आहे. आणि तो रेट जो आहे ५० mm थिकनेसचा घेतलेला आहे. आणि तो बी.एम.सी.च्या नॉर्मसनुसार घेतलेला असल्यामुळे त्याचे रेट आणि काँक्रीट रोडचे रेट सेम येतात.

**मा.महापौर :-** विषय क्र.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** अर्थात याबद्दलचे एक्सपर्ट आम्ही नाही. महापौरताई त्यामुळे याच्यातला फरक आम्हाला कळु शकणार नाही. प्रशासनाने मात्र याची दक्षता घ्यावी. माझ्या सामान्य ज्ञानाप्रमाणे मला तरी असे ज्ञात होते की, काँक्रीट रस्त्यांसाठी जास्त खर्च लागत असतो. तर या बद्दल प्रशासनाने योग्य ती नोंद घ्यावी आणि मी परत एकदा निदर्शनास आणुन देऊ ईच्छिते,

**मा.महापौर :-** ताई, नक्कीच ताई, विषय क्र.०५ संदर्भात सन्मा.सदस्यांनी मांडलेल्या सुचनांची दखल प्रशासनाने घ्यायची आहे. आणि विषय क्र.०५ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७३९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मा.महापौर सौ.जयश्री सुनिल महाजन यांचे कडील जा.क्र./म.का./२९८ दि.१७/०१/२०२२ चे पत्रात सुचित केले आहे कि, शहरातील रस्ते विकसित करणेची कामे करण्यासाठी निधी उपलब्ध झालेला असुन त्यांना कार्यादेश सुध्दा देण्यात आलेले आहेत. नव्याने रस्ते विकसीत करण्याकामी लवकरच सुरुवात होणार आहे. मात्र सदर रस्ते विकसीत केल्या नंतर त्यावर पुन्हा खोदकाम होऊ नये म्हणुन खबरदारी घेणे गरजेचे आहे. करीता शहरातील रस्ते विकसीत करणे अगोदर विदयुत खांब स्थलांतर जलवाहीन्या दुरुस्ती, नवीन नळ संयोजन देणे, ऑप्टीकल फायबर केबल टाकणे यासम कामे लवकर करुन घेणे आवश्यक आहे. करीता आपणास सुचित करण्या अगोदर उपरोक्त नमुद कामे लवकरात लवकर सक्तीने करुन घेणे तसेच नव्याने रस्ते विकसीत झालेल्या रस्त्यांवर खोदकाम झाल्यास संबंधीत अभियंता यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात येवुन कारवाई करण्यात येईल या बाबत संबंधीतांना आदेश देण्यात आलेले आहेत.

शहरात भुमीगत आप्टीकल फायबर केबल टाकण्या करीता प्राप्त झालेल्या खाजगी कंपनीच्या प्रस्तावास अनुसरुन या कामा करीता रस्त्याच्या नुकसानीपोटी त्यांच्याकडुन रक्कम वसुलीचे सुधारीत दर निश्चित करण्याकामी प्रस्ताव तयार करण्यात येवुन तो आयुक्त यांच्या मान्यतेने महासभेपुढे दि.१२/०८/२०२१ रोजी झालेल्या महासभेमध्ये ठराव क्र.५४४ दि.१२/०८/२०२१ पारीत करण्यात आलेला होता व त्या नुसार जळगांव शहरातील रस्ते अमृत योजनेमुळे यापूर्वीच खोदले गेल्याने नागरिकांमध्ये असंतोष मोठया प्रमाणावर असल्याने या बाबींचा विचार करता आप्टीकल फायबर केबल टाकणे बाबत प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव नामंजुर (रद्द) करण्यात आलेला आहे.

मात्र रस्त्यांची विकासकामे करण्यापूर्वी भुमिगत केबल टाकण्याची कामे करुन घेणे आवश्यक असले बाबत मा.महापौर सो यांनी पत्र दिलेले आहे व त्यास अनुसरुन या कामासाठी परवानगी देणे साठी रस्त्याच्या होणाऱ्या नुकसानी पोटी संबंधीतांकडुन रक्कम वसुलीचे दर ठरविणे आवश्यक आहे. पुर्वी सादर केलेल्या प्रस्तावात सन २०२०-२१ च्या डिएसआर नुसार दर विचारात घेऊन प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. मात्र आता सन २०२१-२२ चा डिएसआर कार्यान्वीत असल्याने तसेच आयुक्त यांनी सुचित केल्याप्रमाणे प्रत्येक बाबींवर १०% अतिरिक्त प्रशासकीय खर्च म्हणुन समाविष्ठ करण्यात आलेला आहे. त्यानुसार दरा बाबतचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.नं. | जुन्या दरा नुसार | सन २०२१-२२ च्या दरा नुसार | १०% प्रशासकीय खर्च समाविष्ट करुन दर |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | डांबरी रस्ते/कॉक्रीट रोड | ६२६६.०० प्रति मिटर | ६८९३.०० प्रति मिटर |
| २ | खडीचे रस्ते | ६३८.०० प्रति मिटर | ७०२.०० प्रति मिटर |
| ३ | कच्चे रस्ते :- ३५/- प्रति मिटर | ५५/- प्रति मिटर (अंदाजे) | ६०.०० प्रति मिटर |

जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये भुमिगत केबल टाकण्यासाठी वरील प्रमाणे दरास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच शहरात भुमीगत आप्टीकल फायबर केबल टाकण्या करीता प्राप्त झालेल्या खाजगी कंपनीच्या प्रस्तावास अनुसरुन या कामा करीता रस्त्याच्या नुकसानीपोटी जी काही रक्कम वसुल होईल ती एक स्वतंत्र एस्क्रो अकौंट उघडून त्यामध्ये जमा करणेत यावी व ती रक्कम संबंधीत रस्त्यांवर खर्च करण्यात यावी. तसेच यापूर्वी ज्या ठिकाणी रस्त्यांची कामे झालेली आहेत त्या रस्त्यांचे नुकसान होणार नाही याची प्रशासनाने काळजी घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६५ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ६) तहकुब विषय - स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत जळगांव महानगरपालिकेच्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाचे कामी प्रकल्पाचे सुधारीत मान्यतेनुसार स्थापत्य व बायोमायनिंगचे कामी वाढीव संविदा रकमेनुसार काम करुन घेणेस व वाढीव खर्च १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. या संदर्भात कोणाला काही शंका कुशंका उपस्थित असल्यास आयुक्त महोदयांनी या संदर्भात सभागृहाला समाधान करुन द्यावे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**सन्मा.सदस्या ॲड. सौ.शुचिता अतुलसिंह हाडा यांनी दि.१४/०२/२०२२ रोजी झालेल्या महासभेतील विषयपत्रिकेवरील विषय क्र.०६ घनकचरा या विषयाबाबत लेखी सुचना मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांच्याकडेस महासभा सुरु होण्यापुर्वी दिलेली असुन सदर लेखी सुचनेची नोंद इतिवृत्तात घेणेबाबत तसेच सौ.शुचिता हाडा यांचा फक्त विरोध नोंदविण्यात यावा असे मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांनी सभागृहात सदर विषयावर चर्चा सुरु असतांना लेखी सुचनेवर लेखी निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे सन्मा.सदस्या ॲड.सौ.शुचिता अतुलसिंह हाडा यांच्या सुचनेची नोंद खालील प्रमाणे घेण्यात येत आहे.**

**प्रति,**
**मा.महापौर,**
**महानगरपालिका जळगांव**

**विषय :-** दि.१४/०२/२०२२ रोजी होणाऱ्या महासभेतील अजेंड्यावरील विषय क्र.६ घनकचरा या विषयाबाबत लेखी सुचना...

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत माझी लेखी सुचना / हरकत सोबत सादर करीत आहे. तरी सभा कामकाजात त्याची नोंद घ्यावी व त्याप्रमाणेच माझे मत नोंदवावे ही विनंती.

सही /-
ॲड.शुचिता अतुलसिंह हाडा
नगरसेविका, म.न.पा.जळगांव

महासभा - दिनांक : १४/०२/२०२२ विषय क्र.६

**विषय :** स्वच्छ भारत अभियान(नागरीक) अंतर्गत जळगांव म.न.पा.च्या घनकचरा प्रक्रिया कामी प्रकल्पाचे सुधारीत मान्यतेनुसार स्थापत्य व बायोमायनिंगचे कामी वाढीव संविदा रकमेनुसार काम करुन घेणेस व वाढीव खर्च १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतुन करणेस मान्यता मिळणेबाबत...

- १ मार्च २०१८ रोजी महाराष्ट्र शासनाने जळगांव म.न.पा.च्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास प्रशासकीय मान्यता दिली.

- मुळात स्वच्छ भारत अभियान अंतर्गत अनुज्ञेय किंमत ही ५५ कोटी होती मात्र आपले कडुन DPR च ३० कोटींचा पाठवणेत आला.
- अनुज्ञेय प्रकल्प किमतीच्या ३५% केंद्र शासनामार्फतचे अनुज्ञेय अनुदान असणार आहे आणि केंद्र आणि राज्य शासनामार्फत अनुज्ञेय अनुक्रमे ६०:४० च्या प्रमाणात राज्य शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान असणार व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा म्हणजेच मनपाचा सहभाग केंद्र व राज्य शासनामार्फत अनुज्ञेय अनुदाना व्यतिरिक्त.
- DPR आपण ३० कोटींचा सादर केल्याने केंद्राकडुन ३५% म्हणजे १० कोटी राज्य शासनाकडुन ६०:४० चे प्रमाणात म्हणजे ७ कोटी आणि उर्वरीत मनपाचा सहभाग १२ कोटी असा झाला.
- ५५ कोटी अनुज्ञेय असतांना ३० कोटींचा DPR देणं ही पहिली मोठी चुक DPR अनुज्ञेय किंमती प्रमाणे दिला असता तर अर्थातच त्या प्रमाणात केंद्र व राज्याचा हिस्सा अनुज्ञेय राहिला असता.
- वाढीव अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही हे तेव्हाच स्पष्ट करण्यात आलेले आहे. त्यामुळे आता १४व्या वित्त आयोगातुन पैसा खर्च करावा की नाही हा विषय गौण आहे.
- हा चुकीचा सादर झालेला DPR त्यानंतर महासभा ठराव क्र.३३१ दिनांक १६/१२/२०२० नुसार ४९.६१ कोटी रकमेचा Revised DPR ला मंजुर देऊन तो MGP कडे सुधारीत तांत्रिक मान्यतेस्तव पाठविण्यात आला होता व राज्य शासनाकडे देखील सुधारीत तांत्रिक मान्यतेस पाठविणेला मान्यता देण्यात आलेली होती.
- मुळात या सगळयाच प्रशासकीय कामकाजाचा भाग असलेल्या गोष्टी होत्या. आधीच्या एजन्सीने DPR चुकीचा बनवला, प्रशासनाने डोळयांवर पट्टी बांधुन सदरचा DPR मंजुरीसाठी पाठवुन दिला.
- प्रत्यक्ष कार्यन्वयन करणेपुर्वी प्रशासनाला साक्षात्कार झाला की या DPR प्रमाणे कामे होऊ शकत नाही मग प्रशासनाने ४९.६१ कोटींच्या DPR ला महासभेची मान्यता घेतली व तो देखील प्रशासकीय मान्यतेस्तव पाठवला  आता सुधारीत मान्यता प्राप्त झालेनंतर स्थापत्य व बायोमायनिंगचे कामी वाढीव संविदा रकमेनुसार काम करुन घेणेस मान्यता मिळणेकामी आजच्या महासभेसमोर ठेवला आहे.
- लक्ष्मी कन्स्ट्रक्शन औरंगाबाद सोबत झालेल्या करारनाम्यानुसार मुळ निविदा रक्कम ही १२ कोटी १४ लक्ष ७४ हजार २०९ एवढी होती त्यावर १८.९९% जास्तीचे दर वाटाघाटीअंती मान्य होऊन आपण त्यांना मुळातच निविदा रकमेपेक्षा २.३० कोटी जास्तीचे दर दिलेले आहेतच.
- वाढीव रक्कम आपण १२ कोटी १४ लाख २३ हजार ९२८ नमुद केली आहे. म्हणजे मुळ निविदा रकमेइतकीच वाढीव म्हणजेच १००% वाढीव रक्कम आहे.
- वाढीव मंजुरीला आपण कोणते रेट लावले याची प्रशासनाकडे विचारणा केली असता...
  1) Tender items tender rate 2017-18 up to 125%
  2) Above 125% quantity 2020-21

  असे उत्तर देण्यात आलेले आहे.
- म्हणजेच वाढीव कामाला (२५% पर्यंतच्या) २०१७-१८ चे रेट लावले आहेत आणि तद्नंतरच्या १००% वाढीव कामाला २०२०-२१ चे रेट.
- मग असे असतांना १००% वाढीव कामाचे नव्याने निविदा प्रक्रिया राबवुन काम देण्यास प्रशासनास अडचण काय आहे?
- २०२०-२१ चे रेट प्रमाणेच काम द्यायचे आहे तर त्याच ठेकेदाराला वाढीव संविदारकमेप्रमाणे देण्याचा अट्टाहास का ?
- २५% पर्यंतच्या वाढीव कामास CVC Guidelines ची देखील कोणतीही बाधा येत नाही. त्यामुळे २५% पर्यंतचे वाढीव काम त्या ठेकेदाराकडुन (Laxmi-औरंगाबाद) करुन घ्यावे मात्र पुढील संपुर्ण वाढीव कामासाठी नव्याने निविदा प्रक्रिया राबवणेच नियमाला धरुन असेल.
- मुळातच या ठेकेदाराने अद्याप मुळ निविदेतील काम देखील केलेले नाहीच तर आता २ ठेकेदारांनी सदर कामे केली तर निश्चितच ती लवकर पुर्णत्त्वास येतील.

- Civil चे कामास एप्रिल २०२१ पावेतो मुदत होती. ती देखील आता संपलेली आहे. कामास अद्यापही प्रत्यक्ष सुरुवात होऊ शकेल की नाही याबाबत शंकाच आहे. कारण मुळातच Biomining चे तेथील काम अजुनही पुर्ण झालेले नाही. यापुर्वी जी अडचण Civil Work सुरु करणेसाठी होती तीच आजही आहेच.
- Biomining प्रक्रिया कामी डॉकेट मध्ये ३ कोटी ५९ लाख निविदा मंजुर दर नमुद आहे. ३५९ Per Cum असे असतांना त्यांचे Calculation ६.४८ यायला हवे ते ७ कोटी ३३ लाख कसे आले? ४.२७ हा आकडा आला कोठुन ? मुळात इथे Saving दिसायला हवी तेथे प्रशासन वाढ दाखवतयं. Saving का दाखवली नाही?
- प्रशासनाच्या कामकाजावर लोकप्रतिनिधी विश्वास ठेवतात. मात्र इथुन पुढे प्रशासनावर विश्वास ठेवायचा का?
- प्रशासन सभागृहाकडुन चुकीचे ठराव दिशाभुल करुन मंजुर करुन घेतयं.
- Biomining चे ग्लोबल वेस्ट, मुंबई ने अद्याप किती काम केलं आहे? प्रकल्प अभियंता यांना सभागृहाला माहिती द्यावी.
- १ लाख क्युबिक मीटर च काम झालेलं आहे असं प्रकल्प अभियंता यांना आत्ता सांगितलं तर त्यांनी तस महासभेसमोर प्रतिज्ञापत्र करुन द्यावं.
- ग्लोबल वेस्ट, मुंबई यांनी १ लाख क्युबिक मीटर च काम केलं आहे याचे पुरावे प्रशासनाने द्यावे.
- मुळात Biomining चे कामाला जो वेळ लागत असतो त्यानुसार भविष्यात देखील Immediate हे काम पुर्णत्त्वास जाऊन तेथे जागा उपलब्ध होऊन Civil Work सुरु होऊ शकेल अशी खात्री प्रशासन देऊच शकत नाही.
- वाढीव कामाची संविदा करणेस आमचा पुर्णपणे विरोध आहे.
- कोणत्याही लोकप्रतिनिधीचा अगर पदाधिकाऱ्याचा याकामी कोणताही सहभाग नाही. मुळातच ही संपुर्ण प्रशासकीय कामकाजाचा भाग असलेली प्रक्रिया आहे.
- हे प्रशासनाचे षडयंत्र आहे. रोज सायंकाळी मिडीयाला चुकीच्या बातम्या द्यायच्या आणि पदाधिकाऱ्यांना बदनाम करायचं.
- घनकचरा प्रकल्प सुरु करण्यास / कार्यन्वित करण्यास लोकप्रतिनिधींची ना असण्याच काही कारणच नाही.
- मुळात जी समस्या आहे तिला बगल द्यायची त्यावरची उपाययोजना न करता लोकप्रतिनिधी घनकचरा प्रकल्प सुरु होऊ देत नाही अशी ओरड करायची व जनतेच्या रोषाला नगरसेवक व पदाधिकाऱ्यांना सामोरं जायला लावायच.
- घनकचरा प्रकल्पाचे आसपास असलेल्या नागरी वस्तीस सगळयात मोठा त्रास कोणता असेल तर तो आहे नागरी वस्तीतुन रोज जा-ये करणाऱ्या कचरा नेणाऱ्या गाडयांचा. त्यासाठी नागरी वस्ती नसलेले अनेक पर्यायी मार्ग सहज उपलब्ध आहेत. मात्र त्याकडे प्रशासन सोयीस्कर डोळेझाक करतयं.
- आजही हा Revised म्हणुन आणलेला DPR परिपुर्ण नाही. मी यातील तज्ञ नाही तरी यातील त्रुटी सांगु शकते. यात फायर ब्रिगेडची सोय नाही, स्प्रिंकलर नाही.

तरीही सभागृहाने हा प्रस्ताव बहुमताने मान्यच करायचा असे ठरवलेच असेल तर आमचा याला विरोध नोंदवुन घ्यावा. आयुक्तांनी या प्रस्तावाची संपुर्ण जबाबदारी घ्यावी व होणाऱ्या परिणामांची जबाबदारी देखील आयुक्तांनीच स्विकारावी.

आमची मागणी वाढीव संविदेला मान्यता न देता वाढीव कामांची नव्याने निविदा प्रक्रियाच नियमानुसार राबवावी हीच आहे.

सही /-
ॲड.शुचिता अतुलसिंह हाडा
नगरसेविका, म.न.पा.जळगांव

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, महापौरताई.

**मा.महापौर :-** बोला शुचितााताई बोला.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, मागच्या महासभेमध्ये आपण हा विषय तहकुब केला होता आणि सर्वानुमते हा विषय तहकुब करण्यात आलेला होता. त्यावेळेला आपण असे ठरविलेले होते. या घनकचरा प्रकल्पाची सखोल चौकशीची मागणी आपण सगळयांनी एक मुखाने केलेली होती. तर या घनकचरा प्रकल्पाचा डी.पी.आर. जो बदलला आणि जो वाढीव डी.पी.आर. आला. आणि त्यामुळे जो आर्थिक भुर्दंडाचा विषय सगळयांसमोर आलेला आहे. आणि त्यामुळेच आपण मागच्या वेळेस हा विषय तहकुब केला होता. तर त्या संदर्भात प्रशासनाने नेमकी काय कार्यवाही केली. प्रशासनाने सगळयात पहिले आधी एवढया या मुद्दयाचा खुलासा करावा. मग मी टप्या टप्याने पुढे जाईल. कारण एकदम मी माझे सर्व म्हणणे मांडले तर त्याच्यावर सभागृहाला मला काय सांगायचे आहे या गोष्टी कदाचित लक्षात येऊ शकणार नाही. आयुक्तांनी या संदर्भातला खुलासा करावा की, प्रशासनाने नेमकी काय चौकशी केली.

**मा.महापौर :-** प्रशासनाने याबाबतचा खुलासा या ठिकाणी द्यावा.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** मा.महापौर महोदया, मागील ठरावानुसार प्रशासनाने शासनाकडे चौकशीची मागणी केलेली आहे. लिखित मागणी केलेली आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आवाज क्लियर येत नाही.

**श्री.योगेश बोरोले :-** हॅलो, हॅलो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला वाटत, मा.महापौरताई, या संदर्भात मा.आयुक्त साहेबांनी या सगळया गोष्टींच सुस्पष्टपणे सभागृहात जर कधी उत्तर दिली ना तर निश्चितपणे या संदर्भातला सर्व सदस्यांच्या मनामध्ये ज्या काही शंका कुशंका असतील त्या निरसन होण्याच्या संदर्भात मला वाटत की, आयुक्त साहेबांची भुमिका ही महत्वाची ठरेल.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, महापौरताई.

**मा.महापौर :-** बोला अप्पा.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई, फक्त जो कॅमेरा आहे ना. कॅमेऱ्यामध्ये व्यासपीठ काही दिसत नाही. आम्हाला आयुक्त साहेब तर काही दिसतच नाही. म्हणजे ते बोलतांना आम्हाला काही समजणारच नाही. तर त्यांच्याकडेही कॅमेरा करायला लावा. बस बस बस, ओके.

**मा.महापौर :-** ठिक आहे. आयुक्त साहेब आपण खुलासा सादर करावा.

**मा.आयुक्त :-** आदरणीय महापौर, याच्या संदर्भामध्ये आपण यापुर्वी हा विषय सुरुवातीला, १२ ऑगस्टच्या आपल्या बैठकीमध्ये आला होता. यावेळेला सभागृहामध्ये सन्मा.सदस्यांनी आपआपले मुद्दे मांडले आणि त्याच्या मध्ये एक सर्वसाधारण मुद्दा असा आलेला होता की सुरुवातीचा याचा जो प्रकल्प अहवाल आहे. तो ३०.३५ कोटीचा होता. त्याच्यामध्ये काही आपल्याला नगरपालिका स्तरावर अंमलबजावणी करत असतांना काही अडचणी उद्‌भवल्या. आणि या अडचणी सोडविण्यासाठी आपल्याला तो प्रकल्प अहवाल सुधारीत करण्याची गरज भासली आणि मग तो सुधारीत प्रकल्प अहवाल आपण बनविला, हा अहवाल बनवित असतांना याच्यामध्ये स्थानिक परिस्थिती, याच्यामध्ये स्वच्छ भारत अभियानच्या अंतर्गत असलेले वेगवेगळे निकष आणि सुचना, त्याच्यानंतर याच्यामध्ये सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटचे जे रूल्स आहे २०१६ याच्यामध्ये घालुन दिलेली महानगरपालिकेची बंधनं, या सगळयांचा विचार करुन आपण तो सुधारीत प्रकल्प अहवाल बनविला, आणि साधारणता तो ४९ कोटीचा प्रकल्प अहवाल हा आपण राज्य शासनाकडे सुधारीत मान्यतेला पाठविणेसाठी सन्मा.महासभेसमोर आपण ठेवला होता. आणि डिसेंबर २०२० मध्ये आपण महासभेमध्ये याला एकमताने मान्यता दिली. आणि तो सविस्तर प्रकल्प अहवाल हा राज्य शासनाकडे पाठविला, राज्य शासनाकडुन त्याला तांत्रिक मान्यता सुरुवातीला, महाराष्ट्र जिवन प्रधिकरणाकडुन घेण्यात आली. त्याच्यानंतर राज्याच्या मा.मुख्यसचिवांच्या अध्यक्षते खाली एक उच्चाधिकार समिती आहे. हायपावर कमिटी, त्या कमिटी समोर हा विषय गेला. त्या कमिटीने त्याला मान्यता दिली. आणि त्याच्यानंतर राज्य शासनाने याला अंतिम रित्या आपल्याला ४९ कोटीला प्रशासकीय मान्यता दिली. आता ४९ कोटीला प्रशासकीय मान्यता देत असतांना हा जो वाढीव निधी आहे. पहिला आपला ३० पॉईंट समथिंग होता आणि आता ४९ पॉईंट आलेला आहे. तर त्याच्या मध्ये १८ ते १९ कोटीची जी वाढ झालेली आहे. या वाढीच्या संदर्भात राज्य शासनाने जे धोरण स्विकारलेले होते. या धोरणाला अनुसरुन त्यांनी आपल्याला ही सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली. त्याच्यामध्ये त्यांनी अट अशी घातली की, त्याला राज्य शासनामार्फत निधी उपलब्ध होणार नाही. याच्यासाठीचा जो निधी आहे. तो महानगरपालिकेने एकतर स्वत:च्या निधी मधुन उपलब्ध करुन घ्यावा किंवा जर महानगरपालिकेकडे १४ व्या वित्त आयोगाचा निधी शिल्लक असेल, तर त्या मधुन निधी द्यावा. हे धोरण किंवा या ऑप्शन पैकी एक ऑप्शन स्विकारण्याचा अधिकार हा महानगरपालिकेला

दिला होता म्हणुन आपण हा विषय मागच्या जुलै महिन्यामध्ये महासभेसमोर ठेवलेला होता. आता याच्यामध्ये या सगळया पार्श्वभुमीवर चर्चा होत असतांना ३० कोटीचा डी.पी.आर. वाढुन हा ४९ कोटी झाला. आणि त्याच्यामुळे जे काही वाढीव खर्च आला तो आता राज्य शासनाकडे आपल्या अनुदान स्वरूपात काही मिळणार नाही. त्यामुळे महानगरपालिकेच त्याच्यामध्ये नुकसान होणार आहे किंवा संपुर्ण निधी महानगरपालिकेला स्वत:कडे उपलब्ध असलेल्या १४ वा वित्त आयोग असेल किंवा स्वत:चा निधी असेल. याच्यामधुन घालावा लागेल. याच्या संदर्भामध्ये जो कोणी अधिकारी किंवा संस्था या सुरुवातीचा जो डी.पी.आर. आपल्या काही त्रुटीयुक्त तयार झाला, याची जबाबदारी निश्चित करावी. याची चौकशी करावी आणि तो पर्यंत हा विषय तहकुब अश्या प्रकारचा आपण निर्णय घेतला होता, या निर्णयानंतर आपण १२ ऑगस्टच्या बैठकीमध्ये हा विषय घेतल्यानंतर २४, २५ आणि २६ ऑगस्टला आपल्याकडे महाराष्ट्र राज्याच्या विधान मंडळाची सन्मा.अंदाजपत्रक समिती ही जळगांव जिल्हयाच्या दौऱ्यावर आलेली होती. या दौऱ्यावरती आल्यानंतर महानगरपालिकेशी संबंधीत जे काही विषय त्या समितीसमोर चर्चेला घेण्यात आले होते. त्यामध्ये घनकचरा प्रकल्पाचा जो सविस्तर प्रकल्प अहवाल आहे. त्याच्यामध्ये वाढ होणे हा एक मुद्दा सन्मा.समितीसमोर चर्चेला आला होता. आणि समितीने याच्यामध्ये अश्या प्रकारचा मुद्दा उपस्थित केला होता की, जर त्रुटीयुक्त डी.पी.आर. झाला असेल तर त्याची जबाबदारी निश्चित करावी. आणि मग महानगरपालिकेवरती अतिरिक्त बोझा आला किंवा काय ? याची तपासणी करावी. या बैठकीमध्ये महानगरपालिकेच्यावतीने या मुद्दयाचा खुलासा करत असतांना, त्याच्यामध्ये प्रशासनाच्यावतीने असे सांगण्यात आले होते की, हा जो काही डी.पी.आर. आहे. हा डी.पी.आर. जो बनविलेला होता, तो केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्यामध्ये महाराष्ट्र सरकारने घेतलेला जो निर्णय होता, स्वच्छ भारत अभियान याच्यासाठी एक स्वतंत्र संचालनालय हे महाराष्ट्र राज्यामध्ये स्थापन झालेले आहे. स्वच्छ महाराष्ट्र संचालनालय, या संचालनालयामार्फत राज्यातल्या वेगवेगळया प्रशासकीय विभागांसाठी एक एजन्सी नियुक्त करण्यात आलेली होती. या शासनाच्या निर्णयाला अनुसरुन नाशिक विभागासाठी म्हणजे नाशिक डिव्हीजन ऑफिस, ज्याच्यामध्ये नाशिक, धुळे, नंदुरबार, नगर आणि जळगांव अश्या ५ जिल्ह्यांचा समावेश आहे. या नाशिक विभागासाठी राज्य शासनाच्या या संचालनालयामार्फत निविदा प्रक्रियेने ईकोप्रोन इंदौर नावाची एक संस्था त्याच्यामध्ये नियुक्त केली गेलेली होती. त्या संस्थेमार्फत स्ट्रीट वेस्ट मॅनेजमेंट रूल्स-२०१६ विचारात घेवुन अश्या प्रकारचा डी.पी.आर. बनवावा. अश्या प्रकारचे राज्य शासनाचे संस्थेला सुचना होत्या. त्याला अनुसरुन या संस्थेने हा डी.पी.आर. बनविला, या संस्थेची डी.पी.आर. बनविण्यासाठी जी काही फी आहे. प्रोफेशनल फी ती सुध्दा राज्य शासनानेच अदा केलेली आहे. कारण नियुक्ती राज्य शासनाने केलेली होती. हा डी.पी.आर. मान्यतेसाठी पाठविण्यापुर्वी महानगरपालिकेचा हा डी.पी.आर. आहे म्हणुन महानगरपालिकेच्या महासभेत त्याला मान्यता आवश्यक होती. त्यावेळेला आरोग्य खात्यामार्फत हा डी.पी.आर. हा महासभेसमोर ठेवण्यात आला होता २०१७-१८ मध्ये आणि मग तो डी.पी.आर. आपल्यासमोर ठेवल्यानंतर आपण त्याला ३० कोटीला आपण प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेसाठी महासभेने शिफारस केली. त्याप्रमाणे हा प्रस्ताव पाठविण्यात आला. या प्रस्तावाची तांत्रिक छाननी जिवन प्राधिकरणामार्फत करण्यात आली. आणि तांत्रिक दृष्टया हा जो बनविलेला डी.पी.आर. आहे तो योग्य आहे. याची खात्री जिवन प्राधिकरणाच्या मुख्य-अभियंता स्तरावर झाल्यानंतर याला तांत्रिक मान्यता देण्यात आली. याच्या मध्ये घनकचऱ्यावर जी प्रक्रिया करायची आहे. या प्रक्रियेसाठी जी जी काही टेक्नोलॉजी म्हणजे तंत्रज्ञान त्याच्या मध्ये वापरण्यात येणार होते. याच्या बाबतीमध्ये नेरी नागपुर या संस्थेकडुन याचा टेक्नीकल अपराईझल हे करुन घेण्यात आलेले होते. राज्य शासनाकडुन, या टेक्नीकल अपराईझल आणि जिवन प्राधिकरणाकडुन मिळालेली टेक्नीकल सॅन्कशन या दोन्हीच्यानंतर त्याही वेळेला हा विषय राज्य शासनाच्या मुख्यसचिवांच्या अध्यक्षतेखालच्या उच्च अधिकार समितीसमोर गेला.समितीने त्याची छाननी करुन त्याला मान्यता दिली आणि अंतिमत: राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडुन त्याला आपल्याला प्रशासकीय मान्यता मिळाली. या प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर याच्यामध्ये जे वेगवेगळे घटक आहे. प्रामुख्याने याच्यामध्ये जर बघितले तर त्याच्यामध्ये काही आरोग्य खात्याला कचरा वाहतुक करण्यासाठी कचरा गोळा करण्यासाठी लागणाऱ्या वाहनांची त्याच्यामध्ये समावेश आहे. शहर मध्ये वेगवेगळया ठिकाणी बायोगॅस प्लान्ट बांधणे त्याच्या मध्ये समाविष्ट आहे. आपली आव्हाणे शिवारामध्ये जी जागा आहे त्या ठिकाणी आपल्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्प आणि सॅनिटरी लॅन्डफिल उभी करायची आहे. याच्यासाठी लागणारा सिव्हील वर्क आणि प्लॅन्ट म्हणजे मशिनरी, याच्यासाठीची तरतुद आहे. जो आपला वर्षानुवर्ष त्या ठिकाणी साठुन राहिलेला जो कचरा आहे. त्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी बायोमाईनींगची तरतुद आहे. शहरामध्ये वेगवेगळया ठिकाणी आपण जो कचरा गोळा करतो. आणि आपल्या डंम्पर

मध्ये किंवा कॉम्पॅक्टर मध्ये आपण स्थलांतरीत करतो. यासाठी आपले ट्रान्सपोर्टेशन या सगळयांचा त्याच्यामध्ये समावेश आहे. आता याची अंमलबजावणी करत असतांना तत्कालीन आपल्या प्रशासनाच्या लेव्हलवरती आपण याचे दोन भाग केले. एक सिव्हील इंजिनिअरींग डिपार्टमेंट मार्फत त्या ठिकाणचा जो प्रकल्प उभा करायचा आहे. त्याची साधारणता १२.२५ कोटीच्या संदर्भामधली इस्टीमेट आणि त्याची टेन्डरींगची प्रक्रिया ही आपल्या बांधकाम विभागामार्फत म्हणजे प्रकल्प विभागामार्फत करण्यात आली. आणि जी काही वाहने खरेदी करायची होती. साधारण ७ ते ७.५ कोटीची ती वाहने आरोग्य खात्यामार्फत GEM Portal वरुन खरेदी केलेली आहे. आता हे टेन्डर काढत असतांना ज्या वेळेला हा प्रकल्प **अंमलबजावणीसाठी** पहिले आपल्या इंजिनिअरींग डिपार्टमेंटकडे गेला. त्यावेळेला निविदा काढत असतांना त्याच्यामध्ये डिटेल ड्राईंग, डिझाईन, टेक्नीकल स्पेसिफीकेशन, या सगळया बाबींची त्याच्या मध्ये आवश्यकता वाटली. आणि या सगळयाच्या बाबतीमध्ये त्याच्यामध्ये काही त्रुटी असल्याचे ज्यावेळी निदर्शनाला आले त्यावेळेला या त्रुट्यांच्या बाबतीमध्ये आपण या संस्थेशी संपर्क साधला जी एजन्सी नियुक्त केलेली होती ईकोप्रोन, त्या संस्थेकडुन आपल्याला हवा तसा इनपुट मिळत नाही म्हटल्यानंतर आपण राज्य शासनाच्या स्वच्छ भारत संचालनालयामार्फत त्यावेळेला आपल्या इंजिनिअरींग डिपार्टमेंट मार्फत करसपॉन्डन्स झाला, मला मिळालेल्या माहिती प्रमाणे याच्या संदर्भामध्ये मुंबई मध्ये एक बैठक झाली होती आपले आरोग्य अधिकारी त्यावेळेचे आणि त्यावेळेचे उपायुक्त हे त्या बैठकीला उपस्थित होते. आणि आपण आपल्या या निविदे काढण्याच्या संदर्भामधल्या ज्या काही तांत्रिक अडचणी आहेत. ते आपण स्वच्छ महाराष्ट्र संचालनालयाला कळविल्या. परंतु त्या संस्थेकडून आपल्याला लागणारी तांत्रिक माहिती आवश्यक होती. ती काही माहिती मिळु शकली नाही. आणि याच्या संदर्भामध्ये लवकरात लवकर हा प्रोजेक्ट मार्गी लावावा. म्हणुन आपण त्याची निविदा प्रक्रिया आपल्या स्वत:च्या स्तरावर पुर्ण केली. आणि याच्यामध्ये येणाऱ्या अडचणीसाठी एक सेल्फइम्याजिनेशन म्हणजे स्वसंकल्पनेतुन आपण या प्रकारचा डी.पी.आर. सुधारीत करावा. अश्या प्रकारचा तो प्रशासनाच्या स्तरावर निर्णय घेण्यात आला.आणि याच्या मधल्या ज्या काही त्रुटी आहेत. या त्रुटी जाणुन घेण्यासाठी त्यावेळेला त्यावेळेचे सिटी इंजिनिअर, त्यावेळेचे प्रकल्प अभियंता, त्यावेळेचे आयुक्त यांनी औरंगाबादला जो प्रोजेक्ट पुर्ण जाणुन कमिशन झालेला होता. त्या प्रकल्पाला विझिट दिली आणि त्या प्रकल्पाची पाहणी केली. आणि तो प्रकल्प आणि आपल्याकडचा **असलेला** डी.पी.आर. या दोन्हीचा विचार करुन आपल्या डी.पी.आर. मध्ये ज्या कमतरता जाणवत आहे या कमतरता दुर करण्यासाठी तो डी.पी.आर. आपण सुधारीत केला. आता हा सुधारीत डी.पी.आर. पुन्हा मी आता सांगितल त्याप्रमाणे तो प्रक्रियेमधुन गेला. आता ज्या वेळेला निधी उपलब्धतेचा विषय महासभेसमोर आला. त्यावेळेला आपण त्याच्यामध्ये प्रथमदर्शनी असे म्हटले की, हा जो डी.पी.आर. चुकीचा झालेला आहे. याची जबाबदारी निश्चित करावी. अपेक्षा अशी होती की, कदाचित हा डी.पी.आर. महानगरपालिकेच्या स्तरावरुनच अंतिम रित्या तयार झाला असेल.तर त्याची जबाबदारी महानगरपालिकेच्या **स्तरावर** निश्चित करणे शक्य आहे. परंतु या सगळयांची चर्चा ही सन्मा.अंदाजपत्रक समिती समोरही झाली. त्याही वेळेला त्याच्यामध्ये हा मुद्दा लक्षात आणुन देण्यात आला की, हा जो डी.पी.आर. सुरुवातीला बनला. याच्या मध्ये केवळ महानगरपालिका स्तरावर कार्यवाही झालेली नाही. त्याची महानगरपालिका आणि राज्य शासनाचे वेगवेगळे विभाग यांच्या स्तरावरती कार्यवाही झालेली आहे. आणि याच्यामध्ये मल्टीपल एजन्सीज इनव्हॉल आहे. एक स्वच्छ महाराष्ट्र संचालनालय आहे. त्यांनी नियुक्ती केलेली एजन्सी आहे. महापालिका आहे. जिवन प्राधिकरणाने तांत्रिक मान्यता दिलेली आहे. निरीने त्याचे तांत्रिक मुल्यमापन केलेले आहे. हायपावर कमिटीने त्याला मान्यता दिली आहे. आणि अंतिमत: राज्य शासनाने याला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. असे वेगवेगळया विभागाकडुन आणि वेगवेगळया स्तरावरती याची मान्यतेची प्रक्रिया झालेली असेल. तर या सगळया ज्या यंत्रणा आहेत. या यंत्रणा राज्य शासनाच्या अन्डर काम करतात. महापालिकेच्या नाही. त्यामुळे याच्यामध्ये नेमकी चुक कोणाकडुन झाली एकतर त्रुटी राहिली का ? राहिली असेल तर कोणाकडुन झाली. आणि मग ती त्याच वेळेला का निदर्शनास आणुन दिली नाही. या सगळयाबाबी या पुर्ण सगळया यंत्रणांवरती ज्यांचे प्रशासकीय नियंत्रण आहे. असे राज्य शासनामार्फतच याच्या बाबतीमधली याची पुढची कार्यवाही म्हणजे चौकशी असेल किंवा जबाबदारी निश्चित असेल ही करणे आवश्यक आहे. ही बाब सन्मा.अंदाजपत्रक समितीच्या निदर्शनालाही आणुन दिलेली आहे. सन्मा.अंदाजपत्रक समितीने सुध्दा याच्या बाबतीत सहमती दर्शविली आणि याच्या बद्दलचा प्रस्ताव राज्य शासनाला पाठवावा अश्या प्रकारच्या सुचनाही त्या वेळेला दिल्या. याला अनुसरुन सप्टेंबर २०२१ मध्येच हा प्रस्ताव सन्मा.अंदाजपत्रक समितीने दिलेल्या सुचना आणि आदरणीय महासभेने केलेला ठराव हा एकत्रितपणे आपण राज्य शासनाला पाठविला. हा राज्य शासनाला पाठविल्यानंतर सप्टेंबर २१-२२ म्हणजे २१-२२ सप्टेंबर २०२१ याला अंदाजपत्रक समिती समोर हा जो आपला नगरविकास विभाग आहे या नगरविकास विभागाच्या प्रधानसचिवांची साक्षी

झाली. या साक्षीच्या वेळेला. महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त असतील आणि शहर अभियंता किंवा त्या अभियंता स्तरावरचे अधिकारी हे ही त्यांना उपस्थित राहण्याच्या सुचना होत्या. याची सविस्तर चर्चा त्या ठिकाणी झाली. आणि राज्य शासनाने याच्या बाबतीमध्ये हा जो काही सुरुवातीचा डी.पी.आर. बनविला. हा डी.पी.आर. खरोखर त्रुटीयुक्त होता का? याच्यामध्ये सुधारणा करण्याची का गरज भासली. आणि याच्यामध्ये काही जबाबदारी निश्चित करण्याची काही आवश्यकता आहे का ? याच्याबद्दलची चौकशी करुन अहवाल सादर करावा. अश्या प्रकारचे सुचनाही राज्य शासनालाही त्याच्यामध्ये अंदाजपत्रक समितीच्या चर्चेमधुन मिळाल्या. आणि याच्या प्रमाणे पुढील कार्यवाही आता राज्य शासनामार्फत अपेक्षित आहे. आपण आपला प्रस्ताव दिलेला आहे. याच्या संदर्भामध्ये महानगरपालिका स्तरावरुन झालेली कार्यवाही, महानगरपालिकेला निविदा प्रक्रिया राबवत असतांना येणाऱ्या अडचणी, या बाबतीमध्ये जे जे मुद्दे राज्य शासनाकडुन विचारण्यात आले. याच्याबाबतीमध्ये राज्य शासनाला आपण आपली वस्तुस्थिती किंवा खुलासा हा कळविलेला आहे. आता याच्यामध्ये सुधारीत डी.पी.आर.करण्याची गरज, याच्यामध्ये होणारा वाढीव खर्च तो निधी उपलब्धतेबाबती मधली पुढची कार्यवाही, आणि याच्यामध्ये जर काही त्रुटी राहिल्या असतील. तर या त्रुटींची प्रशासकीय जबाबदारी निश्चित करायची का ? आणि करायची असेल तर ती कोणावर. ही सगळी प्रक्रिया ही राज्य शासनाचे नगरविकास विभागामार्फत आता होणे अपेक्षित आहे. आणि त्याची प्राथमिक कार्यवाही ती सुरु झाल्याचे नगरविकास विभागाच्या स्तरावरुन दिसत आहे. त्यामुळे आता याबाबतीमध्ये कुठल्याही प्रकारची प्रक्रिया ही महानगरपालिकेच्या स्तरावर प्रलंबीत नाही. आता मुळ विषय जो आपल्यासमोर आहे. तो हा प्रकल्प मार्गी लावण्याच्या संदर्भामध्ये आपण जी निविदा प्रक्रिया राबविलेली आहे. त्याच्या आधारे वाढीव खर्चाची तरतुद आपण करणे, ही तरतुद राज्य शासनाने आपल्याला दोन पर्याय दिलेले आहे. एक १४ व्या वित्त आयोगाचा निधी किंवा स्वनिधी, याच्या मधुन निधी उपलब्ध करणे आणि आपल्याला पुर्वीची ३० कोटीत आपण १२ कोटीचे आपण टेन्डर काढले होते सिव्हील वर्कचा त्याच्या ऐवजी आता जे काही वाढीव होणार आहे. याची वाढीव संविदा संबंधीत एजन्सी बरोबर करणे आणि हा प्रकल्प मार्गी लावणे, याचे धोरणात्मक निर्णयासाठी आपल्या समोर हा विषय आलेला आहे. आता याच्यामध्ये जी काही वाढ झालेली आहे. या वाढीच्या संदर्भामध्ये आपल्याकडे आव्हाणे शिवाराचे कचरा प्लॅन्टवरती जो काही कचरा पडुन आहे. त्या कचऱ्यावरती आपल्याला प्रक्रिया करणेसाठी बायोमाईनिंग पध्दतीने कचऱ्यावरती आपल्याला प्रक्रिया आता जुन्या कचऱ्यावरती करायची आहे. याच्यासाठी सुरुवातीच्या डी.पी.आर.मध्ये एक लाख घनमिटर ऐवढी क्वॉन्टीटी आपण अपेक्षित धरली होती की, जे काम पुर्ण झालेले आहे. तथापी अद्यापही त्याच्यावरती जवळपास ८०-९० हजार घनमिटर कचरा पडुन असल्याचे हे ऑक्टोबर २०२० मध्ये ज्या वेळेला आपण प्रकल्प अहवाल सुधारीत करायचे ठरविले होते. त्यावेळेला घेतलेल्या मोजमापाच्या आधारे लक्षात आलेला आहे. ऑक्टोबर २०२० पासुन आज तागायत प्रकल्प पुर्ण होईपर्यंत आपला दैनंदिन कचरा हा आव्हाणे शिवारातच नेऊन टाकतो आहे. त्यामुळे याच्यामध्ये सुध्दा बायोमाईनिंगच्या क्वॉन्टीटी मध्ये वाढ होणार आहे. परंतु याच्यामध्ये राज्य शासन स्तरावरुन जी हालचाली चालु आहे. याच्या संदर्भामध्ये जी तोंडी चर्चेमधुन मिळालेली माहिती आहे. ती सभागृहासमोर ठेवायला हरकत नाही. वाढीव कचऱ्यावरती जी काही आपल्याला प्रक्रिया करण्यासाठी बायोमाईनिंग पध्दतीने येणारा जो काही खर्च आहे. जो आता डी.पी.आर.मध्ये आपण वाढीव खर्च आपण ३ कोटी धरलेला आहे. कदाचित तो वाढुन ही आपल्याला जास्त येईल. या वाढीव खर्चावरती राज्य शासनाकडुन आणि केंद्र शासनाकडुन या स्वच्छ भारत अभियानाच्या संदर्भामध्ये जो काही आर्थिक आराखडा आहे. फायनॅन्शीयल पॅटर्न आहे. यानुसार आपल्याला अनुदान मिळण्याची शक्यता आहे. अर्थात अधिकृतपणे निर्णय अद्याप झालेला नाही. परंतु राज्य शासन अश्या प्रकारचा निर्णय घेण्याच्या मनस्थिती मध्ये आहे. त्या बद्दलची आकडेवारी सगळी नगरपालिका, महानगरपालिकांकडुन गोळा करण्यात येत आहे. आपण ही आपली माहिती त्याच्यामध्ये दिलेली आहे. त्यामुळे हा जो वाढीव खर्च आहे. त्याच्यापैकी बायोमाईनिंगवर होणाऱ्या खर्चाला हा आपल्याला काही प्रमाणात अनुदान मिळणार आहे. आता मुळ प्रकल्प जर आपण विचारात घेतला, या मुळ प्रकल्पामध्ये सुध्दा १००% अनुदान नाहीत. याच्यामध्ये जो ३० कोटीचा प्रकल्प मंजुर झाला. याच्यापैकी ३५% अनुदान हे आपल्याला केंद्र शासनाकडुन मिळणार आहे. २३.६६% हे ऐवढ जे अनुदान आहे हे आपल्याला राज्य सरकार कडुन मिळणार आहे. आणि ४१.३३% ऐवढ अनुदान हे आपल्याला महानगरपालिकेकडुन म्हणजे साधारणपणे ४२% ची तरतुद ही आपल्याला महानगरपालिकेला करावीच लागणार.म्हणजे आता सुध्दा आपण जी तरतुद करतो आहे ही १००% राज्य शासनाकडुन मिळणे आपल्याला अपेक्षित नाही. यापैकी ४२ कोटीचा खर्च हा महानगरपालिकेला पुर्वीही करावा लागला असता आजही करावा लागणार. आता मुद्दा त्याच्यामध्ये ऐवढाच राहतो की, जी काही सुधारीत प्रकल्प अहवाल आपण बनविला. याच्यामध्ये आपल्याकडच्या

गरजा विचारात घेवुन आपल्या इंजिनिअरींग डिपार्टमेंटला त्याच्यामध्ये ज्या त्रुटी जाणविल्या. या त्रुटीप्रमाणे आपण याचा जो सिव्हील वर्कच इस्टीमेट आहे. ते आपण सुधारीत केल.आणि जिवन प्राधिकरणाने सुध्दा त्याच्यामध्ये योग्य असल्याची खात्री केल्यानंतर त्याला तांत्रिक मान्यता दिलेली आहे. आणि राज्य शासनाने त्याला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तर त्यामुळे ४९ कोटीच्या डी.पी.आर.ची आवश्यकता आहे का ? याची वेगवेगळया स्तरावरती याची छाननी झाल्यामुळे हा ४९ कोटीचा डी.पी.आर. आपल्याला आवश्यक आहे. याच्यामध्ये इन्वायरमेंट प्रोटेक्शन ॲक्ट जो आहे आपला पर्यावरण संरक्षण कायदा किंवा याच्यामध्ये सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटचे रूल -२०१६ याच्या संदर्भामध्ये आदरणीय सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल झालेली एक अलमित्रा पटेल विरुध्द युनियन ऑफ इंडिया याच्या संदर्भमधला दाखल झालेला दावा, या दाव्यानंतर **राष्ट्रीय** हरीत प्राधिकरणाकडे चालु असलेली केस आणि याच्या संदर्भात झालेले वेगवेगळे निकाल बघता, सगळया स्थानिक स्वराज्य संस्थांना शास्त्रोक्त पध्दतीने कचऱ्याची विल्हेवाट लावणे,हे कायदेशीर बंधनकारक आहे. अश्या प्रकारच्या आदरणीय सुप्रिम न्यायालय आणि नॅशनल ग्रिन ट्रायब्युनलच्या सुचना आहेत. आपल्यालाही ते लागु आहे. सर्व महानगरपालिकांना याच्यामध्ये पोल्युशन कन्ट्रोल बोर्डाने राष्ट्रीय हरीत लवादाच्या प्राधिकरणाच्या सुचनेनुसार दिलेल्या नोटीस प्रमाणे आपल्या आपण जर हे प्रकल्प वेळेवर मार्गी लावला नाही. तर दरमहा १ लाख पासुन तर १० लाख पर्यंत दंड सुध्दा करण्याबाबत हे सर्व महानगरपालिकांना अगाऊ सुचना दिलेल्या आहेत. त्यामुळे कायदेशीर बंधन आपले विचारात घेता, आपण याच्यावर तातडीने निर्णय घेवुन आपल्याला हा प्रकल्प मार्गी लावणे आवश्यक आहे. दुसरा जो महत्वाचा मुद्दा जो आपण यामध्ये विचारात घेणे आवश्यक आहे तो असा की, हा प्रकल्प त्यावेळेला ३० कोटीचा बनला, आज आपण हा प्रकल्प, ज्या वेळेला सुधारीत प्रकल्प अहवाल आपण हा २०२०-२१ मध्ये तयार करुन पाठविला, त्यावेळेस तो ४९ कोटीचा बनला, आता याच्यामध्ये फक्त दरवाढ आहे का ? तर फक्त दरवाढ नाही. कित्येक गोष्टी अश्या होत्या की, ज्यामुळे डी.पी.आर.मध्ये समाविष्ट करणे आवश्यक होत. परंतु त्या झाल्या नाही. एक साध उदाहरण जर याच्यामध्ये घ्यायच म्हटल, तर आपल्याला ही ऐकल्यानंतर हे थोडेसे आश्चर्य वाटेल की, संपुर्ण आव्हाणे शिवार कचरा प्रकल्पाची जी आपली जागा आहे. या जागेला कुंपन घालण्यासाठी याच्यामध्ये फक्त ६ लाखाची तरतुद आहे. आता ६ लाखामधुन आपण ऐवढया मोठया जागेला कुंपन घालु शकत नाही. जी कुंपनाचे टेक्नीकल स्पेसिफीकेशन आहे. ते काटेरी तार बार्ड वायर फॅन्सींगच आहे. आता आव्हाणे शिवारची जागा आणि त्या ठिकाणची परिस्थिती जर बघितली तर आपण ऐवढा मोठा कोट्यावधी रुपये खर्च करुन त्या ठिकाणी मशिनरी बसविणार आहोत. तो प्रकल्प राबविणार आहोत. अश्या वेळेला त्याठिकाणी काटेरी तारेच कुंपन योग्य नाही. आणि तेही अर्थात ६ लाखात होणार नाही. त्यामुळे आपल्याला संपुर्ण जागेला कुंपन भिंत म्हणजे कंपाऊंड वॉल बांधणे गरजेचे आहे. अश्या प्रकारचे अनेक आईटम त्याच्यामध्ये आहेत.जे इंजिनिअरींग डिपार्टमेंट अधिक तपशीलवार पणे आपल्याला सांगु शकेल. या सगळया आवश्यक बाबींची पुर्तता करण्याच्या दृष्टीनेच आपण हा डी.पी.आर. बनविलेला आहे. या सगळयाबाबी जरी २०१६-१७ मध्ये विचारात घेतल्या असल्या तरी तो अर्थातच ३० कोटी मध्ये या सगळयाबाबींचा समावेश झाला नसता. आज जरी त्याचा ४९ कोटीवरती डी.पी.आर. गेला असता, गेला आहे. तरी सुध्दा त्यावेळेला हा डी.पी.आर. बनविला गेला असता सगळया आवश्यक बाबींच्या पुर्ततेसह तर तो निश्चितच ३० कोटीपेक्षा जास्त आणि ४९ कोटीपेक्षा कमी तेवढयाचा झाला असता, समजा तो ४०-४२ कोटीचा जरी झाला असता, तरी सुध्दा त्याच्यावर आपल्याला ४२% ची तरतुद ही करावी लागली असती. तिसरी महत्वाची गोष्ट, आपण ज्या वेळेला १२.२५ कोटीच टेन्डर २०१८-१९ मध्ये काढल, त्यावेळेला जे टेन्डर आल होत ते १८.९१, १८. काही तरी अबो आलेल होत. परंतु ते २०१९-२० च्या दराला ४.९१% बिलो होत, म्हणजे त्यावेळेला सुध्दा आपल्याला केवळ सिव्हील वर्क वरती २.२५ कोटी रुपये हा जादा खर्च येणार होता. त्याला त्यावेळेच्या स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. राज्य शासनाच धोरण अस आहे की, निविदा मधुन जर प्रकल्पाचा खर्च वाढणार असेल तर तो खर्च महानगरपालिकेने करणे गरजेचे आहे आणि याला अनुसरुन आपण सप्टेंबर २०१९ मध्ये जेव्हा ही निविदा मंजुर केली. त्यावेळेला सुध्दा वाढीव २.२५ कोटी रुपयाच्या खर्चाला आपण मनपा निधी मधुन मान्यता दिली किंवा १४ व्या वित्त आयोगामधुन आपण तो खर्च करु शकतो. अश्या प्रकारे निविदा २०१६-१७ च्या दरावरती अबो, करंट डी.एस.आर.ला मात्र बिलो अश्या प्रकारे जो वाढीव खर्च आहे. तो जो वाढीव खर्च आहे तो सुध्दा आपण सुधारीत डी.पी.आर. मध्ये समाविष्ट करुन घेतलेला आहे. त्यामुळे निविदा अबो आल्यामुळे जो होणारा खर्च आहे. त्याचाही समावेश आता या ४९ कोटीमध्ये आहे. त्यामुळे केवळ डी.पी.आर. सुधारीत करण्यामुळे ४९ कोटी आले. असे आपल्याला एक अर्थाने म्हणता येणार नाही. ही सगळी तपशीलवार परिस्थिती विचारात घेता, आपण महासभेमध्ये हा प्रकल्प तातडीने मार्गी लावणे गरजेचे आहे .ही बाब विचारात घेवुन

आपल्याला निधीची उपलब्धता करावी लागेल. तो निधी उपलब्ध करण्यासाठी आपल्याला मनपा निधीतुन ऐवढा निधी उपलब्ध करणे शक्य नाही म्हणुन आपल्याला १४ व्या वित्त आयोग हा एकमेव पर्याय आहे. अस जरी असल तरी सुध्दा आपण वाढीव निधीसाठी राज्य शासनाकडे प्रयत्न करायला आपल्याला काही हरकत नाही. जर राज्य शासनाने स्वच्छ भारत अभियान २ याच्यामधुन जर काही धोरण बदलल आणि जर राज्यासाठी वेगळा निर्णय घेतला, तर आपल्यालाही त्याचा काही फायदा होवु शकतो, पण आजच्या तारखेला या निधीची व्यवस्था हे आपल्याला महानगरपालिका स्तरावर उपलब्ध असलेल्या निधीतुनच करावी लागणार आहे. तर माझी महासभेला विनंती राहील की, ही सगळी सविस्तर परिस्थिती विचारात घेवुन आपण या प्रकल्पाला निधी उपलब्ध करुन देणे आणि याच्या वाढीव रकमेची संविदा करणे याच्या बाबतीमध्ये महानगरपालिकेच्या हिताचा विचार करुन आपल्याला निर्णय घेणे आवश्यक आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, आता आयुक्त साहेबांनी त्यांच्या परीने या विषयासाठी सभागृहाला कनव्हीन्स करण्याचा प्रयत्न केलेला आहे. माझा खरं तर आयुक्त साहेबांना खुप छोटासा प्रश्न होता की, तुम्ही चौकशी नेमकी काय केली. आयुक्तांनी विषयाच्या सुरुवातीपासुन शेवटपर्यंत पुन्हा एकदा मागच्या महासभेमध्ये जेव्हा आपण हा विषय तहकुब ठेवला होता. त्यावेळेला जवळपास ज्या ज्या चर्चा झाल्या होत्या, जे जे मुद्दे आले होते. तसेच जवळपास पुन्हा एकदा सांगितले, त्यांनी राज्य शासनाच्या समितीकडे ही चौकशी प्रस्तावीत झालेली आहे आणि त्यांच्या मार्फत चौकशी होत आहे वगैरे स्वरुपाची आता आपल्याला सभागृहाला माहिती दिली. आयुक्त साहेब तुम्ही सद्या एक खुप चांगला पायंडा पाडलेला आहे. काही विषयांसंदर्भात, जस्ट नुकतच घरपट्टीच्या विषयासंदर्भात आम्हाला आणि सर्व पक्षीय गटनेत्यांना आणि काही प्रमुख पदाधिकाऱ्यांना महापौर दालनामध्ये बोलवुन त्या संदर्भात चर्चा वगैरे करण्यात आली होती. मग आता आपण या चौकशीच्या बद्दलच्या विषयाकडे आपण पुन्हा एकदा वळुया. जसे आम्हाला प्रमुख पदाधिकाऱ्यांना आणि गटनेत्यांना विश्वासात घेवुन एखाद्या विषयावर प्रशासन आमच्याशी चर्चा करतो. आणि त्यानंतर निर्णयाच्या दिशेने वाटचाल करण्याकडे प्रयत्न करतो. तर तसेच हा इतका महत्वाचा आणि मागच्या महासभेमध्ये ज्यावर गदारोळ झाला. एकमुखाने विषय तहकुबची मागणी झाली आणि तहकुब कशासाठी करा. तर तत्कालीन आयुक्तांपासुन जे जे कोणी अधिकारी या विषयामध्ये दोषी आहेत. त्याच्यावर कार्यवाही प्रस्तावीत करण्यासाठी विषय तहकुब करा अशी त्यावेळेला एकमुखी मागणी होती. मात्र प्रशासनाने आता सुध्दा कोणत्याच पदाधिकाऱ्याला विश्वासात घेतले नाही. आज सभागृहासमोर जी माहिती दिली. ती प्रशासनाने खरं तर एक अनौपचारीक मिटींग लावुन प्रमुख पदाधिकाऱ्यांना तरी निदान द्यायला हवी होती. म्हणजे काय होत आहे की, प्रशासनाची भुमिका संशयास्पद निर्माण होते. प्रशासन नक्की काय लपवितो आहे. मुळात आता येथे चित्र अस रंगविण्यात आलेल आहे की, घनकचरा प्रकल्प उभा करु पाहत असेल तर प्रशासन आणि घनकचरा प्रकल्पाला विरोध करत असलेले लोकप्रतिनिधी अशी मिडीया ट्रायल उभी केली गेलेली आहे. खरं तर हे चित्र अत्यंत चुकीचे आहे. कोणत्याही लोकप्रतिनिधीचा घनकचरा प्रकल्पाला विरोध असण्याचे मुळातच काही कारण नाही. घनकचरा प्रकल्प हा प्रत्येक शहरामध्ये असला पाहिजे. कचऱ्यावर प्रक्रिया झाली पाहिजे. तो विषय मार्गी लागला पाहिजे. या विषयासंदर्भात कोणाचेच दुमत असण्याच कारणच नाही. हरीत लवादाची जी भिती साहेब आता तुम्ही आम्हाला घालत आहे ना. ती यापुर्वीचे सुध्दा आपलेच गुरु असलेले तत्कालीन आयुक्त टेकाळे साहेबांनी सुध्दा आम्हाला घातली होती. आपण जी शासनाची किंवा न्यायालयाची भिती नगरसेवकांना दाखविता आहे. त्यापेक्षा माझी विनंती आहे साहेब आपल्याला की, नियमात बसतील असे प्रस्ताव सभागृहासमोर आणा, ज्याची अंमलबजावणी करता येवु शकेल. त्याच्यावर जर आपण भर दिला असता ना साहेब तर ही चर्चा करण्याची सुध्दा आज आपल्याला गरज पडली नसती. हरीत लवादाची कार्यवाही आमच्यावर तेव्हाही होणार होती. जेव्हा हा प्रस्ताव मंजुरीसाठी सभेसमोर आला होता. त्याला मंजुरीपण देण्यात आली. त्यानंतर प्रशासनाने पुढे काय केले. मुळात हा संपुर्ण प्रशासकीय कामकाजाचा भाग होता. प्रशासनाने त्याच्या जबाबदाऱ्या योग्य वेळेत पार पाडल्या नाही. आणि त्यामुळे ही सगळी वेळ येवुन ठेपलेली आहे. महापौरताई तुमचे लक्ष वेधु ईच्छिते मी,

**मा.महापौर :-** हो बोला ताई, पुर्ण लक्ष आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** १ मार्च २०१८ ला महाराष्ट्र शासनाने जळगांव मनपाचा घनकचरा प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता दिली होती. मुळात स्वच्छ भारत अभियानांतर्गत आपल्याला अनुज्ञेय किंमत होती ती ५५ कोटी, आयुक्त साहेबांनी सांगितलेल्याच काही गोष्टी मी रिपीट करणार आहे. पण ते आवश्यक आहे. पण आपल्याकडुन ३० कोटीचा डी.पी.आर. पाठविण्यात आला. तो त्या एजन्सीने तयार केला, आपण तयार केला नाही. हे सगळे खुलासे आता

आयुक्तांनी दिलेत. पण प्रशासन म्हणुन आपली जबाबदारी नव्हती का ? आपल्या शहराचा ज्या वेळेला डी.पी.आर. तयार केला जात आहे. त्या वेळेला तो डी.पी.आर. योग्य आहे अथवा नाही हे तपासुन बघणे, हे मनपा प्रशासनाच काम होते अगर नव्हत. हे काम लोकप्रतिनिधींच कधीच नव्हत. लोकप्रतिनिधींना या सगळया तांत्रिक बाबी माहिती असण्याच कोणतेही कारण नाही. अनुज्ञेय प्रकल्प किंमतीच्या ३५% केंद्र शासनामार्फतच अनुज्ञेय अनुदान असणार आहे. आणि केंद्र आणि राज्य शासनाकडचा अनुज्ञेय अनुदान ६०:४० याप्रमाणे असणार आहे. राज्य शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान असणार आहे ते आणि नागरी स्थानिक संस्थेचा म्हणजे मनपाचा सहभाग त्याच्यामध्ये राज्य शासनाच्या अनुज्ञेय अनुदाना व्यतिरिक्त असणार आहे. हे तेव्हाही आम्हाला माहित होते. आणि त्याला आम्ही नाही म्हणण्याचे कोणतेच कारण नाही. डी.पी.आर. ३० कोटीचा सादर केल्याने केंद्राकडुन ३५% म्हणजे काय १० कोटी आणि वरती काही अशी आणि राज्य शासनाकडुन ६०:४० म्हणजे ७ कोटी आणि उर्वरित मनपाचा सहभाग म्हणजे १२ कोटी असा तो डी.पी.आर. झाला. मुळात सगळयात मोठी आणि पहिली चुक काय होती. ३० कोटींचा डी.पी.आर. देणे ५५ कोटी अनुज्ञेय असतांना ३० कोटीचा डी.पी.आर. दिला. अनुज्ञेय किंमती प्रमाणे जर डी.पी.आर. दिला असता. तर अर्थातच केंद्राचा आणि राज्याचा हिस्सा सुध्दा त्याच्यात वाढीव अनुज्ञेय राहिला असता. या सगळया प्रशासकीय चुका त्यावेळेला झालेल्या आहे. वाढीव अनुदान उपलब्ध करुन दिल जाणार नाही हे तेव्हा सुध्दा शासनाने स्पष्ट केले होते. त्यामुळे १४ व्या आयोगातुन पैसा खर्च करायचा की, कशातुन करायचा, हा मुद्दाच मुळात गौण आहे येथे. चुकीचा सादर झालेला डी.पी.आर. महासभा ठराव क्र.३३१, आजच्या आपल्या डॉकेटवर आहे संदर्भ क्र.१ वर दि.१६/१२/२०२० चा महासभेचा ठराव. त्यानुसार महासभेने ४९.६१ कोटीच्या रिवाईज डी.पी.आर.ला मंजुरी दिली. म्हणजे लोकप्रतिनिधींनी कुठे आणि काय चुक केलेली आहे की, प्रशासनाने जी मिडीया ट्रायल उभी केलेली आहे येथे. लोकप्रतिनिधींनी काय चुक केलेली आहे. राज्य शासनाकडे सुधारीत तांत्रिक मान्यतेला आपण ते पाठविला, एम.जी.पी.कडे पण आपण ते सुधारीत तांत्रिक मान्यतेला पाठविल.मुळात या सगळया प्रशासकीय कामकाजाचा भाग असलेल्या गोष्टी होत्या. आधीच्या एजन्सीने डी.पी.आर. चुकीचा बनविला आणि प्रशासनाने डोळयांवर पट्टी बांधुन सदरचा डी.पी.आर. मंजुरीसाठी पाठवुन दिला. हे सगळ आपण मागच्या सभेत सुध्दा बोलुन झालेले आहे. मला वाटत त्यावेळेला मी एकटी नाही नितीनभाऊ सुध्दा या सगळया मुद्दयांवर प्रशासनावर तुम्ही सुध्दा प्रशासनावर तिव्र नाराजी व्यक्त केलेली आहे. हे सगळे मुद्दे सर्व पक्षीय नगरसेवकांचे होते की, प्रशासनाने प्रशासकीय जबाबदारी पार पाडली नाही. आणि वारंवार फक्त डी.पी.आर. बनविणाऱ्या एजन्सीकडे बोट दाखवुन चालणार नाही.

**मा.महापौर :-** शुचितताई, मागच्या सभेमध्ये आपली यावर चर्चा झाली.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** चर्चा झाली ताई पण तरी सुध्दा...

**मा.महापौर :-** आणि या संदर्भात महानगरपालिका प्रशासनाने राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे की, याला जे जबाबदार असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. त्यांची चौकशी लावावी.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ताई, ताई, मी हे लक्षात आणुन देत आहे सभागृहाच्या, पुन्हा हेच लक्षात आणुन देत आहे ताई की, प्रशासन संशयास्पद गोष्टी करत आहे. प्रशासनाने राज्य शासनाकडे पाठवुन दिल. प्रशासनातल्या ज्या चुका झालेल्या आहे ते मान्य करा. प्रशासकीय अधिकाऱ्यांवर जबाबदारी फिक्स करा. त्यासाठी राज्य शासनाची गरज नाही. आता आयुक्त करु शकतात. प्रकल्प अभियंता हे पद आपल्याकडे पुर्वीपासुन आहे. आणि कृपया करुन माझे सगळे मुद्दे पटलावर येवु द्या.

**मा.महापौर :-** ताई, राज्य शासनाकडे या संदर्भातला प्रस्ताव पाठविलेला आहे. याच्यात जे काही जबाबदार असतील. मग ते महानगरपालिका असेल किंवा राज्य शासनाने स्थापन केलेली एजन्सी असेल. त्यातले अधिकारी असतील.त्यावर चौकशी ही नेमण्यात येईल. आपण आपल मत नोंदवावे की, आपला या प्रस्तावाला विरोध आहे कि नाही.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर ताई, मला बोलायचे आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** तेच सांगते आहे ताई.पण सभागृहात सगळयांच्या निदर्शनास काही गोष्टी आल्या पाहिजे. मुळात आता विषय असा आहे. घनकचरा प्रकल्पाला कोणाचाच विरोध असण्याच कारण नाही. हे मी पुन्हा एकदा मांडते येथे. विषय खुप महत्वाचा आहे. गंभीर आहे.

**मा.महापौर :-** ताई मला आपल पत्र मिळाल १०.५५ ला.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** पत्र मिळालेल आहे ताई आपल्याला, आणि त्याच गोष्टी मी येथे मांडत आहे. ताई मला कृपया बोलु द्याव. विषय गंभिर आहे आणि माझे सगळे मुद्दे पटलावर घ्यावेत. मुळात काय झालेल आहे ताई.

**महापौर :-** ताई आपला विरोध नोंदवायचा आहे का या विषयाला.

**ॲड . शुचिता हाडा :-** ताई मला कृपया पुर्ण बोलु द्यावे. आपल्याला घाई आहे का ताई सभागृहासमोर चर्चा होवु द्यायची नाहीये का ?

**महापौर :-** नाही चर्चा होणे आवश्यक आहे ना ताई बोला ना तुम्हीच बोलताहेत. बोला बोला.

**ॲड . शुचिता हाडा :-** बोलतेय मी ताई आणि माझे मुद्दे येवु द्या एक एक मुद्दा येवु द्या. इतर सदस्यांना कळु द्याना ताई बऱ्याच सदस्यांना यातील काहीही माहीती नाही आणि नुसते वाचुन ते समजु शकत नाही . मुळात झाले काय आहे येथे की प्रत्यक्ष कार्यन्वय करण्याच्या वेळेला प्रशासनाला साक्षात्कार झाला की DPR प्रमाणे काम होवु शकत नाही आणि मग प्रशासनाने ४९.६१ कोटींच्या DPR ला महासभेची मान्यता घेतली. महासभेने दिली ती मान्यता कारण महासभेला कुठेच घनकचरा प्रकल्प अडवण्याचा उद्देश नव्हता . कोणत्याच नगरसेवकांचा नव्हता , मी फक्त भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांबद्दल बोलत नाहीये . सर्वपक्षीय नगरसेवकांची ही भुमिका आहे. घनकचरा प्रकल्प कार्यान्वीत झाला पाहीजे. त्याकरीताच प्रशासकीय मान्यतेला प्रस्ताव पाठवला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई

**ॲड . शुचिता हाडा :-** सुधारीत मान्यतेला पाठवला

**श्री.नितीन लढ्ढा :-** शुचिताताई आपले सगळे जे मुद्दे आहेत ना ते मला मान्य आहेत. आपले जे जे काही आक्षेप असतील ना ते फक्त आपण आक्षेप नोंदवावे.

**ॲड . शुचिता हाडा :-** मी आली ना नितीनभाऊ आक्षेपापर्यंतच मी आलेली आहे आता नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** जी

**ॲड . शुचिता हाडा :-** आता आमचा आक्षेप आहे , वाढीव संविदा रकमेनुसार काम करून घेण्याला, प्रशासनाने जो प्रस्ताव आणलेला आहे ना येथे नितीनभाऊ , महापौरताई , प्रशासनाने येथे प्रस्ताव आणलेला आहे की वाढीव संविदा रकमेनुसार काम करून घेण्याला आणि त्याला आमचा आक्षेप आहे. तो आक्षेप नोंदवुन घ्या. मुळात लक्ष्मी कन्ट्रक्शन, औरंगाबाद सोबत जो करारनामा झाला होता. आता आयुक्तांनी सुध्दा सांगीतल की मागच्या महासभेत हे सगळ झालेल आहे. पण पुन्हा एकदा आकडेवारी महासभेसमोर येवु द्या. मुळ निविदा रक्कम १२,१४,७४,२०९/- एवढी होती. त्याच्यावर आपण तेव्हा १८.९९ % जास्तीचे दर वाटाघाटी अंती मान्य केले , म्हणजेच काय तेव्हाच आपण मुळ निविदा रकमेपेक्षा २.३० कोटी जास्तीचे दर लक्ष्मी वाल्याला दिलेलेच आहेत. वाढीव रक्कम आपण आता, आता जो वाढीव रकमेचा प्रस्ताव प्रशासनाने आणलेला आहे. तो कीतीचा आणलेला आहे १२,१४,२३,९२८/- नमुद केलेला आहे येथे म्हणजे जी मुळ निविदा रक्कम होती. त्याच्या इतकीच वाढीव म्हणजे १०० % वाढीवचा प्रस्ताव आलेला आहे. मी मागच्या महासभेत सुध्दा हे मांडलेल होत की , सीबीसी गाईडलाईननुसार आपण २२ % पर्यंतच वाढीव काम निविदाकाराला देवु शकतो. त्याला आमची हरकत नाही. पण जेव्हा १०० % वाढीव काम आपण आणता आहात. ती वाढीव संविदा रकमेनुसार कसं करणार. त्याची स्वतंत्र निविदाच निघाली पाहीजे आणि आता येथे एका महत्वाच्या मुद्दयाकडे मी लक्ष वेधु ईच्छिते आता आयुक्त साहेबांनी तो मुद्दा मांडला होता. प्रशासनाकडे आपल्या प्रकल्प अभियंत्याकडे माहिती घेतली.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** ताई आपण आक्षेप नोंदवा.

**मा.महापौर :-** ताई आपण आपले आक्षेप नोंदवा.

**ॲड . शुचिता हाडा :-** ताई आक्षेप नोंदवतेच आहे आणि माझे मुद्दे पटलावर येवु द्या ताई.

**मा.महापौर :-** ताई आपण आपला आक्षेप नोंदवायचा आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** ताई माझा मुद्दा व्यवस्थित पटलावर येवु द्या. आपण टेंडर ॲटम मध्ये कोणते रेट लावले. वाढीव मंजुरीला आपण कोणते रेट लावले अशी मी प्रशासनाकडे विचारणा केली होती.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर महोदया मला बोलायचे आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** आणि त्या वेळेला , ईबाभाई , ईबाभाई मी बोलते आहे. कृपया मध्ये डिस्टर्ब करु नका.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** हो ताई , मी महापौरांना निवेदन करतोय.

**ॲड . शुचिता हाडा :-** हो निवेदन माझ झाल्यावर द्या ना ईबाभाई

**श्री.ईब्राहीम पटेल :-** हो , हो मी महापौरांना सांगत आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** माझ झाल्यावर द्या आधी माझ बोलण संपु द्या.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** हो , आम्ही फक्त परवानगी मागतोय महापौरांकडुन

**ॲड. शुचिता हाडा :-** सर्व सन्मा सदस्यांना कृपया विनंती आहे. माझ बोलण संपु द्या. विनाकारण मध्ये मध्ये मुद्दे काढु नका.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** ताई आपणच बोलताहेत महासभा सुरू झाल्यापासुन

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई कृपया सदस्यांना सुचना द्या. आपण ज्यांना परवानगी दिली आहे त्यांच बोलण आधी संपु द्या. विनाकारण विषयाला वेगळ वळन देऊ नका.

**श्री.कैलास सोनवणे :-** बरोबर आहे , ईबाभाई आपल्या दिमागच्या बाहेरचा विषय आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई मी आपल्या विषयाकडे येते.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** आम्ही पण जळगांवकरांच्या आरोग्याशी निगडीचाच विषय मांडतोय .

**श्री.कैलास सोनवणे :-** हो मला माहिती आहे . मला माहीती आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई मी पुन्हा आपण विषयाकडे येवुया. माझा मुद्दा असा होता की वाढीव मंजुरीला कोणते रेट लावले. अशी प्रशासनाकडुन आम्ही माहिती घेतली. त्याच्यामध्ये आम्हाला माहिती मिळाली की टेंडर ॲटम , टेंडर रेट हे २०१७-१८ चे Up To १२५ % आणि Above १२५% क्वान्टीटी २०२०-२१ चे रेट मग आता मला सांगा जर आपण २०२०-२१ चेच रेट आपण १०० % च्या वाढीव कामाला लावणार आहोत. तर नविन निविदा प्रक्रीया राबविण्याला प्रशासनाची अडचण काय आहे ? हा अट्टाहास का करत आहे प्रशासन ? २०-२१ च्या रेट प्रमाणे काम द्यायचे आहे. त्याच ठेकेदाराला वाढीव संविदा देण्याचा अट्टाहास का ? या मुद्दयाला आमचा विरोध आहे. घनकचरा प्रकल्पाला विरोध नाही. कृपया पत्रकार बांधवांना सुध्दा विनंती आहे की विषय आपण समजुन घ्या. घनकचरा प्रकल्पाला विरोध नाही. प्रशासनाने ज्या पध्दतीने प्रस्ताव आणलेला आहे. स्थापत्य व बायोमायनिंगचे कामे वाढीव संविदा रकमेनुसार काम करून घेणेस या मुद्याला विरोध आहे. २५% पर्यंतचे वाढीव काम सीबीसी गाईडलाईन नुसार आपण देवु शकतो. त्याला कोणतीच बाधा येत नाही. करून घ्या त्या ठेकेदाराकडुन लक्ष्मी वाल्याकडुन औरंगाबादच्या ठेकेदाराकडुन पण पुढच जे संपुर्ण वाढीव काम आहे. त्यासाठी नव्यानेच निविदा प्रक्रीया राबविणे नियमाला धरून आहे. मुळात खर सांगायच तर या ठेकेदाराने अजुनपर्यंत मुळ निविदेतील काम सुध्दा केलेले नाहीये. हे सगळयांना माहिती आहे. एक रॅम्प उभारणे या व्यतिरीक्त या सिव्हील वर्क वाल्याने काय काम केलेले आहे आणि मुद्दा आता अजुन महत्वाचा आहे की जोपर्यंत बायोमायनिंगच काम तिथले संपत नाही. तोपर्यंत सिव्हिलसाठी तिथे जागाच क्रीयेट होत नाहीये. हे सगळे मुद्दे प्रशासनाने ते दोन्ही टेंडर जेव्हा निविदा प्रक्रीया राबवली. त्यावेळेला विचारात का घेतली नाही. हा जो अट्टाहास आज प्रशासनाचा चाललेला आहे हे त्याच ठेकेदाराला पुढचा वाढीव काम देवुन टाकण्याचा या संविदे रकमेमध्ये हा अत्यंत चुकीचा आहे. सिव्हिलच्या कामाला एप्रिल २०२१ पर्यंत मुदत होती. ती मुदत सुध्दा आता संपली आहे. कामाला अजुनही प्रत्यक्ष सुरूवात झालेली नाही आणि भविष्यातही ती ईमिजेट होवु शकेल अशी परिस्थीती नाही. कारण बायोमायनिंगच काम अजुन अपुर्ण आहे. बायोमायनिंगच्या कामाच्या डॉकेटमध्ये तुम्ही ३ कोटी ५९ लाख निविदा मंजुर दर नमुद आहे. ३५९ पर क्युबी अस तुम्ही सांगीतलेले आहे. मला प्रकल्प अभियंत्याना हा प्रश्न आहे की ३५९ पर क्युबिक मिटर त्याच कॅल्कुलेशन काय यायला हव होत. ७.३३ कोटी यांनी आणलेल आहे. माझ्या कॅल्कुलेशन नुसार ३५९ नुसार जे काम दिलेले आहे ते ६.४८ यायला हव होत.

**महापौर :-** ताई आपण दिलेल्या सगळया सुचना आपण दिलेल्या पत्रामध्ये सविस्तर मांडलेल्या आहेत

**ॲड . शुचिता हाडा :-** हो ताई मी तुम्हाला दिलेल्या आहेत पण त्या सभागृहाला कळायला हव्या ताई. सभागृहाला कळु द्या.

**महापौर :-** ताई याच्यामध्ये ज्यांना विरोध नोंदवायचा असेल त्यांनी विरोध नोंदवा आणि ज्याची सहमती असेल त्यांनी सहमती सांगा.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई , ताई तुम्हाला विनंती आहे. जयश्रीताई तुम्हाला विनंती आहे माझी तुम्ही सुशिक्षीत महिला आहात , तुम्ही शिक्षीका आहात. जयश्रीताई लक्ष द्या तुम्ही , तुम्हाला राजकीय , सामाजिक , शैक्षणिक उज्वल भविष्य आहे. घरकुल घोटाळयात जे तत्कालिन नगराध्यक्ष होते. आदरणिय गुलाबरावजी देवकर त्यांच कोर्टातील स्टेटमेंट आहे ताई की आम्हाला काही माहिती नव्हत. आम्ही फक्त सह्याजीराव होतो. ताई तुम्हाला कळकळीची विनंती आहे एक महिला म्हणुन तुम्ही सह्याजीराव होवु नका ताई, प्रशासनाने अत्यंत चुकीच्या पध्दतीने प्रस्ताव येथे समोर आणलेला आहे. लक्ष्मी कन्स्ट्रक्शन, औरंगाबादची कंपनी आहे आणि म्हणुन औरंगाबदच्या DPR च सुध्दा उदाहरण दिलं जात वारंवार प्रशासनाकडुन म्हणजे ठेकेदाराची लॉबींग करायची तर ती किती करायची , किती उघडपणे येथे लॉबींग चाललेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** आणि सगळया घरकुल मध्ये , दोन मिनिंट नितीनभाऊ फक्त, आपल्याला घरकुल घोटाळयाचा अनुभव आहे. आपले पैकी अनेक जण घरकुल घोटाळयात पोळले गेलेले आहेत. घरकुल

घोटाळ्यातला प्रमुख मुद्दा काय होता कोर्टासमोरचा, एखादी निविदा प्रक्रीया ज्यावेळेला राबवली जाते, त्यानंतर त्या निविदेतील अटी शर्तीमध्ये कोणताही बदल करण्याची आपल्याला परवानगी नसते. घरकुल घोटाळ्यासारखाच घोटाळा आता येथे वाढीव संविदा रकमेचा प्रस्ताव मंजुर केला तर होणार आहे. अटीशर्तीमध्ये आपण बदल करू शकत नाही. आपल्याला नविन निविदाच काढावी लागणार आहे. कृपया संपुर्ण सभागृहाने विषय समजुन घ्या.

**मा.महापौर :-** ताई, इतर सदस्यांना ही आपले मत मांडु द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** महापौरताई

**मा.महापौर :-** नितीनभाऊ बोला आपण

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई

**ॲड . सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई हा विषय

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई , हा विषय शुचितातार्इंनी जे काही मुद्दे मांडले असतील. मी म्हणतो की त्यांनी मांडलेले प्रत्येक मुद्दे गैर आहेत आणि अश्यातला भाग नाहीये. परंतू या संपुर्ण बाबींचा प्रशासनाने योग्य तो खुलासा केलेला आहे आणि यासंदर्भात जे शुचितातार्इंच म्हणण आहे की सीबीसीच्या गाईडलाईनच्या अनुषंगाने २५ % च्या वरच वाढीव काम हे देता येत नाही. मला असं वाटत की प्रशासनाने या संदर्भातील ज्या काही कायदेशीर बाबी असतील. त्या निश्चितपणे कायदेशीर बाबी तपासाव्या नियमांच उल्लंघन कुठे व्हाव अशी सभागृहातील कोणाचीही ईच्छा नाहीये आणि मलाही वाटत की प्रशासनही याबाबतीत सर्वपरिने आपली योग्य ती काळजी घेईलच. परंतू एखाद्या कुठल्या विषयाला धरून महानगरपालिकेचा महत्वाकांक्षी असलेला घनकचरा प्रकल्पाचा जो विषय आहे. तो या तांत्रिक कारणामुळे प्रलंबित राहू नये एवढीच या सभागृहाची ईच्छा आहे. याच्यामध्ये काय चुकीच घडलेले आहे यासंदर्भातील मा. आयुक्तांनी खुलासा केलेला आहे. कारण ही संपुर्ण प्रक्रीया ही राज्य शासनाच्या माध्यमातुन राबवली गेलेली होती. DPR बनवणारी एजन्सी , तत्कालीन राज्य शासन आपलच होत.महानगरपालिकेमध्येही आपण सत्ताधारी होतात. मी म्हणतो की, त्या बाबतीत कोणाकडे बोट दाखवण्याला काही अर्थ नाही. शेवटी केंद्र शासनाकडुन राज्य शासनाकडे निधी येतांना कुठेतरी घाईगडबडीत त्या DPR मध्ये तांत्रिक चुका झालेल्या आहेत आणि आता आपला सगळ्यांचा जो गैरसमज आहे की ही वाढीव रक्कम जी आपण प्रदान करतो तसा नाहीये की बरेचशे कंपोन्नट त्या वेळेला DPR बनवतांना राहुन गेलेले होते. जसे उदाहरणार्थ संरक्षण भिंतीच्या संदर्भातील उदाहरण दिलं, अत्यंत योग्य आहे म्हणजे संपुर्ण दरवाढ जी झालेली आहे. ती जुन्या कामांवर झाली असे नाहीये. प्रकल्पातील राहीलेले काही बरेचशे जे भाग होते. ते सुध्दा आता याच्यामध्ये समाविष्ठ करण्यात आलेले असल्याकारणाने ही संपुर्ण रक्कम वाढलेली आहे आणि मला वाटत की या संदर्भातील निधी महानगरपालिकेने आता तुर्त खर्च करावा वाढीव निधीच्या संदर्भातील मागणी आम्ही आता परवा ही गुलाबराव पाटील मंत्री महोदयांना विनंती केली की, महानगरपालिकेच्या सगळया आर्थिक बाबींचा विचार करता हा जो काही आर्थिक बोझा महानगरपालिकेवर पडणार आहे किंवा १४ वा वित्त आयोगातुन जो आमचा हक्काचा निधी आहे त्याच्यातुन खर्च करावा लागणार आहे. यासंदर्भातील प्रतिपुर्ती करून देण्याच्या संदर्भातील विनंती सुध्दा आम्ही मा. मंत्री महोदयांना केलेली आहे. मला वाटत की शहराच्या दृष्टीकोनातुन, त्या भागातील नागरीकांच्या दृष्टीकोनातुन हा महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. याच्यामुळे याचे जे गुणांक मिळतात त्या गुणाकांवर आपला भविष्यातला जो काही बोनसचा निधी मिळतो स्वच्छ भारत अभियानाच्या माध्यमातुन त्याला सुध्दा आपण वंचित राहू नये आणि या सगळया बाबींचा विचार करून याच्यामध्ये कुठलाही कायदेशीररित्या या सभागृहातील सदस्यांवर आक्षेप निघतील अशा पध्दतीची जबाबदारी प्रशासनाने अत्यंत काटेकोरपणे तपासावी आणि या प्रकल्पाची जी आहे याच्यासंदर्भातील मागणी मान्य करून या प्रकल्पाला मान्यता देण्यात यावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर महोदय,

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई

**मा.महापौर :-** शुचितातार्इंचा विरोध नोंदवुन , विषय क्रं.७ घेण्यात यावा.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई माझे बोलणे झालेले नाही , महापौरताई मला पुर्ण बोलु द्या. महापौरताई

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई ज्येष्ठ नगरसेवक नितीनभाऊ बोलत असल्याने मी शांत बसली, महापौरताई

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई वाढीव कामाच्या संविदेला आमचा पुर्णपणे विरोध आहे. लक्ष्मी कंन्स्ट्रक्शनला ते काम देण्याचा अट्टाहास का चाललाय ईथे

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** नविन निविदा प्रक्रीया निघाली पाहीजे. महापौरांकडे आणि आयुक्तांकडे

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौरताई हा विषय प्रशासनाने आणलेला आहे. ज्या काही तांत्रिक त्रुटी आहे ते प्रशासनाने तपासावे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई या पत्रान्वये काही विधीने उपरोक्त विषयान्वये जळगांव महापालिका हद्दीत साचलेल्या जुन्या कचऱ्यावर बायोमायनिंगची प्रक्रीया राबविण्याबाबत एक पत्र आलेले आहे आपल्याकडे आव्हाने शिवार गट नं. ८६४ मध्ये साचलेल्या जुन्या कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रीयेचे टेंडर निघणार आहे असे आम्हाला समजले एमजीपीचा रेट पर क्युबिक ४२५/- रू. असुन आम्ही ३२०/- ते ३२५/- पर क्युबिक मिटरची कामे आम्ही करू शकतो. तरी सदर टेंडर प्रक्रीया ही २० ते २५ टक्के कमी दरामध्ये काम करण्यास आम्ही तयार आहोत. सदर बायोमायनिंग कामाबद्दल आपण विचार विनीमय करावा अशी विनंती. ताई हे पत्र आपल्याकडे आलेले आहे. आयुक्तांकडे देखील आलेले आहे. प्रशासनाने लक्ष्मी कंन्स्ट्रक्शनला काम करण्याच पत्र दिलेले आहे का ? प्रशासनाने त्यांच्याकडुन खुलासा घेतलेला आहे का ? की ते काय रेट मध्ये काम करण्यास तयार आहेत. महत्वाचा मुद्दा आहे ताई हे प्रशासनाच षडयंत्र चाललेले आहे. लोकप्रतिनिंधीचा आणि पदाधिकाऱ्यांचा याच्यामध्ये कोणताही सहभाग नाही. प्रशासकीय कामकाजाचा भाग असलेली ही संपुर्ण प्रक्रीया आहे. रोज संध्याकाळी मिडीयाला चुकीच्या बातम्या द्यायच्या आणि पदाधिकाऱ्यांना बदनाम करायच हा एककलमी कार्यक्रम प्रशासनाचा सुरू आहे. मुळात जी समस्या आहे तीला बगल देत आहे प्रशासन, ताई आजचा रिवाईज डी.पी.आर. सुध्दा परिपुर्ण नाही. आजच्या रिवाईज डी.पी.आर.मध्ये सुध्दा त्रुटया आहेत.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** शुचितााताई या विषयावर चर्चा भरपुर झाली. शुचितााताई यांचा विरोध नोंदवुन बहुमताने मान्य करण्यात येत आहे. विषयपत्रिकेवरील पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई यांचा विरोध नोंदवुन या प्रस्तावाला मान्यता देण्यात यावी.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौरताई मला बोलायचे आहे. नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** सविस्तर चर्चा झालेली आहे.

**ॲड . सौ.शुचिता हाडा :-** हा विषय बहुमताने करायचा असे तुम्ही ठरवुन टाकलेले असेल तर आमचा विरोध नोंदवुन घ्या.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितीनभाऊ मला प्रशासनाचा खुलासा पाहीजे आहे.मला बोलायच आहे या विषयावर

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आयुक्तांनी या संपुर्ण प्रकरणाची जबाबदारी स्विकारावी.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मला प्रशासनाचा खुलासा पाहीजे आहे.मला बोलायच आहे या विषयावर

**श्री.ईब्राहीम पटेल :-** विशाल भाऊ, तुमचा विरोध नोंदवुन गेलेला आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आयुक्तांनी या सर्व प्रकरणाची आणि त्याला होणाऱ्या सर्व परिणामाची जबाबदारी घ्यावी.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** विशालभाऊ तुमचे.

**ॲड . शुचिता हाडा :-** वाढीव संविदेला आम्ही मान्यता देणार नाही. नविन निविदा प्रक्रीयाच झाली पाहीजे या कामी

**श्री.नितीन लढ्ढा :-** शुचितााताई कस आहे की जर कधी प्रशासन चुकीच करीत असेल तर

**मा.महापौर :-** पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सर्व सदस्यांना आपला कायदेशीर अधिकार आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण प्रशासनाविरूध्द तक्रार दाखल करू शकतो.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितीनभाऊ

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** नितीनभाऊ घरकुल घोटाळयासारखाच आता नविन घोटाळयाच्या दिशेने आपण जात आहोत आणि नविन विषयामध्ये आपण स्वत: पोळले गेलेले आहात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई आता याच्यामध्ये कस आहे बघा की ज्यांच्याकडुन चुका होतील ते निश्चितपणे भोगतील.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितीनभाऊ नविन निविदा काढायला हरकत काय आहे .प्रशासनाने याचा खुलासा करावा.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** अटीशर्ती आपण बदलु शकत नाही नितीनभाऊ.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रशासनाला नविन निविदा काढण्यासाठी काय अडचण आहे याचा खुलासा प्रशासनाने करावा.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** काय अडचण आहे नितीनभाऊ आपण बघतो आहे त्यानुसार प्रशासनाने नविन निविदा काढावी. नियमानुसार काम होवु द्या ना.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रशासनाला नविन निविदा काढण्यासाठी काय अडचण आहे याचा खुलासा प्रशासनाने करावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विशालजी कुठलीही निविदा प्रक्रीया राबविल्यानंतर समजा निविदेचे दर जास्त आले तर त्याची जबाबदारी आपण स्विकारता का ? निश्चितपणे आपण जबाबदारी स्विकारत असाल आमची त्या गोष्टीला सुध्दा सहमती आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नविन निविदा प्रक्रीयेमध्ये जर कधी वाढीव दर आले आणि महानगरपालिकेचा आर्थिक नुकसान होत असेल.

**श्री.कैलास सोनवणे :-** अहो नितिनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** नविन निविदा प्रक्रीयेमध्ये जर कधी काही हे झाले तर

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रशासनाला नविन निविदा काढण्यासाठी काय अडचण आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** नितीनभाऊ शासनाकडे सगळ्या गोष्टींची तरतूद आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** निविदा काढल्याशिवाय कसे कळणार.

**ॲड . शुचिता हाडा :-** भविष्यात होवुच शकत नाही ही निविदा

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नविन निविदा काढल्याशिवाय हे कस काय कळणार

**ॲड . शुचिता हाडा :-** नितीनभाऊ नियमानुसार आपण वाढीव संविदेला मंजुरीच देऊ शकत नाही. आपण वाढीव संविदेला मंजुरी दिली तर हा घोटाळा होणार आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नविन निविदा काढल्यानंतरच कळेल

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी एकच मिनिंट बोलतो की आज या मागील दरामध्ये हा मक्तेदार काम करण्याच्या संदर्भात तयार आहे. उद्या नविन निविदा प्रक्रीया राबविल्यानंतर हा मक्तेदार या जबाबदारीतुन मुक्त होवुन जाईल. दुसरे वाढीव निविदेप्रक्रीये मध्ये जर कधी वाढीव दर आले आणि जर कधी त्याचा मनपावर आर्थिक भुर्दंड पडला तर त्याची जबाबदारी फक्त कोण स्विकारणार याच मला उत्तर अपेक्षित आहे आपल्याकडुन

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** नितीनभाऊ आता हा भुर्दंड रिव्हाईस DPR मुळे वाढलाच ना आणि रेट वाढतील, नविन निविदेनुसार रेट वाढतील म्हणुन आपण नियमबाह्य कामांना मंजुरी द्यायची का ? हा महत्वाचा मुद्दा आहे नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** जर कधी नियमबाह्य काम होत असेल तर तक्रारीचे मार्ग सगळयासांठी खुले आहेत ना ताई अस नाहीये की आज जरी कधी हा ठराव झालेला असेल. आज आपल्याला वाटत असेल की हा ठराव चुकीच्या पध्दतीने पारीत झालेला आहे, नियमबाह्य पारीत झालेला आहे. प्रशासन आणि सत्ताधारी मिळुन मिलीभगत करून या महानगरपालिकेचं आर्थिक नुकसान करीत असतील निश्चितपणे तक्रारीचे दालन हे सर्वांसाठी खुले आहेत. निश्चितपणे याच्या संदर्भातील शासन व्यवस्था जी आहे. याबाबतीत गांर्भीयाने विचारही करेल ना, परंतू फक्त चर्चेच्या अनुषंगाने आज मागील महासभा होवुन जवळपास दोन महिन्याचा कालावधी झाला, प्रकल्प लांबणीवर पडतोय , दिवसेंदिवस प्रकल्पाची किंमत वाढत चाललेली आहे. या सगळ्या गोष्टींचा विचार करून आपण हा निर्णय घेतोय. या उपरांत काही वाटत असेल किंवा काही चुकीच काही घडत असेल. आपण निश्चितपणे तक्रार दाखल करू शकतो यासंदर्भातील ताई.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** नितीनभाऊ वाढीव दर येतील म्हणुन आपण नगरसेवकांना भुर्दंड करणार आहोत का? राज्यात आपलच सरकार आहे आपण मंजुर करून आणुयात ते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही परंतू ताई शासन

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आपण शासनाकडुन या सगळ्या वाढीव याला मंजुरी घेवु शकतो. आपण तशी विनंती करू शासनाला

**श्री.नितीन लढ्ढा :-** पण ताई

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** पण नियमबाह्य ठराव होवु नये एवढीच कळकळीची विनंती आहे नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** घरकुल घोटाळा संपुर्ण जळगांव करांनी बघितलेला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई या संपुर्ण प्रकरणामध्ये

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** पुन्हा एकदा नगरसेवकांना जेलची वारी करायला भाग पाडु नये आणि प्रशासनाने दिशाभुल करून जो प्रस्ताव आणलेला आहे. त्याला कोणत्याही नगरसेवकाने बळी पडु नये. एवढीच माझी सगळयांना विनंती आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कुठल्याच नगरसेवकांच कुठेही नुकसान व्हाव अशी या सभागृहातील कोणाचीही ईच्छा नाहीये. प्रशासन जबाबदारीने काम करत आहे. ज्या काही चुका झाल्या त्या DPR बनविणारी एजन्सी ती तत्कालीन राज्य शासनाने अपॉईंट केलेली होती आणि त्या चुकीचा फटका जो आहे तो या महानगरपालिकेला सोसावा लागतोय म्हणुन आता पैसा देणारेही राज्य शासन आहे आणि त्या राज्य शासनाला आज आपण आरोपीच्या पिंजऱ्यामध्ये उभे करू शकत नाही. आम्ही हे म्हणत नाही की त्यावेळेला राज्य शासन आपलच होत . परंतू आम्हाला त्याच्याकडेही बोट दाखविण्यामध्ये काही स्वारस्य नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** भाऊ राज्य शासनापेक्षाही येथे तत्कालिन आयुक्त आणि अधिकारी हे जबाबदार आहेत. अतिशय चुकीच्या पध्दतीने प्रस्ताव येथे आणला गेलेला आहे नितीनभाऊ तुमच्या लक्षात आलेले आहे का ? आपण हा चार्ट बघितलेला आहे का ? जिथे सेवींग झालेली आहे तिथे सेवींग दाखवलेली नाही आणि आता आयुक्त साहेबांनी याच्यामध्ये सांगीतले होते की बायोमायनिंगच काम ग्लोबल वेस्टला जेवढ दिल होत तेवढ काम कंम्पलीट केलेल आहे. मी आयुक्त साहेबांना सांगेन की त्यांनी प्रतिज्ञापत्र करून द्याव सभागृहाला की ग्लोबल ने जर १०० % काम केलेल असेल तर , मी खात्री लायक सांगु शकते की ग्लोबलने १०० % काम केलेलच नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई , ताई आपण

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** नितीनभाऊ मी तुम्हाला एक आठवण करून देते तुम्हाला माहिती असलेल्या विषयाची माहीती करून देते. इंदौर महापालिकेमध्ये ज्यावेळेला घनकचरा हा विषय सुरू झाला. त्यावेळेला सगळया पदाधिकाऱ्यांनीच नाही तर सगळया अधिकाऱ्यांनी सुध्दा शपथ घेतली होती की कचऱ्यामध्ये पैसा खाणार नाही आणि त्यामुळेच इंदौर इतक्या वर्षांपासुन स्वच्छतेच्या याच्यामध्ये पहिले पारीतोषिक कायम टिकवुन आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** आता आपणही याच्यामध्ये शपथ घेवु की कोणी पाकीट घेणार नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** या कामामध्ये पैसा खाणार नाही ही शपथ त्यांनी घेतली पाहीजे.नैतिकता असली पाहीजे येथे

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई बघा मी आपल अभिनंदन करतो की आपण या विषयामध्ये आपण सखोल अभ्यास केला आहे. त्याबद्दल वाद नाही. परंतू मी आत्ता आपल्याला हीच विनंती करतोय की या संदर्भात आपले जे काही आक्षेपार्य मुद्दे असतील. निश्चितपणे आपण ते प्रशासनाच्या निदर्शनास आणुन द्यावे. जर कधी प्रशासनाला खरच वाटत असेल की, याच्यामध्ये त्यांच्याकडुन काही चुका झाल्या असतील किंवा अजुन काही त्रुटी राहील्या असतील . निश्चितपणे प्रशासन त्याबाबतीत पुनश्च विचार करेल.परंतू मला वाटत की प्रकल्प थांबवण किंवा त्या गोष्टीला विलंब करणं हे मला वाटत की महानगरपालिकेच्या आणि या शहराच्या हिताच्या दृष्टीकोनातुन योग्य नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** नितीनभाऊ आम्ही प्रकल्प थांबवत नाहीये आणि प्रकल्प थांबु नये हीच आमची सुध्दा ईच्छा आहे. कोणत्याच नगरसेवकाची ईच्छा असुच शकत नाही की घनकचरा प्रकल्प होवु नये.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** प्रशासन ज्या पध्दतीने प्रस्ताव आणतय , नविन निविदेला प्रशासनाला अडचण काय आहे. का नाही आणत आहे प्रशासन नविन निविदेचा प्रस्ताव

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** या विषयावर सोईस्कर चुप्पी साधली जाते आहे आणि हे नियमबाह्य आहे म्हणुन आम्ही विरोध करतो आहोत. घनकचरा प्रकल्पाला विरोध करतो आहोत आता जे मिडीया समोर रंगवल जातय आणि आम्हाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभ केलं जातय. आम्ही मुर्ख आहोत का ? घनकचरा प्रकल्पाला विरोध करून आम्हाला काय जळगांवकरांना कचऱ्याच्या खाईत ढकलायच आहे का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई परंतू अशा पध्दतीने

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आम्ही घनकचरा प्रकल्पाला कोणताच विरोध केलेला नाहीये

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** नितीनभाऊ आम्ही नविन निविदा प्रक्रीया करावी ही मागणी करतो आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** निश्चित, निश्चित आपण

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आणि हे नियमाला धरून आहे नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपल्याला आपले मत मांडायचा पुर्ण अधिकार आहे. पण

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतू मला वाटत नाही की अशा पध्दतीने आप्पा प्रशासनाने सुध्दा अशा

**मा.महापौर :-** कैलासआप्पा बोला.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीनभाऊ एक मिनिंट मला फक्त दोन गोष्टींचे खुलासे येथे पाहीजे आहेत. आयुक्तांकडुन पाहीजे आहे. आयुक्त साहेब आपल्याला निविदा प्रक्रीया राबवुन काय , फक्त एकच प्रश्न आहे शेवटचा की निविदा प्रक्रीया काढणे का नाही काढत आहे आपण नव्याने मागच्याच ठेकेदाराला का देण्यात येत आहे आणि नितीनभाऊ जर म्हणत आहे ना की जर नविन निविदेला वाढीव खर्च आला तर तो काही आपल्यावर लादला जात नाहीये नितीनभाऊ निविदा प्रकीयेमध्ये जर कधी अस झाल तर वाढीव आला तर आपल्यावर येत नाही तो खर्च हे मला स्पष्ट करावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा , नाही नाही नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीनभाऊ एक मिनिंट

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा मी ते म्हणत नाहीये.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** की त्याची जबाबदारी आपल्यावर निश्चित होईल मी हे म्हणत नाहीये. मी फक्त एवढच

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीनभाऊ काहीच होणार नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी फक्त तो वाढीव खर्च तो या महानगरपालिकेवर अतिरीक्त भुर्दंड पडेल. तेवढच माझ म्हणण आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीनभाऊ ऐका ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी कुणाच्या मनामध्ये भिती घालत नाहीये.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापालिकेवर अतिरीक्त भुर्दंड पडेल म्हणुन आपण नियमबाह्य प्रस्तावाला मंजुरी देवुच शकत नाही नितीनभाऊ , जर आपला DPR वाढतो आहे. जर काम वाढणार आहे आणि प्रशासनाच्या या घोडचुका आहेत ना इतके वर्ष प्रशासन काय झोपा झोडतय का ?

**श्री.कैलास सोनवणे :-** आयुक्तांनी खुलासा करावा.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** मागच्या महासभेत सुध्दा आणि आजच्या सभेपुढे प्रशासनाकडे समर्पक उत्तर नाहीयेत. जसाचा तसा प्रस्ताव पुन्हा पुन्हा महासभेत समोर ठेवायच

**श्री.कैलास सोनवणे :-** आयुक्तांनी खुलासा करावा.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** लोकप्रतिनिधींना गृहीत धरायच आणि चुकीचे कामे करायला...(स्पष्ट ऐकु आला नाही.)

**श्री. ईब्राहीम पटेल :-** आयुक्त साहेब आपण खुलासा करावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई खुलासा करु द्या ना.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** चुकीच्या पध्दतीने जर हा प्रस्ताव आणलेला असेल तर ही प्रशासनाची जबाबदारी आहे. नगरसेवकाची जबाबदारी नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** एक मिनीट, हे पहा, आयुक्त साहेब काय झाल आहे, आपण खुलासा करा आयुक्तांनी.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** महापौर महोदया, मला बोलायचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आयुक्त साहेब खुलासा करा.

**मा.महापौर :-** बोला पोकळे साहेब,

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** आयुक्त साहेबांना काही दिवसापुर्वी आम्ही पत्र दिलेल आहे. त्या पत्र्यांच्या मुद्दयांचा आयुक्त साहेबांनी खुलासा करावा. आणि तो खुलासा महासभेच्या रेकॉर्डवर यायला पाहिजे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** नविन निविदेचा जो विषय होता की, नविन निविदा का काढण्यात आली नाही. त्याच्याबद्दल मी सांगु ईच्छितो की, निविदे मधल्या १००% क्वांटीटी जेवढया आहे. त्या क्वांटीटी प्लस २५% क्वांटीटी या २०१६-१७ च्या रेटनुसार अधिक निविदा मंजुर दरानुसार या मक्तेदाराला पेड करण्यात येणार आहे. आणि १२५% पेक्षा जी काही वाढीव क्वांटीटी होईल. ही क्वांटीटी २०२०-२१ च्या दर सुचीप्रमाणे अधिक त्याने त्यावेळेला दरस्विकृतीच्या वेळेला प्रचलित दरसुचीपेक्षा त्याचा दर ४.९१% कमी होता. त्या ४.९१% कमीने अश्या प्रकारे तो पुर्ण प्रस्ताव वाढलेला आहे आणि त्याच प्रमाणे मंजुरीला दिलेला आहे. जर उद्या आपल्याला नविन निविदा करायची झाली तर आपल्याला संपुर्ण क्वांटीटी जी आहे ती संपुर्ण २०२१-२२ च्या नविन डी.एस.आर.नुसार

सुधारीत करावी लागेल आणि त्याच्यानंतरच निविदा काढावी लागेल. ती निविदा आज रोजी २०-२५% जास्ती पर्यंत जाऊ शकते.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** जाऊ द्या ना मग, योगेश बोरोले साहेब, हरकत काय आहे याला. आपण रिवाईज मुळात सुरुवातीला प्रकल्प अभियंता आपणच होतात ना सुरुवातीपासुन.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** या ज्या चुका झालेल्या आहेत. मुळ डी.पी.आर. मध्ये त्या चुका आपल्याला कार्यान्वयाच्या वेळेला आठवतात का ? तेव्हा आपल्याला साक्षात्कार होतो की, डी.पी.आर. आमचा चुकलेला आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** डी.पी.आर. हा आरोग्य विभागामार्फत तयार झालेला आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** रिवाईज डी.पी.आर.ला सुध्दा महासभेने मंजुरी दिली. नविन निविदा प्रक्रिया होऊ द्या. रेट वाढुन येतील ही भिती घालुन नगरसेवकांची दिशाभुल का करत आहात. नियमानुसार आपण असे वाढीव संविदा करु शकत नाही. आणि हे जर नियमानुसार आहे तर याची आयुक्तांनी संपुर्ण जबाबदारी घ्यावी. आयुक्त घेत आहे का याची संपुर्ण जबाबदारी आणि होणाऱ्या परिणामांना सुध्दा आयुक्त जबाबदार राहतील. असे आयुक्तांनी सांगावे सभेसमोर. वाढीव संविदा रकमेमुळे फक्त आमचा विरोध आहे. नविन निविदा प्रक्रिया करावी. ही आमची एकमेव मागणी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जर कधी ताई, प्रशासन चुकीच्या पध्दतीने या वाढीव संविदेला मान्यता देत असेल, आपण निश्चितपणे याला आपली लेखी हरकत द्यावी. त्या बद्दल वाद नाही. याच्या संदर्भात ज्या काही फोर्मकडे आपल्याला तक्रार करायची आहे. तो ऑप्शन आपला ओपन आहे. आपण या सगळया गोष्टींची चर्चा करुनच निर्णय घेतो.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** निश्चितच करु ना नितीनभाऊ. निश्चितच करु ज्या फोर्मकडे तक्रार करायची ते आम्ही पुढच्या टप्प्यात निश्चितच करु नितीनभाऊ. पण सभागृहात हे निदर्शनास आणुन देणे हे सुध्दा तेवढेच आवश्यक आहे. प्रत्येक नगरसेवकाला या सगळया गोष्टी कळत नाही नितीनभाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई आपण.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आणि नगरसेवकच शेवटी सफर होतो. घनकचरा प्रकल्प या विषयावरुन कोण शिव्या खात आहे रोज उठुन. लोकप्रतिनिधीच खात आहे ना नितीन भाऊ. भाऊ मागच्या सभेतल तुमचेच वाक्य आहे की, प्रशासनाने घोडचुका करायच्या आणि लोकप्रतिनिधींनी शिव्या खायच्या. म्हणजे आम्ही काय पाप केल आहे का ? निवडणुकीला उभे राहिलो. आपणच मागच्या महासभेत म्हटेलेले होते.

**मा.उपमहापौर :-** महापौर महोदया, मला या विषयात बोलायचे आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** प्रशासकीय चुकांचा हा सगळा भुर्दंड आपण भोगत आहे. प्रशासनाने ज्या ज्या चुका केलेल्या आहे.

**मा.उपमहापौर :-** ताई, शुचितताई. ताई मला असे वाटते की, ही जी सगळी निविदा प्रक्रिया झालेली आहे. मला असे वाटते, तत्कालीन सभापती, स्थायी समितीच्या बहुतेक आपण होत्या.त्यावेळेस ही प्रक्रिया सर्व राबविली गेली.त्यावेळेस टेन्डर प्रोसेस ही सगळी झालेली आहे. त्यामध्ये डी.पी.आर. चुकीचा बनविला गेला. त्याच्यानंतर ते प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली नाही. या सगळया तांत्रिक अडचणी आहेत. परंतु आता मला अस वाटत, आपले सुचनेनुसार आणि आपल्या सुचनेनुसार आपण उपस्थित केलेल्या प्रश्नांवरती, प्रशासनाने मला वाटते याच्यावरती सविस्तर उत्तरे दिलेली आहे. आणि मला असे वाटते की, ज्या वेळेस आपल्याला याबाबतीमध्ये किंवा ज्या ज्या मुद्दयांवरती आक्षेप नोंदवायचा असेल आपण त्या पध्दतीचा आक्षेप या ठिकाणी महापौरांकडे कागदोपत्री आणि लेखी स्वरुपात नोंदविलेला आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** उपमहापौर साहेब, नविन निविदा प्रक्रिया नोंदवायला, उपमहापौर साहेब मी पुन्हा आपल्या एकदा लक्षात आणुन देते.

**मा.उपमहापौर :-** ज्या पध्दतीने प्रशासनाला महापौरांनी आदेशीत करुन त्याप्रमाणे त्याची दखल देखील घेतलेली आहे. येणाऱ्या काळामध्ये आपल्याला ज्या या प्रकल्पासंदर्भात ज्या काही अडचणी असतील.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** नविन निविदा प्रक्रिया करायला काय अडचण आहे. याच उत्तर अजुन ही आयुक्तांनी सभागृहाला दिलेल नाही.

**मा.उपमहापौर :-** किंवा याच्या संदर्भातल्या ज्या काही समस्यांचा निराकरण करुन घ्यायच असेल मला असे वाटते संबंधीत आमचे प्रोजेक्ट ऑफिसर असतील, आयुक्त महोदय असतील किंवा आरोग्याचे आमचे जे काही अधिकारी असतील. यांच्याशी आपण एकदा पुन्हा चर्चा करावी. आपल्याला ज्या ज्या प्रश्नांवरती ज्या ज्या समस्यांच

निराकरण करुन घ्यायच आहे. किंवा ज्या समस्या आपल्याला वाटतील त्याबाबतीत आपण त्यांच्याशी चर्चा करु शकतात.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** कुलभुषण भाऊ, एक सादा सरळ प्रश्न येथे भारतीय जनता पार्टी मार्फत उपस्थित केलेला आहे. प्रशासन नविन निविदा का काढत नाही.

**मा.उपमहापौर :-** मला असे वाटते की, जर या ठिकाणी आपला विरोध असेल तर महापौरांना माझी विनंती आहे की, आपला विरोध नोंदवुन बहुमताने ठराव मंजुर करुन पुढील विषय घेण्यास हरकत नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** कुलभुषण भाऊ, सादा सरळ प्रश्न आहे. आयुक्तांनी उत्तर याला अजुन ही दिलेल नाही.

**मा.उपमहापौर :-** चर्चा झाली ना आपली त्याच्यावर २ तास चर्चा झाली. आपण पुन्हा पुन्हा तेच तेच चर्चा करतात.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** नुसती चर्चा होत आहे. मुळ विषयाला बगल देवुन २ तास नाही ५ तास चर्चा करता येऊ शकते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई.

**मा.उपमहापौर :-** हे होवु द्यायचे नाही का जळगांव शहरासाठी. मला एक सांगा जळगावं शहर वासियांसाठी हा विषय होवु द्यायचा नाही का ?

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** चर्चा झाली चर्चा झाली काय करत आहे तुम्ही मला.मुळ विषयाला कायम बगल देत आहे, प्रशासनाने जबाबदारी स्विकारावी.

**मा.उपमहापौर :-** बऱ्याच वर्षापासुन त्या ठिकाणचे पवार पार्कचे, त्या चंदु अण्णा नगर मधले लोकं, आमचे पिंप्राळ्यातील लोक, तो धुर आता पिंप्राळा पर्यंत येवुन जळगांव शहरवासी आता त्याच्याकडुन त्रस्त झालेले आहे. हे प्रकल्प जर आपण अश्याच पध्दतीने काही अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे आणि त्यांच्यावर होत असलेल्या कार्यवाहीमुळे जर चाल ढकल करत असेल. तर याच्यामुळे आपल्याला तो प्रोजेक्ट होवु द्यायचा नाही का ?

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** कुलभुषण भाऊ विषयाला वेगळया दिशेने वळन देवु नका. कुलभुषण भाऊ.

**मा.उपमहापौर :-** जळगांव शहरामध्ये आपल्याला या प्रोजेक्टची गरज नाही का ?

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** मुळात घनकचरा प्रकल्पाच्या आजुबाजु जी नागरी वस्ती आहे ना. कुलभुषणभाऊ ऐकुन घ्या माझे, नागरी वस्तीला सगळयात मोठा धाक बसला आहे कुलभुषणभाऊ.

**मा.उपमहापौर :-** आपल्याला असे वाटते का ? १००% आपल्याला जर या सर्व विषयाची चिंता असती तर मला असे वाटते, आपण याच्यामध्ये एक छोटीशी सुचना मांडली असती की, या संबंधीत अधिकाऱ्यांनी जो डी.पी.आर. चुकीचा बनविलेला असेल. त्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन प्रस्ताव शासनाकडे प्रशासनाने पाठविलेला आहे. त्याच्यावर शासन निर्णय घेईल.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** उपमहापौर साहेब, उपमहापौर साहेब, ही सुचना मागच्या महासभेत सर्व पक्षीय नगरसेवकांनी मांडली. काय बोम पाडली प्रशासनाने ते सांगावे आधी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, महापौरताई.

**मा.उपमहापौर :-** आणि आपण ज्या पध्दतीने सांगत आहे. चुकीचा निर्णय घेतला जात आहे. सभागृहाच्या निदर्शनास आले पाहिजे. नगरसेवक दोषी ठरतील. गुन्हे दाखल होतील. प्रशासनाला या सर्व बाबतींचे अधिकार आहे. महानगरपालिका प्रशासनाला या सर्व बाबतीमधले अधिकार आहे की, पुढचा ठराव चुकीचा होत असेल. तर तो विखंडनाला पाठवावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर महोदया, हा विषय जो आहे यात ज्यांचा विरोध आहे त्याचा विरोध नोंदवुन बहुमताने ठराव पारित करण्यात यावा.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** नविन निविदा काढली तर हे जास्त बोजा बसणार आहे हे आपण ठरवुन टाकलं.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, बहुमताने विषय पारित करण्यात यावा, शुचितताई आणि त्यांच्यातील कोणी सदस्याचा विरोध असेल.

**मा.उपमहापौर :-** अनुमोदन आहे या विषयाला.

**मा.महापौर :-** विषय क्र.०६ हे बहुमताने मंजुर करण्यात येत आहे. पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७४० पारित करण्यात आला.**

महासभा ठराव क्र.५५१ दि.१२/०८/२०२१ नूसार जळगांव महानगरपालिकेच्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पच्या कामाचा सन २०१८ मध्ये तयार केलेला D.P.R. हा चूकीचा पध्दतीने तयार करण्यात आल्यामूळे

सदर कामी येणाऱ्रा वाढीव खर्चाचा अतिरिक्त भुर्दंड महानगरपालिकेवर येणार आहे. सदर D.P.R. चूकीचा तयार करण्यात आल्यामुळे त्याची सखोल चौकशी करणेत येवुन डीपीआर न तपासता चुकीचा डीपीआर मंजूरीसाठी पाठविणारे जे-जे अधिकारी, कर्मचारी व तत्कालीन आयुक्त जबाबदार असतील त्यांची रितसर चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यात यावी तोपर्यंत सदरचा विषय तहकूब ठेवणेस मान्यता प्रदान केलेली आहे.

मा.महापौर यांचे जा.क्र./ज.श.म.न.पा./म.का./३१३/२०२१-२२ दि.०४/०२/२०२२ चे पत्रानूसार प्रशासनाने उपरोक्त ठरावाप्रमाणे शासनाकडुन कार्यवाही होणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. तथापी सदयास्थितीत घनकचरा प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वीत नसल्यामुळे दैनंदिन कचरा साचुन वाढतच आहे, त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून यामुळे परिसरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. त्याचप्रमाणे कचऱ्याची विल्हेवाट न लावता सदर ठिकाणी खुप मोठया प्रमाणावर कचरा साचुन नागरीकांचे आरोग्यावर मोठे दुष्परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच घनकचरा प्रक्रिया प्रकल्प परिसरातील रहिवासी नागरीकांकडुन त्यांचे आरोग्यास अपायकारक ठरणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे बाबत सतत मागणी होत आहे.

राष्ट्रीय हरित लवादाचे आदेश, शासनाकडुन याकामासाठी होणारा पाठपुरावा या बाबी विचारात घेता, तसेच सदर प्रकल्पाचा अहवाल शासनस्तरीय सल्लागार यांनी तयार केलेला असल्याने व याबाबत त्यांचे स्तरावर चौकशीची कार्यवाही सुरु असल्याने तहकूब प्रस्ताव मान्यतेसाठी महासभेच्या पटलावर ठेवणेत आलेला आहे.

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरासाठी घनकचरा व्यवस्थापनाच्या स्थापत्य, बायोमायनिंग व विदयुत कामांचे अहवाल हे प्रत्यक्षात आर.सी.सी. संकल्पने, तांत्रिक बदल यामुळे सुधारीत केलेले होते. या बाबत कारणमीमांसा व सुधारणांचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला होता सदर अहवालानुसार अतिरीक्त खर्चासह रक्कम रु.४९,६७,६७,६९०/- ला महासभा ठराव क्र.३३१ दि.१६/१२/२०२० अन्वये महासभेने मान्यता दिलेली होती. सदर सुधारीत तांत्रिक बदलाच्या अहवालास व वाढीव कामांचे अहवालास शासन निर्णय क्र.स्वमअ-२०२१/प्र.क्र.२६(४)/नवि-३४ दि.१४ मे २०२१ अन्वये शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच मुळ अंदाजात व परीणामी स्थापत्य कामात वाढीव झालेली परीमाणे, कमी झालेली परीमाणे, वगळण्यात आलेली परीमाणे, नव्याने समाविष्ट करण्यात आलेली परीमाणे यांची परीगणना करुन सुधारीत तांत्रिक बाबीस व ब-१ निविदेच्या करारानुसार परीमाणात होणाऱ्या वाढीस मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी तांत्रिक मान्यता आदेश क्र.मुअ/नाशिक/तां.मा./७८२/२०२१ दि.२०/०५/२०२१ अन्वये रु.४९,५८,०३,८३०/- च्या वाढीव खर्चासह मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त प्रकल्प अहवालातील कामांपैकी ब-१ नुसार निविदा करार केलेल्या कामांची संविदा रक्कम, विवरण व त्यात होणारी वाढ, निविदेव्यतिरीक्त कामे यांचा तपशिल खालील प्रमाणे-

| अहवालातील ब-१ नुसार निविदा करार केलेली कामे | | | | |
|---|---|---|---|---|
| | कामाचे नाव | निविदा मंजूर रक्कम (२०१६-२०१७ दरसुची) | बदल/वाढीव खर्चासह एकुण संविदा रक्कम | वाढीव रक्कम |
| १ | आव्हाणे शिवार गट नं.८६४ मध्ये १५० टन प्रतिदीन क्षमतेचा घनकचरा प्रकल्प उभारणे. (स्थापत्य कामे) मे.लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनी,औरंगाबाद | रु.१४,४४,३२,८३५/- | रु.२६,५८,५६,७६३/- | रु.१२,१४,२३,९२८/- |
| २ | आव्हाणे शिवार गट नं.८६४ मध्ये साठलेल्या कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया राबविणे. मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि.मुंबई | रु.३,५९,००,०००/- | रु.७,३३,४९,५७०/- | रु.३,७४,४९,५७०/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | ईलेक्ट्रीफिकेशन कामे<br>(निविदे व्यतिरीक्त कामे) | -- | -- | रु.२,३१,४७,४३९/- |
| | | | | रु.१८,२०,२०,९३७/- |

१) सदर कामी अ.क्र.१ चे घनकचरा प्रकल्पाचे स्थापत्य काम सन २०१६-१७ मधील दरसुचीतील दरावर आधारीत असून त्यास १८.९०% जास्तीचे दराने (सन २०१९-२० चे दरसुचीवर ४.९१% कमी) स्विकारण्यास स्थायी समिती ठराव क्र.१६४ दि.११/०९/२०१९ अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर कामी निविदेच्या कलम क्र.१४ (वाढीव कामे / बदल झालेल्या बाबींमुळे करार बाधित होणार नाही) या तरतूदीनुसार सदर कामी निविदेतील अटी व शर्तीनुसार करारात वाढ झालेली कामे मंजुर दराने करणेस मक्तेदार बांधील आहे. त्यानुसार स्विकृत निविदेत सन १६-१७ च्या जिल्हा दरसुची नुसार तयार केलेल्या विवरण पत्र-ब मधील स्थापत्य कामातील सुधारीत बाबी व त्यावर २५% जादा होणारी परीमाणे १८.९०% जास्तीचे दराने (सन २०१९-२० चे दरसुचीवर ४.९१% कमी) काम करणेस तसेच वाढीव होणारी परीमाणे (प्रचलित दरसुचीवर) ४.९१% कमी दराने करणेकामी वाढीव खर्चासह मे.लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनी, औरंगाबाद यांचेशी संविदा करणेस तसेच सदर कामास एप्रिल २०२१ पावेतो मुदत असल्याने प्रकल्पाच्या संरचनेत करावे लागलेले बदल, कामास जागा उपलब्ध न होणे, बदलास सुधारीत मान्यता घेणे, तांत्रिक मान्यता घेणे यामुळे कामास विलंब झाल्याने मुदत संपल्यापासून १२ महीने व त्यानंतर चाचणी कालावधी ६ महीने देवून मुदतवाढीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२) अ.क्र.०२ बायोमायनिंग कामी स्थायी समिती ठराव क्र.१६५ दि.११/०९/२०१९ अन्वये मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. मुंबई यांचे तत्कालीन निविदेतील १५.७२% कमीचे दरास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर मक्तेदार यांनी यापूर्वीच्या प्रकल्प अहवालातील नमूद परीमाणाचे काम पुर्ण केले आहे. तथापि प्रकल्प अहवालात घेण्यात आलेली परीमाणे प्रकल्पअहवाल तयार करण्याच्या दिनांकापर्यंत घेण्यात आलेली होती. मात्र दैनंदीन कचरा संकलन करुन आरोग्य विभागामार्फत याच जागेवर साठवणूक करण्यात येत होता तसेच विस्तृत प्रकल्प अहवालात घेतलेले परीमाण ठोक पध्दतीने घेण्यात आलेले होते. सदर कामी वाढीव परीमाणाचे काम या कामी केलेल्या संविदा कराराचे शर्त क्र.०७ नुसार कामाचे परीमाणात वाढ झाल्यास मंजूर दरात वाढीव काम करणेची तरतूद आहे. सबब मक्तेदार मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि.मुंबई यांचेशी मुळ मंजुर दरात वाढीव कामाची संविदा करणेस व कामाची मुदत वाढवून डिसेंबर २०२१ अखेर मुदतवाढ देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३) अ.क्र.०३ च्या कामाबाबत निविदा प्रक्रिया राबविणेबाबत विदयुत विभागास आदेशित करण्यात आलेले आहे.

४) शासन निर्णय क्र.स्वमअ-२०२१/प्र.क्र.२६(४)/नवि-३४ दि.१४ मे २०२१ अन्वये मूळ स्वरुपात मंजूर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालाच्या किंमतीत सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवालामुळे वाढ होत असल्यास वाढीव खर्च संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून अथवा स्वनिधीमधून भागविण्यात यावा. त्यासाठी शासनामार्फत कोणताही वाढीव निधी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही असे नमूद आहे त्यामुळे प्रकल्पाची आवश्यकता पाहता, सदरचा वाढीव खर्च १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

घनकचरा व्यवस्थपनाअंतर्गत कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे कामी राष्ट्रीय हरीत लवाद, प्रदुषण नियंत्रण मंडळ व राज्य शासन यांचे मार्फत वेळोवेळी सक्तीचे आदेश/सुचना प्राप्त आहेत. त्या कारणे सदरचा प्रकल्प त्वरेने कार्यान्वित करणे आवश्यक आहे. मंजूरातीनुसार प्रकल्पातील स्थापत्य कामांसाठी होणारा खर्च मंजूर दराची तुलना प्रचलित दरसुचीनुसार केल्यास ४.९१% टक्के कमी आहे व बायोमायनिंग कामावर येणारा खर्च विचारात घेता १५.७२% टक्के कमी असल्याने महानगरपालिका हिताचे असल्याने सदरचे कामी निविदा तरतूदीनुसार मूळ निविदाकारांकडून कमी खर्चात सदर काम करता येणे शक्य असल्याने वरील प्रमाणे अ.क्र.०१ ते ०४ च्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. प्रकरणात कोणत्याही प्रकारची आर्थीक अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रकरणातील संपूर्ण प्रक्रिया कायदेशीर बाबी तपासून पूर्ण करावी. कोठेही नियमांचे / कायदयाचे उल्लंघन होणार नाही वा भविष्यात कोणत्याही प्रकारचा आक्षेप येणार नाही याची प्रशासनाने दक्षता घ्यावी. अन्यथा पूढील होणाऱ्या परिणामांची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील याची नोंद घ्यावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ०१ तटस्थ :- ०१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**श्री.चेतन सनकत :-** महापौरताई मला माझे मत मांडायचे आहे या विषयावर. महापौरताई मला या विषयावर माझे मत मांडायचे आहे.

**मा.महापौर :-** पुढील विषय घ्या.

**श्री.सुनिल खडके :-** हॅलो, या विषयावर मला बोलायचे आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** पुन्हा एकदा सांगते महापौरताई, मागे सुध्दा सन्मा.सदस्यांनी हेच सांगितले आहे. बहुमताने आपण मंजुर करा. निश्चित बहुमताने मंजुर करता येईल हा प्रस्ताव. ज्या गोष्टींमध्ये आम्ही आमचे हात काळे केलेले नाही. त्याची जबाबदारी आम्ही आमच्यावर घेणार नाही.

**श्री.सुनिल खडके :-** हॅलो महापौर ताई, या विषयावर मला बोलायचे आहे.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर साहेब, मला या विषयावर बोलायचे आहे. परवानगी मागतो आहे. पुढचा विषय घेवु नका.

**श्री.सुनिल खडके** :- महापौर ताई,

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्र.७ घ्या.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई, मला या विषयावर बोलायचे आहे. पुढचा विषय घेवु नका, कृपया विंनती आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** गोराणे साहेब.

**श्री.चेतन सनकत :-** नगरसचिव साहेब, ऐकुन घ्या.

**नगरसचिव विषय क्र.०७ :-** नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१० अंतर्गत डांबरी रोड, कॉक्रींट रोड, पेव्हींग ब्लॉक बसविणे, पुल व संरक्षण भिंत बांधणे तसेच आर.सी.सी.गटार बांधणे कामी येणारा एकूण खर्च रक्कम रु.४,९९,८०,१२१/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्र.७ हा मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०७

**श्री.चेतन सनकत :-** महापौरताई मला या विषयावर बोलायचे आहे. महापौर ताई. मला बोलण्याची संधी द्यावी.

**मा.महापौर :-** चेतन भाऊ तुम्हाला कोणत्या विषयावर बोलायचे आहे. विषय क्र.०७ सुरु आहे आता.

**श्री.चेतन सनकत :-** घनकचरा, घनकचरा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्र.०७ मान्य करण्यात यावा आणि विषय क्र.०८ वर चर्चा करण्यात यावी.

**श्री.कैलास सोनवणे :-** गोराणे आहो गोराणे. या विषयाला विरोध आहे.

**श्री.सुनिल खडके :-** या विषयावर, घनकचरा प्रकल्पावर मला पण बोलायचे आहे ताई.

**श्री.चेतन सनकत :-** घनकचरा विषयावर मला २ मिनीट माझे मत मांडु द्या.

**श्री.सुरेश सोनवणे :-** मला पण विषय क्र.०७ वर बोलायचे आहे.

**श्री.सुनिल खडके :-** मला या विषयावर बोलायचे आहे ताई. राज्य शासनाचे मत याच्यामध्ये घ्यावे. राज्य शासनाचे मत मागवुन नंतर हा ठराव पारीत करण्यात यावा.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई मला माझे मत मांडायचे आहे या ठरावावर. मला माझे मत मांडण्याचे अधिकार द्या.

**श्री.सुनिल खडके :-** मला पण माझे मत मांडायचे आहे या ठरावावर.

**श्री.कैलास सोनवणे :-** गोराणे साहेब, नियमाने कार्यवाही करा, बहुमत नाही, तुम्ही बहुमताने मंजुर करत आहे महापौरताई.
**श्री.सुनिल खडके :-** मला या विषयावर माझे मत मांडायचे आहे.
**मा.महापौर :-** कोणत्या विषयावर बोलायचे आहे सुनिल भाऊ आपल्याला.
**श्री.सुनिल खडके :-** घनकचरा प्रकल्प विषयावर मला बोलायचे आहे.
**मा.महापौर :-** विषय क्र.०७ सुरु आहे.
**श्री.सुनिल खडके :-** नाही. घनकचरा प्रकल्प विषयावर मला बोलायचे आहे.
**मा.महापौर :-** आपल्याला आपल मत नोंदवायच आहे का ?
**श्री.सुनिल खडके :-** हो मला माझे मत मांडायचे आहे.
**मा.महापौर :-** नोंदवा थोडक्यात थोडक्यात नोंदवा.
**श्री.सुनिल खडके :-** या विषयावर प्रशासनाने आपली भुमिका स्पष्टपणे आयुक्तांनी जाहिर करावी एक, दुसरे राज्य शासनाचे मत याच्यावर मागविण्यात यावे. नंतर याला पारित करण्यात यावे.
**मा.महापौर :-** याबाबत प्रशासनाने आपली पुर्ण भुमिका स्पष्ट केलेली आहे.
**श्री.सुनिल खडके :-** नाही, नाही, राज्य शासनाकडुन या विषयावर मत मागविण्यात यावे.
**मा.महापौर :-** आपण आपल मत नोंदवाव की, या विषयासाठी आपण तटस्थ आहात की, आपण विरोधात आहात की, सहमत आहात की सोबत आहात.
**श्री.सुनिल खडके :-** नाही, याबाबतीत मी तटस्थ आहे.
**मा.महापौर :-** ठिक आहे, तटस्थ.
**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे पुढचा विषय घ्या.
**मा.महापौर :-** विषय क्र.०७ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. विषय क्र.०८.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७४१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१० अंतर्गत डांबरी रोड, कॉक्रींट रोड, पेव्हींग ब्लॉक बसविणे, पुल व संरक्षण भिंत बांधणे तसेच आर.सी.सी.गटार बांधणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्र.नपा/नादवसुयो/आर.आर./७३२/२०२१ दि.११/०६/२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त मनपा यांचे दि.०१/०७/२०२१ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई-निविदा सुचना क्र.९० सन २०२१-२२ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्र.सा.बा./४८८ दि.२७/०८/२०२१ चे पत्रान्वये दै.दिव्यमराठी (जळगांव,नाशिक,औरंगाबाद,सोलापुर,अकोला) या वर्तमान पत्रात दि.२८/०८/२०२१ रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदा कागदपत्रांची छाननी केली असता मक्तेदार यांनी सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदा रक्कम रु.४३६७४६३६/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | वैष्णवी बिल्डकॉन जळगांव | निविदा रक्कमेइतकेचेच दराने | ४३६७४६३६/- |
| २ | एल.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. | निविदा रक्कमेवर ७.७७% जास्तीचे दराने | ४७०६८१५५/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार वैष्णवी बिल्डकॉन जळगांव यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.४३६७४६३६/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद केलेप्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ४३६७४६३६/- |
| ०२ | जि.एस.टी.१२% | ५२४०९५६/- |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | २१८३७३/- |
| ०४ | टेस्टींग जार्चेस | ७१३५०/- |
| ०५ | रॉयल्टी | ७७४८०६/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.:- | ४९९८०१२१/- |

वर नमुद केलेप्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.४९९८०१२१/- मात्र आहे सदर रक्कमेपैकी रक्कम रु.४९९८०१२१/- मात्र नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गतच्या निधीतुन खर्च करावयाचा आहे. त्यानुसार नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१० अंतर्गत डांबरी रोड, कॉक्रींट रोड, पेव्हींग ब्लॉक बसविणे, पुल व संरक्षण भिंत बांधणे तसेच आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार वैष्णवी बिल्डकॉन जळगांव यांचे निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दर स्विकृत करणेस तसेच सदर दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**श्री.कैलास सोनवणे :-** आहो ताई काय घाई आहे, आरामाने बोलु तर द्या.
**श्री.चंद्रशेखर पाटील :-** ६ ला विरोध आहे विरोध.
**श्री.सुरेश सोनवणे :-** बोलु तर द्या आम्हाला,
**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई, बहुमत तर सिध्द करा आपल,
**श्री.चंद्रशेखर पाटील :-** मतदान घ्या, मतदान घ्या.
**श्री.सुरेश सोनवणे :-** मतदान घेण्याची गरज नाही. पण ७ वर बोलु तर द्या.
**श्री.जितेंद्र मराठे :-** ६२ लोकं उपस्थित आहे बहुमत तर सिध्द करा.
**श्री.चंद्रशेखर पाटील :-** मतदान घ्या, मतदान घ्या.
**श्री.कैलास सोनवणे :-** ७ वर बोलायचे आहे.
**श्री.चेतन सनकत :-** महापौरताई मला घनकचरा विषयावर माझे मत मांडायचे आहे.
**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** सर्व नगरसेवकांच्या वतीने महापौरताई विषय क्र.६ मध्ये मतदानाची मागणी केली जात आहे. आता ज्या वेळेला बहुमताने विषय क्र.६ पारित केल्याचे घोषित केले, तर बहुमत सुध्दा आपल्याला सभागृहासमोर सिध्द कराव लागेल. विषय क्र.०६ साठी नगरसचिवांनी एक एक नगरसेवकाचे नांव घेवुन मतदान घ्यावे.
**सौ.भारती सोनवणे :-** ताई परत मागच्या मिटींग...
**श्री.चेतन सनकत :-** सभागृहासमोर मला माझे मत मांडु द्यावे.
**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** बोला, बोला,
**सौ.भारती सोनवणे :-** मागच्या वेळे सारखे आपल्याला परत भांडावे लागेल मतदानासाठी.
**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** मतदान घ्यावे महापौर ताई. बहुमताने आपल्याला विषय मंजुर करायचा असेल, तर आपण बहुमत सिध्द करावे, मतदान घ्यावे अशी सगळयांकडुन मागणी होत आहे. आणि मला वाटते याच्यात अनुचित काही नाही.
**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्र.०७ सुरु आहे ताई आता.
**मा.महापौर :-** ताई, विषय क्र.०७ सुरु आहे. विषय क्र.०६ मध्ये फक्त दोन जणांनी विरोध दर्शविलेला आहे.
**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** नितीन भाऊ, अनेक नगरसेवक वारंवार म्हणत आहे. मतदानाची मागणी करत आहे.
**सौ.उज्वला बेंडाळे :-** घाई करत आहे तुम्ही, बोलु द्या सदस्यांना.
**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** घाई कसली आहे आपल्याला इतकी,
**सौ.मंगला चौधरी :-** सर्वांच मत काय आहे ते बघा ना ताई.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** घाई कशाला इतकी.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आपण सगळे सदस्य येथे महासभेसाठीच आहेत ना. चालु द्या ना ५-६ वाजेपर्यंत महासभा चालु द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** संपुर्ण सदस्यांना चर्चा करायला संपुर्ण संधी दिलेली आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** इतकी घाई कशासाठी चाललेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु या विषयावर चर्चा करणेसाठी सगळयात जास्त संधी तुम्हाला दिलेली आहे.

**सौ.मंगला चौधरी :-** महापौरताई आमचे मतदान घ्या या विषयावर.

**मा.महापौर :-** विषय क्र.७ वर कोणाला बोलायचे आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** नितीन भाऊ, पुर्वी २-२ दिवस महासभा चाललेल्या आहे. आपल्याला तर ज्ञातच आहे.

**सौ.मंगला चौधरी :-** शुचितताई, मतदान घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** घाईचा प्रश्नच नाही. चर्चा करणेसाठी पुरेसा सफिशियन्ट वेळ दिलेला आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** मतदान घ्या नितीन भाऊ. सदस्यांची जर मागणी होत असेल. सगळया सदस्यांची जर अशी भुमिका आहे की, आमचे वैयक्तीक मत नोंदुन घ्यावे. मी भारतीय जनता पार्टीच्या वतीने मत व्यक्त केलेलच आहे. मात्र सगळे सदस्यांना जर आपले वैयक्तीक मत नोंदवायच आहे. तर मतदान घ्यावे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** चेतन भाऊ सनकत यांना बोलायचे आहे. त्यांना बोलु द्यावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्र.६ चर्चे अंति संपल्यानंतर विषय क्र.०७ ची सुरुवात झाल्यानंतर आपण मतदानाची मागणी करतात. ती मात्र रास्त नाही. विषय क्र.६ हा मान्य झाला.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** घाई घाईने विषय पुढे ढकलले जात आहे. नितीन भाऊ हे तुमच्या सुध्दा लक्षात येत आहे. बहुमताने ठराव केलेला आहे तर बहुमत सिध्द करा. आपल्याकडे जर विद्यमान बहुमत आहे तर

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण अर्धा तास चर्चा केली ताई, आपले म्हणणे सगळे आम्ही शांतपणे ऐकुन घेतले ना.

**मा.उपमहापौर :-** शुचितताई, शुचितताई, विषय नं.६ वरती आपल्या मताची या ठिकाणी नोंदणी करण्यात आलेली आहे. आपल्या मताची या ठिकाणी नोंद करण्यात आलेली आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** हो, बहुमत म्हणत आहे ना आपण कुलभुषण भाऊ, आपण बहुमत म्हणत आहात. बहुमताने विषय पारित तर बहुमत सिध्द ही करा ना सभागृहासमोर. सिध्द का करत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** शुचितताई आपण मांडलेल्या सर्व सुचनांचा आम्ही आदर करतो त्या बद्दल वाद नाही. जिथे जिथे प्रशासन कुठे चुकत असेल तर निश्चितपणे ही सर्वांची व सभागृहाची सामुहिक जबाबदारी आहे. परंतु ज्यावेळेला प्रशासन म्हणुन प्रशासनाची सर्व बाबी सविस्तरपणे सभागृहासमोर खुलासा करतात, शहराच्या हिताच्या दृष्टीने आपण हे कुठेतरी समजुन घेणे गरजेचे आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी:-** ५८ लोकं उपस्थिती आहे, ऑनलाईनला फक्त ५८ लोक उपस्थित आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** भाऊ ही माझी एकटीचीच मागणी नाही तर सगळया सदस्यांची मागणी आहे.

**सौ.दिपमाला काळे :-** महापौरताई जर सगळयांची मतदान घेण्याची मागणी आहे तर मतदान घ्या.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, महापौर महोदया,

**सौ.दिपमाला काळे :-** घाई घाई ने विषय आटोपतात, आम्हाला बोलु देत नाही. मतदान घ्याव ही आमची मागणी आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** नुस्ती मनमानी चालली आहे येथे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** ऑनलाईन महासभेमध्ये सन्मा.नगरसेवक ५५ उपस्थित आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.७ वर कोणाला बोलायचे आहे ?

**ॲड सौ.शुचिता हाडा :-** विषय क्र.६ वर सगळयांची मतदानाची मागणी आहे महापौरताई. बहुमताने करा तुम्ही परंतु बहुमत सिध्द करा.

**सौ.मंगला चौधरी :-** महापौर ताई मतदान घ्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर ताई मतदान घ्या.

**सौ.भारती सोनवणे :-** महापौर ताई मतदान घ्या.

**सौ.दिपमाला काळे :-** मतदान घ्यायला काय अडचण आहे, विषय क्र.६ वर मतदान घेण्यात यावे.

**सौ.भारती सोनवणे :-** महापौर ताई मतदान घ्या.

**श्री.सुनिल महाजन :-** विषय क्र.७ मंजूर

**श्री.अश्विन सोनवणे :-** अहो पहिले मतदान घ्या ६ चे. चुकीचे करत आहे तुम्ही.

**श्री.सुनिल महाजन :-** विषय क्र.७ मंजूर

**श्री.अश्विन सोनवणे :-** गोराणे चुकीचे करत आहे तुम्ही.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** चुकीचा पायंडा पाडु नका तुम्ही.

**श्री.अश्विन सोनवणे :-** अहो चुकीचे करत आहे तुम्ही.

**सौ.दिपमाला काळे :-** सिध्द करण्यामध्ये काय अडचण येत आहे.

**सौ.भारती सोनवणे :-** महापौर ताई, मतदान घ्या.

**श्री.राजेंद्र पाटील :-** विरोधी पक्षनेते श्री.सुनिलभाऊ यांनी आपले मत नोंदवावे.

**मा.महापौर:-** शुचिताताई आपल्याला दिड पावणेदोन तास बोलण्याची संधी दिली त्यावेळी आपण मतदानाची मागणी केली नाही त्यावेळी विषय क्र.६ वर निर्णय झालेला आहे आता विषय क्र.७ सुरु आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** अहो ताई.

**सौ.शुचिता हाडा :-** महापौर ताई, पुर्ण भाजपा म्हणुनच मी बोलत आहे. भारतीय जनता पार्टी तर्फेच मी माझे मत व्यक्त केलेले आहे. बहुमताने आपण म्हणता आहांत तर बहुमत सिध्द करा. सर्व नगरसेवकांची एकमुखाने मागणी आहे. आपल्याकडे बहुमत आहे तर आपल्याला भिती कशाची आहे ताई बहुमत आहे तर ते सिध्द करा.

**मा.महापौर :-** आपला विरोध नोंदविलेला आहे बाकी कुठल्याच सदस्याने आपला विरोध सांगितलेला नाही फक्त सन्मा.सदस्य सुनिलभाऊ हे तटस्थ आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** असे कसे सांगितले नाही. असे कसे सांगितले नाही. आमचा विरोध आहे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** विरोध आहे आमचा, विरोध आहे.

**सौ.रंजना सपकाळे :-** आमचा विरोध आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** मी संपुर्ण भारतीय जनता पार्टी तर्फे बोललेले आहे. संपुर्ण भारतीय जनता पार्टीचा विरोध आहे. संपुर्ण भारतीय जनता पार्टी तर्फे मी बोललेले आहे.

**सौ.भारती सोनवणे :-** आमचा विरोध आहे.

**सौ.रंजना सपकाळे :-** आमचा विरोध आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो आपला विरोध नोंदविण्यात आलेला आहे. आता विषय क्र.७ वर काय भुमिका आहे ती स्पष्ट करावी.

**श्री.अश्विन सोनवणे :-** विरोध आहे आमचा.

**सौ.भारती सोनवणे :-** हो आमचा विरोध आहे.

**श्री.नितीन लढढा :-** ठिक आहे काही प्रॉब्लेम नाही.

**सौ.शुचिता हाडा :-** घ्या नां मग मतदान बहुमत आहे नां तुमच्याकडे मग बहुमत सिध्द होवू दया नां सभागहामध्ये.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मतदान घ्या ना नितीनभाऊ.

**श्री.नितीन लढढा :-** आप्पासाहेब विषय क्र.६ हा पारित झालेला आहे तो बहुमताने पारित झालेला आहे.आपला विरोध त्याच्यामध्ये नोंदविलेला आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** नितीनभाऊ शिवसेनेचे इन्डीवीजवल नावे घ्या. बी.जे.पी.ची नावे घ्या बंडखोर जे बी.जे.पी.चे त्यांची वेगळी नावे पुकारा एम.आय.एम. वाल्यांचे मतदान घ्या. रेकॉर्डवर येऊ द्या ना.

**सौ.दिपमाला काळे :-** बहुमत सिध्द करा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** बहुमत सिध्द करा.

**सौ.शुचिता हाडा :-** मतदान घ्या त्यामुळे व त्या निमित्ताने आपले बहुमतसिध्द होईल.

**श्री.नितीन लढढा :-** शुचितातार्इ आपण जसा विरोध नोंदविला आहे. तसा त्यांनी विरोध नोंदविलेला नसल्या कारणाने त्यांचे मत प्रस्तावाच्या बाजुने घेण्यात आलेले आहे.

**मा.उपमहापौर :-** शुचितातार्इ, उपस्थित सदस्यांपैकी फक्त आपला याठिकाणी विरोध नोंदविलेला आहे आणि सुनिलभाऊ खडके यांची भुमिका तटस्थ म्हणून नोंद करण्यात आलेली आहे. त्यावरुन असे सिध्द होते की, ठराव हा बहुमताने मंजूर करण्यात येतो.

**सौ.शुचिता हाडा :-** कुलभुषण भाऊ आपण मास्टर आहात आपले मोड बदलविण्यामध्ये.

**सौ.दिपमाला काळे :-** आता शुचितातार्इ जे विषय मांडत होत्या, आमच्या सगळया नगरसेवकांकडुन ते मत मांडत होत्या. त्यांच वैयक्तीक मत ते मांडत नव्हत्या.

**श्री.सुरेश सोनवणे :-** बंडखोर नगरसेवकांनी पत्र दिलेले आहे आयुक्तांना त्याचे काय ?

**श्री.दिलीप पोकळे :-** बंडखोर कोणाला म्हणत आहे तुम्ही.

**सौ.शुचिता हाडा :-** मतदान घ्या नगरसेवकांचे मतदान घ्या.

**श्री.दिलीप पोकळे :-** बंडखोर सिध्द करुन दाखवा. बंडखोर म्हणण्यावरुन मानहानीचा दावा दाखल करु आम्ही.

**श्री.अश्विन सोनवणे :-** शिवसेनेच्या नगरसेवकांनी...

**श्री.दिलीप पोकळे :-** बंडखोर शब्द वापरु नका.

**सौ.शुचिता हाडा :-** प्रत्येक नगरसेवकाची नांवे घेवुन मतदान घ्या.

**श्री.नितीन लढढा :-** महापौर तार्इ विषय क्र.७ मंजूर करावा

**सौ.शुचिता हाडा :-** विषय क्र.६ वर मतदान घ्या आणि बहुमत सिध्द करा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मतदान घ्या.

**सौ.मंगला चौधरी :-** मतदान घ्या.

**श्री.अश्विन सोनवणे :-** सुनिलभाऊ मतदान घ्या.

**मा.महापौर :-** विषय क्र.७

**श्री.सुरेश सोनवणे :-** शिवसेनेच्या काही नगरसेवकांनी याविरोधात आयुक्तांकडे पत्र दिलेले आहे त्या पत्राचे काय ?

**मा.उपमहापौर :-** अनुमोदन आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** ६ नंबर झालेला नाही अजून.

**श्री.दिलीप पोकळे :-** गटनेत्यांचे मत नोंदवा येथे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** पुढचा विषय घ्या.

**श्री.दिलीप पोकळे :-** गटनेत्यांना बोलवा गटनेता कुठे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पुढचा विषय घ्या तार्इ.

**श्री.राजेंद्र पाटील :-** विषय क्र.६ वर मतदान घेण्यात यावे.

**सौ.मंगला चौधरी :-** महापौरतार्इ मतदान घ्या या विषयावर.

**श्री.अश्विन सोनवणे :-** सुनिलभाऊ मतदान घ्यायला लावा.

मा.महापौर :- नगरसचिव यांनी विषय क्र.७ घ्यावा.

**श्री.सुरेश सोनवणे :-** काही शिवेसनेच्या नगरसेवकांनी पत्र दिलेले आहे या विषयाच्या विरोधात त्याचे काय?

**नगरसचिव विषय क्र.०७ :-** नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१० अंतर्गत डांबरी रोड, कॉक्रींट रोड, पेव्हींग ब्लॉक बसविणे, पुल व संरक्षण भिंत बांधणे तसेच आर.सी.सी.गटार बांधणे कामी येणारा एकूण खर्च रक्कम रु.४,९९,८०,१२१/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सौ.शुचिता हाडा :-** महापौर ताई विषय क्र.६ वर मतदान घेण्यात यावे.

**सौ.मंगला चौधरी :-** मतदान घ्याना ताई.

**श्री.नितीन लढढा :-** विषय क्र.७ मंजूर करण्यात यावा विषय क्र.८ घेण्यात यावा.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** मतदान घ्या.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** विषय क्र.८ मंजुर

**श्री.धिरज सोनवणे :-** मतदान घ्या, सुनिल भाऊ, मतदान. मतदान व्हायला पाहिजे या विषयावर.

**सौ.दिपमाला काळे :-** विषय क्र.६ वर मतदान व्हायला पाहिजे, तुम्ही जेव्हा बोलले की, बहुमत आहे, तर ते सिध्द करा बहुमत आणि मग मंजुर करुन घ्या विषय.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई पुढचा विषय घ्या.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई आपल्याला ६ वा विषय मंजुर करायचा आहे बहुमताने आपण निश्चित करा. पण बहुमत आपले सिध्द करा. आपल्याकडे बहुमत आहे ना महापौरताई तर अडचण काय आहे बहुमत सिध्द करायला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्र.८ घ्यावा महापौरताई.

**मा.महापौर :-** नितीनभाऊ बोला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्र.८ घेण्यात यावा महापौरताई.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** मतदान मतदान घ्या मतदान.

**मा.उपमहापौर :-** विषय क्र.७ ला माझे अनुमोदन आहे.

**श्री.सुरेश सोनवणे :-** मला विषय क्र.७ वर बोलायचे आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** विषय क्र.६ वर मतदान घ्या.

**श्री.अश्विन सोनवणे :-** बहुमत सिध्द करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** मतदान घ्या.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मतदान घ्या, मतदान घ्या गोराणे साहेब.

**श्री.कैलास सोनवणे :-** गोराणे साहेब.

**सौ.शुचिता हाडा :-** लोकशाहीच्या मुलभुत मुल्याची आपण पायमल्ली करत आहात.या पध्दतीने विषय पूढे रेटून नेवू नका ताई शांततेत सभा सहज चालू शकते आणि आपण खुप चांगल्या पध्दतीने सभा चालवू शकतात.

**श्री.कैलास सोनवणे :-** गोराणे साहेब, गोराणे साहेब, कुठे गेले रे हे. गोराणे साहेब. आवाज येत आहे का ? गोराणे साहेब,

**नगरसचिव :- विषय क्र.८ :-** मनपा पाणी पुरवठा विभागाकडील मशिन क्रं.एम एच १९ एम ०१२५ (जे.सी.बी.) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणारा एकूण खर्च रक्कम रु.१,०५,९११/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढढा :-** विषय क्र.८ मान्य करण्यात यावा ताई

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मतदान घ्या, मतदान घ्या.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मतदान घ्या.

**श्री.जितेंद्र मराठे :-** मतदान घ्या.

**सौ.मंगला चौधरी :-** ताई, मतदान घ्या.

**सौ.भारती सोनवणे :-** मतदान घ्या ताई.

**मा.महापौर :-** विषय क्र.८ सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे. नगरसचिव यांनी पूढील विषय घ्यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७४२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा मशिन क्रं.एम एच १९ एम ०१२५ (जे.सी.बी.) हे वाहन पाणी पुरवठा विभागात अत्यावश्यक सेवेत कार्यरत आहे. सदर मशिनचे दुरुस्तीचे काम करणे कामी प्रत्यक्ष तांत्रिक पाहणी केली असता वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीचे कामे पार्टस् / मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| मनपा मशिन क्रं.एम एच १९ एम ०१२५ (जे.सी.बी.) (उत्पादीत वर्ष एप्रिल-२०००) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| 1 | Oil Filter -1 Nos | 20 | Gear Lever Gaiter -1 Nos |
| 2 | Gasket - Suction STRA -2 Nos | 21 | Bulk Roller -1 Nos |
| 3 | Gasket Valve Block -2 Nos | 22 | Gasket -Gear Lever -2 Nos |
| 4 | Pump Assembly -1 Nos | 23 | Locking Screw -2 Nos |
| 5 | Seal Ring -1 Nos | 24 | Master Cylinder -2 Nos |
| 6 | O -Ring Seal -2 Nos | 25 | Brake Counter Plate -12 Nos |
| 7 | Stack Nut -1 Nos | 26 | Brake Friction Plate -10 Nos |
| 8 | Friction Plate -12 Nos | 27 | Brake Seal -2 Nos |
| 9 | Counter Plate - Clutc -10 Nos | 28 | Brake Seal -2 Nos |
| 10 | Disc Spring Assy -2 Nos | 29 | Grease Nipple -2 Nos |
| 11 | O -Ring Seal -2 Nos | 30 | Seal -Cassette -2 Nos |
| 12 | Piston Clutch -2 Nos | 31 | Bearing -4 Nos |
| 13 | O -Ring Seal -2 Nos | 32 | Verbus Ripp Bolt -M1 -16 Nos |
| 14 | Sealing Ring Insert -4 Nos | 33 | O -Ring Seal -2 Nos |
| 15 | Gear Shift Ball Seating - 1 Nos | 34 | Rubber Mounting -2 Nos |
| 16 | Gear Shift Ball Washer - 2 Nos | 35 | JCB Rear Axle Oil -20 Ltr |
| 17 | Pivot Pin - 2 Nos | 36 | JCB Rear Axle Oil -5 Ltr |
| 18 | Gear Shift Bot Stabl -1 Nos | 37 | JCB Transmission Oil Plus -20 Ltr |
| 19 | Top Gear Shift Lever -1 Nos | 38 | All Labour Charges |

वर तक्त्यात नमुद केलेप्रमाणे मनपा मशिन क्रं.एम एच १९ एम ०१२५ (जे.सी.बी.) या वाहनाची दुरुस्तीची कामे पार्टस् / मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.सुयान इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.जळगांव यांचेकडील प्रोफॉर्माइन्व्हाइस नुसार रक्कम रु.१,०५,९११/- मात्रचे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र.९ :-** महानगरपालिका मालकीच्या विविध प्रकारच्या वाहनांकरिता सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी आय.ओ.सी.लि.पानेवाडी, मनमाड यांचेकडून २० नग डिझेल टँकर (इंधन) X (१२००० लि.क्षमतेचे) खरेदी करणे कामी वेळोवेळी येणाऱ्या पर्यायी डिझेल खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सौ.मंगला चौधरी :-** महापौरताई, आमचा विषय क्र.६ ला विरोध आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** नितीनभाऊ तुम्हाला एक नम्र विनंती करायची आहे आपण भिष्माचार्याच्या भूमिकेतून बाहेर पडा. नगरसचिव साहेब आपल्याला नम्रपणे विनंती आहे. नितीन भाऊ कृपया आपण भिष्मचार्याच्या भुमिकेतुन बाहेर पडा. नगरसचिव साहेब आणि श्री.नितीनभाऊ आपण दोघं नैत्तीक मुल्यांची जपवणुक करणारे आहांत.

**श्री.अश्विन सोनवणे :-** नितीन भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो अप्पा.

**श्री.सुरेश सोनवणे :-** मला ७ वर बोलायचे आहे. मी कोर्टात जाईन तुम्ही बोलूच देत नाही नां.

**सौ.शुचिता हाडा :-** नितीनभाऊ भिष्माचार्याच्या भूमिकेतून बाहेर पडा.

**श्री.अश्विन सोनवणे :-** नितीन भाऊ, चुकीच करत आहात नितीन भाऊ, मतदान घ्यायला पाहीजे.

**श्री.नितीन लढढा :-** मी ग्वाही देतो आपल्याला चुकीच काम होणार नाही. शेवटी अश्विनभाऊ मी काय म्हणतो आपल्याला या शहराच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घ्यायचे आहेत आपण कुठेही चुकीचा पायंडा पाडत नाही फक्त आता पक्षीय मतभेद असू शकतात आपले

**श्री.सुरेश सोनवणे :-** मला ७ वर बोलायचे आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** नितीनभाऊ मला आपल्याला एक विनंती करायची आहे आपण भिष्माचार्याच्या भूमिकेतून बाहेर पडा. जर आपल बहुमत आहे तर ते सिध्द करा. भिष्माचार्याच्या भूमिकेतून बाहेर पडा नां अडचण काय आहे आपल्याला बहुमत आहे नां ते सिध्द होवू दया. बरं होईल ना या निमित्ताने आपले ही बहुमत सिध्द होईल.

**श्री.नितीन लढढा :-** ताई आपण कुठल्याही चुकीच्या कामांना पाठीशी घालणार नाही.

**श्री.जितेंद्र मराठे :-** नितीनभाऊ बहुमत सिध्द केले पाहीजे नां.

**श्री.नितीन लढढा :-** ज्यावेळी विषय क्र.६ चालू होता त्या वेळेला...(आवाज स्पष्ट ऐकु आला नाही)

**श्री.सुरेश सोनवणे :-** मला ७ वर बोलायचे आहे. मी कोर्टात जाईन तुम्ही बोलूच देत नाही नां.

**श्री.नितीन लढढा :-** विषय क्र.९ सुरु आहे सुरेशभाऊ.

**श्री.सुरेश सोनवणे :-** नाही मला ७ वर बोलायचे आहे मी केंव्हाचा बोलतो आहे मला ७ वर बोलायचे आहे

**श्री.नितीन लढढा :-** विषय क्र.९ सुरु आहे सुरेश भाऊ.

**श्री.सुरेश सोनवणे :-** नाही मला ७ वर बोलायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई, विषय क्र.९ मान्य करण्यात यावा ताई.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** विषय क्र.१० घ्या. पुढचा विषय घ्या.

**श्री.सुरेश सोनवणे :-** नितीन भाऊ, नाही मला ७ वर बोलायचे आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** त्यावेळेला बोलायला पाहिजे होते ना.

**श्री.जितेंद्र मराठे :-** मनमानी कारभार करता आहेत हे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, विषय क्र.१० घ्या. सुरेश भाऊ काळजी करु नका, आपल्याकडे दलितवस्तीचा भरपुर निधी येणार आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** ठक्कर बाबाचे १० कोटी येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७४३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेकडील आरोग्य, अग्निशमन, दवाखाने, पाणी पुरवठा, सार्वजनिक बांधकाम, मलेरिया, अतिक्रमण, विदयुत, प्रशासकीय विभागाकडील कार्यरत वाहनांकरिता वेळोवेळी इंधन (डिझेलची) आवश्यकता असते करिता वाहनांसाठी डिझेल खरेदी करणे आवश्यक आहे. डिझेल खरेदी करणे कामी अर्थ संकल्पीय बजेट तरतुद सन २०२१-२२ मध्ये इंधन खरेदी या शिर्षाखाली स्वतंत्र बजेट तरतुद रक्कम रु.१.५ कोटी मात्रची तरतुद करण्यात आलेली आहे. डिझेल वाटप करणेकामी महानगरपालिका मालकीच्या डिझेल पंप आर.एल.चौफुली, एम.आय.डी.सी. फायर स्टेशन जळगांव येथे कार्यान्वित असुन त्या ठिकाणावरुन विविध विभागाकडील कार्यरत असलेल्या वाहनांवरील कार्यरत असलेले वाहन चालक व संबंधीत प्राधिकृत अधिकारी यांचे मागणीनिहाय डिझेल वाटप करण्यात

येते. महानगरपालिका डिझेल खरेदी ही शासकीय दरामध्ये आय.ओ.सी.लि.पानेवाडी, मनमाड येथून करणेत येते. डिझेल खरेदीची किंमतीमध्ये वेळोवेळी चढ-उतार (परिवर्तन) होत असतात.

आर्थिक वर्ष २०२१-२२ करिता आय.ओ.सी.लि.पानेवाडी, मनमाड यांचेकडून आज पावेतो ८ डिझेल (इंधन) टँकरची खरेदी करण्यात आलेली आहे. आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये महानगरपालिकेकडील डिझेल पंपाकरिता अंदाजीत २० नग डिझेल (इंधन) टँकरची (१२००० लि.क्षमतेचे X २० टँकर) आवश्यकता असल्याने महानगरपालिका मालकीच्या विविध प्रकारच्या वाहनांकरिता सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी आय.ओ.सी.लि.पानेवाडी, मनमाड यांचेकडून २० नग डिझेल टँकर (इंधन) X (१२००० लि.क्षमतेचे) खरेदी करणे कामी वेळोवेळी येणाऱ्या पर्यायी डिझेल खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :-** विषय क्र.१० :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१२ अंतर्गत शिवरामनगर सुयोग कॉलनी, गुलमोहर कॉलनी, गुरुकुल कॉलनी परिसर तसेच आस्वाद चौक ते गिरणा टाकी पर्यंतच्या भागात रस्ते डांबरीकरण करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१,१०,८४,६००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढढा :-** मान्य करण्यात यावा ताई.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.सुरेश सोनवणे :-** मला विषय क्र.७ वर बोलायचे आहे मी कोर्टात जाईल कोर्टात.

**श्री.जितेंद्र मराठे :-** बोलु द्या ना ही कुठल्या प्रकारची लोकशाही आहे.

**श्री.मंगला चौधरी :-** बोलु द्याना महापौरताई.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७४४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१२ अंतर्गत शिवरामनगर सुयोग कॉलनी, गुलमोहर कॉलनी, गुरुकुल कॉलनी परिसर तसेच आस्वाद चौक ते गिरणा टाकी पर्यंतच्या भागात रस्ते डांबरीकरण करणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्र.नपा/नियोजन/आर.आर./७५१/२०२१ दि.२३/०६/२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त मनपा यांचे दि.०५/०७/२०२१ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई-निविदा सुचना क्र.८४ सन २०२१-२२ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्र.सा.बा./३४७ दि.१३/०७/२०२१ चे पत्रान्वये दै.लोकमत (नागपुर,औरंगाबाद,मुंबई,नाशिक) या वर्तमान पत्रात दि.१४/०७/२०२१ रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत ०४ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदा कागदपत्रांची छाननी केली असता मक्तेदार योगराज कंन्स्ट्रक्शन यांना निविदा समितीच्या मान्यतेनुसार अपात्र ठरविण्यात आले असून उर्वरीत मक्तेदार यांनी सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदा रक्कम रु.११०९७५९७/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | शिवशक्ती कंन्स्ट्रक्शन,जळगांव | निविदा रक्कमेपेक्षा ११.६१% कमीचे दराने | ९८०९१६६/- |
| २ | तुलसी इंन्फ्रास्ट्रक्चर,जळगांव | निविदा रक्कमेवर ५.९७% जास्तीचे दराने | ११७६०१२४/- |
| ३ | तुषार रमेश महाजन | निविदा रक्कमेपेक्षा ११.३४% कमीचे दराने | ९८३९१२९/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार शिवशक्ती कंन्स्ट्रक्शन,जळगांव यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा ११.६१% दर सर्वात कमीचे आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.९८०९१६६/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ९८०९१६६/- |
| ०२ | जि.एस.टी.१२% | ११७७१००/- |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | ४९०४६/- |
| ०४ | टेस्टींग जार्चेस | १८३५०/- |
| ०५ | रॉयल्टी | ३०९३८/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.:- | ११०८४६००/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.११०८४६००/- मात्र आहे. परंतु मक्तेदार शिवशक्ती कंन्स्ट्रक्शन,जळगांव यांचे निविदा रक्कमेपेक्षा ११.६१% कमीचे दर सर्वात कमी आलेले असुन निविदा अटी व शर्ती नुसार १ ते १० टक्के कमीचे दरा पर्यंत १ टक्का व त्यावरील ११ ते १५ टक्का पर्यंतच्या कमीचे दरास प्रति टक्याला १ टक्का याप्रमाणे परफार्मन्स सिक्युरिटी डि.डी. सादर करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मक्तेदार शिवशक्ती कंन्स्ट्रक्शन,जळगांव यांनी निविदा रक्कमेपेक्षा ११.६१% कमीचे दर सादर केलेले असल्याने त्यांच्या कडुन ३% परफार्मन्स सिक्युरिटी म्हणुन अनामत रक्कम रु.३३२५३८/- मात्रचा डि.डि. मनपा खजिन्यात सादर करण्या करीता मक्तेदार यांना कळविले असता मक्तेदार यांनी मुदतीत मनपा पावती क्र.२५८१ दि.०१/०१/२०२२ रोजी रक्कम रु.३३३०००/- मात्रचा डि.डि क्रं.५६४७१० जमा केलेला आहे. त्यानुसार सदर कामी वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.११०८४६००/- मात्र आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम रु.७७५९२२०/- मात्र महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन योजने अंतर्गतच्या निधीतुन व याच योजनेतील मनपा हिस्सा रक्कम रु.३३२५३८०/- मात्र मनपा निधीतुन सन २०२१-२२ चे लेखा शिर्ष महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान मनपा हिस्सा या लेखाशिर्षतुन करणेस तसेच मक्तेदार शिवशक्ती कंन्स्ट्रक्शन,जळगांव यांचे निविदा रक्कमेपेक्षा ११.६१% कमीचे दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६२ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र.११ :-** जळगांव शहरातील मेलेले जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे कामी १.श्री.नंदु शहादु नाडे २.श्री.अशोक रामा सोनवणे यांची तात्पुरत्या स्वरुपात मानसेवी कामगार म्हणून मानधनावर ६ महिन्याकरिता नेमणूक करणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढढा :-** विषय क्र.११ मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.११ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.सुरेश सोनवणे :-** महापौरताई मला विषय क्र.७ वर बोलायचे आहे. महापौरताई विकास कामांना माझा पाठींबा आहे पण मला विषय क्र.७ वर बोलु तर द्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७४५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम ३०९ (१) नुसार शहरातील मेलेले जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे महापालिकेचे कर्तव्य आहे. अर्जदार / मानसेवी कामगार श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे यांनी दि.०३/०१/२०२२ रोजी अर्ज देवून शहरातील मेलेले जनावरे उचलणे कामाकरिता ६ महिने करिता मुदत वाढीचा अर्ज केलेला आहे.

तसेच श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार हे गेल्या १५ ते २० वर्षापासून ६ महिन्याचे मुदतीवर प्रत्येकी रु.१६,९२०/- प्रमाणे मानधनावर दोन्ही कामगार शहरातील दैनंदिन मेलेले जनावरे उचलणेचे काम व्यवस्थित करित असून स्थायी समिती ठराव क्रं.३६५ दि.२०/०९/२०२१ मंजूरी अन्वये दरमहा रु.१६,९२०/- मानधनावर शहरातील मृत जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ अन्वये अटी शर्तीस अधीन राहून तात्पुरर्ती नियुक्ती करणेस मान्यता प्रदान केलेली आहे. सदरची मुदत दि.२७/०८/२०२१ पासून ते पूढील ६ महिने दि.२६/०१/२०२२ रोजी संपत असल्याने पूढील ६ महिन्याच्या कालावधीसाठी पुन्हा दोन दिवसांचा खंड देवून मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार यांना पुर्वीच्या नियुक्ती मध्ये २ दिवसांचा खंड देवून दि.२७/०८/२०२१ ते दि.२६/०१/२०२२ पर्यंत (६ महिने) तात्पुरर्ती नियुक्ती देवुन रु.१६,९२०/- प्रत्येक कामगार प्रमाणे दरमहा सहा महिनेकरिता दोन्ही मानसेवी कामगारांचा एकूण रु.२,०३,०४०/- खर्च नुसार मेलेले जनावरांची विल्हेवाटीचे काम दैनंदिन सुरु आहे.

तसेच श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार यांना सहा महिन्याचा मुदतवाढीच्या येणाऱ्या रु.२,०३,०४०/- खर्चास व तात्पुरर्ती नियुक्ती देणेस स्थायी समिती ठराव क्र.३६५ दि.२०/०९/२०२१ मंजूरी अन्वये दोन्ही मानसेवी कामगारांचे मानधन देणे करिता सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये अंदाजपत्रकीय (रोजंदारी/मानधन) या लेखाशिर्षा अंतर्गत रु.१२ लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ अन्वये अटी शर्तीस अधीन राहून तात्पुरती नियुक्ती दि.२७/०८/२०२१ ते दि.२६/०१/२०२२ पर्यंत कामाची मुदत आहे. सदर मुदत संपल्यानंतर दोन्ही मानसेवी कामगार १.नंदु शहादु नाडे २.अशोक रामा सोनवणे यांना दोन दिवसांचा खंड देवून पुन्हा ६ महिने (दि.२९/०१/२०२२ ते २८/०७/२०२२) अशा मुदतीस व प्रती मानसेवी कामगार प्रत्येकास रु.१६,९२०/- X २ कामगार रु.३३,८४०/- प्रतीमहा प्रमाणे ६ महिने कालावधीसाठी एकूण रु.२,०३,०४०/- च्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६२ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र.१२ :-** मनपा सि.स.नं.२१८३ (जुनी नगरपालिकेची जागा) व सि.स.नं.१९३७ (जुनी साने गुरुजी रुग्णालयाची जागा) या जागांवर वाहनतळाची सुविधा पैसे भरा व वापरा या तत्वावर दोन वर्षा करीता वाहन तळ चालविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढढा :-** विषय क्र.१२ मान्य करण्यात यावा

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढढा :-** अप्पा साहेब, कैलास अप्पा साहेब, माझी विनंती आहे की, संपुर्ण प्रशासनाचे प्रस्ताव आहे २१ पर्यंतचे तर मला वाटते मान्य करण्यास हरकत नसावी अप्पा साहेब.

**श्री.सुरेश सोनवणे :-** नितीन भाऊ, आम्हाला पुर्ण प्रस्ताव मान्य आहे पण मला विषय क्र.७ वर बोलु तर द्या मी केव्हाचा बोलत आहे मला विषय क्र.७ वर बोलु द्या. आम्ही प्रस्तावाच्या विरोधात नाही किंवा कामाच्या विरोधात नाही. कमीत कमी सातवर मत तर मांडु द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बोला बोला सुरेशभाऊ बोला.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** बोला बोला.

**श्री.सुरेश सोनवणे :-** मला सातवर बोलु द्या.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** ठिक आहे, बोल बोल. बोल सुरेशभाऊ.

**मा.उपमहापौर :-** विषय क्र.७ होवुन आता विषय क्र.१३ वा चालु आहे. आपण त्या टाईमात बोलायला पाहिजे. सर्वानुमते विषय मंजुर झाला. आपण त्यावेळेस का बोलले नाही.आता १३ नंबरचा विषय चालु आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कुलभुषणभाऊ, कुलभुषणभाऊ,

**श्री.सुरेश सोनवणे :-** पण मी काय म्हणतो मला मत तर मांडु द्या.तुम्ही बोलुच देत नाही.

**श्री.जितेंद्र मराठे :-** आपली जबाबदारी आहे, मतदान घ्या घ्या. नगरसचिव साहेब प्रशासनाकडुन आपली जबाबदारी आहे.

**श्री.सुरेश सोनवणे :-** तुम्ही बोलुच देत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सुरेशभाऊंच्या सुचना फक्त ऐकुन घ्यावे. बोला सुरेशभाऊ.

**श्री.सुरेश सोनवणे :-** माझे असे म्हणणे आहे, ५ कोटीचा जो निधी आहे वार्ड क्र.१० याला भारतीय जनता पार्टीचा विरोध नाही. त्याला पाठींबाच आहे.

**मा.उपमहापौर :-** अभिनंदन तुमच, उशिरा काय होई ना जाग आली, अभिनंदन.

**श्री.सुरेश सोनवणे :-** ५ कोटीचे काम करत असतांना जी काही सेव्हिंग उरेल. ते काम संत मिराबाई नगर मध्ये करण्यात यावे आणि दुसरा विषय माझा प्रश्न असा आहे की, दलित वस्तीचा निधी हा कुठे व का खर्च करत आहे का. खर्च करण्यात येतो. ही प्रशासनाने सविस्तर माहिती द्यावी. प्रशासनाने माहिती द्यावी दलित वस्तीचा निधी हा कुठे व का खर्च करण्यात येतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सुरेश भाऊ.

**श्री.सुरेश सोनवणे :-** हो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** दलित वस्तीच्या संपुर्ण कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार मा.जिल्हाधिकारी महोदयांना असतात.

**श्री.सुरेश सोनवणे :-** हो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि याच्यामुळे ज्या काही नियमात आपण ज्या पध्दतीने आपण ठराव पारित केले असतील. आणि ते ठराव या सभागृहाने सर्वानुमते त्यावेळेला पारित केलेले होते. आणि त्याच प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता मा.जिल्हाधिकारींनी दिलेली आहे. आणि राहिला तुमचा कॉस्ट सेव्हिंगचा, जी काही कॉस्ट सेव्हिंग होईल त्याच्यामध्ये तुमचे जे काही म्हणणे आहे. संत मिराबाई नगर मधले कामे प्रस्तावीत करण्यात यावे ते निश्चितपणे संत मिराबाई नगर मध्ये प्रस्तावीत करण्यात येतील. तुमची विनंती जी आहे ती मान्य करण्यात येत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीनभाऊ, नितीनभाऊ,

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो अप्पा.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीनभाऊ, ७ नंबरचा जो विषय आहे ना तो विषय मंजुर आहे परंतु जे १५ कोटी येणार आहे नविन तर ते चार वार्डामध्ये ३-३ कोटी आणि या वार्डामध्ये २ कोटी घ्यायचे. आणि उर्वरित १ कोटी जे आहे ना. म्हणजे प्रभाग क्र.१० मध्ये २ कोटी घ्या. आणि जे १ कोटी उरेल ना ते ज्या ठिकाणी दलितवस्त्या आहे पण आरक्षण नाही दलितवस्तीचा त्या ठिकाणी ते वापरण्यात यावे. उदा. आंबेडकर बाबांचा आठवडे बाजारातला पुतळा आहे. त्या ठिकाणी वापरता येईल का आपल्याला तो निधी?

**श्री.दिलीप पोकळे :-** अप्पा,

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा साहेब, येणारा पुढील वर्षामधला दलित वस्तीचा निधी आहे ना. ते नियोजन आपल्याला निश्चितपणे विचारात घेवुन नक्की करु.

**श्री.दिलीप पोकळे :-** १ रुपया आलेला नाही त्याच काय ?

**मा.महापौर :-** अप्पा साहेब, प्रशासन कार्यवाही करेल.

**श्री.कैलास सोनवणे :-** बरोबर, आता ६ नंबरच्या विषयाच काय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे पुढील विषय घ्या. मला वाटतं अप्पा बाकीचे सगळे विषय मान्य करण्यात यावे अशी विनंती आहे, म्हणजे वेळ वाया जाणार नाही सभागृहाचा.

**मा.महापौर :-** विषय क्र.१३ घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७४६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, बांधकाम विभागाकडील आदेश क्र.मनपा/प्रकल्प/पवडी/३/२०१८ दि.१२/०४/२०१८ अन्वये मनपा जागेवर सि.स.नं.२१८३ (जुनी नगरपालिकेची जागा) व सि.स.नं.१९३७ (जुनी सानेगुरुजी रुग्णालयाची जागा) या जागांवर वाहनतळाची सुविधा पैसे भरा व वापरा या तत्वावर तीन वर्षा करीता वाहन तळ चालविणे कामी मक्तेदार न्यु हिंदुस्थान सिक्युरीटी सर्वीसेस यांना मक्ता देण्यात आला होता. सदरचा मक्ता प्रतिवर्ष रुपये ३२७६५०/- मात्र मनपाकडेस समान चार हप्त्यात भरणा करणेच्या अटींवर एकुण तीन वर्षाकरीता रुपये ९८२८३६/- मात्र रक्कमेत मक्ता देण्यात आला होता. सदरचा मक्त्याचा कालावधीत कोविड-१९ निर्बंधा मुळे मक्तेदारास मुदत वाढ देवुन दि.१९/१२/२०२१ रोजी मक्त्याचा कालावधी संपला आहे.

आयुक्त यांनी जुनी न.पा.जागा (सि.स.नं.१९३७ब,क,ड,फ) व सानेगुरुजी रुग्णालयाच्या खुल्या जागेवर (सि.स.नं.२१८४) या जागांवर खाजगी सहभाग तत्वावर (PPP Basis) वाहनतळ चालविणेस देणे कामी नविन मक्त्याची निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मागील वर्षाच्या दरामध्ये /रकमेमध्ये १०% वाढ करुन स्थायी समितीच्या कार्योत्तर मान्यतेस अधिन राहुन नविन निविदा प्रक्रिया होई पावेतो मुदत वाढीस मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार मक्तेदार यांना पत्र क्र.मा.व./जाक्र./१८२५/दि.२४/१२/२०२१ अन्वये निविदा प्रक्रिया पुर्ण होई पावेतो मागील मक्ता देय रकमेत १०% वाढ करुन स्थायी समितीच्या कार्योत्तर मान्यतेस अधिन राहुन मुदतवाढ देण्यात आलेली असल्याने मक्तेदार यांना देण्यात आलेल्या मुदतवाढीस नविन मक्त्याची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच आयुक्त यांनी निर्देशत केले प्रमाणे मनपा जागेवर सि.स.नं.२१८३ (जुनी नगरपालिकेची जागा) व सि.स.नं.१९३७ (जुनी सानेगुरुजी रुग्णालयाची जागा) या जागांवर वाहनतळाची सुविधा पैसे भरा व वापरा या तत्वावर दोन वर्षा करीता वाहन तळ चालविणे कामी नविन निविदा प्रक्रिया राबविणे क्रमप्राप्त आहे त्या करीता प्रथमता प्रति वाहनाचे दर निश्चित करणे आवश्यक आहे. खालील तक्त्या प्रमाणे दर निश्चित करता येतील.

खालील तक्त्याप्रमाणे चार चाकी व दुचाकी वाहन तळ पार्कींग करीता वाहनधारक यांच्या कडुन वेळेनुसार रक्कम रुपये दर पत्रक प्रमाणे घेता येईल.

| दर पत्रक | | |
|---|---|---|
| वाहन तळावर चार चाकी व दोन चाकी वाहन लावण्या करीता वेळे नुसार दर पत्रक | | |
| कालावधी | चार चाकी वाहन रु. | दोन चाकी वाहन रु. |
| ० ते २ तासा करिता | २० | १० |
| २ ते ४ तासा करीता | ४० | १५ |
| ४ ते ६ तासा करीता | ६० | २० |

| | | |
|---|---|---|
| ६ ते ८ तासा करीता | ८० | २५ |
| ८ ते १२ तासा करीता | १०० | ३० |
| १२ ते २४ तासा करीता | १५० | ४० |

देकार रक्कम निश्चित करतांना खालील बाबींचा विचार करण्यात आला. वरील दरा नुसार वर्ष भरातील सरासरी दैनिक उपस्थिती व मेंटेनन्स चार्जेस इ.विचारात घेवून अंदाजीत देकार निश्चिती

| **जुनी नगरपालिका जागा** | | | **साने गुरुजी रुग्णालय जागा** | | |
|---|---|---|---|---|---|
| | चार चाकी वाहन संख्या | दुचाकी वाहन संख्या | | चार चाकी वाहन संख्या | दुचाकी वाहन संख्या |
| नगररचना विभागाकडुन प्राप्त १ दिवसा करीता वाहन क्षमता | ३८ | १५६ | नगररचना विभागाकडुन प्राप्त १ दिवसा करीता वाहन क्षमता | ५४ | १७२ |
| चार slot विचारात घेता वाहन क्षमता | १५२ | ६२४ | चार slot विचारात घेता वाहन क्षमता | २१६ | ६८८ |
| सरासरी वार्षीक वाहन उपस्थिती | ५५४८० | २२७७६० | सरासरी वार्षीक वाहन उपस्थिती | ७८८४० | २५११२० |
| सरासरी चार चाकी वाहन ५०% व दुचाकी वाहन ४०% वार्षीक उपस्थिती | २७७४० वाहन | ९११०४ वाहन | सरासरी चार चाकी वाहन ३०% व दुचाकी वाहन २०% वार्षीक उपस्थिती | २३६५२ | ५०२२४ |
| एकुण वार्षीक सरासरी उत्पन्न | २०X२७७४० = ५,५४,८००/- | १०X९११०४ = ९,११,०४०/- | एकुण वार्षीक सरासरी उत्पन्न | २०X२३६५२ =४,७३,०४०/- | १०X५०२२४ = ५,०२,२४०/- |
| चारचाकी व दुचाकी एकत्रीत रक्कम | रु.१४,६५,८४०/- | | चारचाकी व दुचाकी एकत्रीत रक्कम | रु.९,७५,२८०/- | |
| वार्षीक सरासरी मेंटेनंन्स व इतर खर्च | अंदाजीत रु.४,००,०००/- | | वार्षीक सरासरी मेंटेनंन्स व इतर खर्च | अंदाजीत रु.४,००,०००/- | |
| मेंटेनंन्स खर्च वगळता अंदाजीत देकार रक्कम एक वर्षा करीता | रु.१०,५०,०००/- | | मेंटेनंन्स खर्च वगळता अंदाजीत देकार रक्कम एक वर्षा करीता | रु.५,७५,०००/- | |

उक्त तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे दोन वाहन तळा करिता वाहन धारक यांच्याकडुन दर पत्रक प्रमाणे रक्कम रुपये वसुल करता येणार असल्याने जुनी नगरपालिका जागे वरील वाहन तळा करीता मेंटेनंन्स खर्च वगळता अंदाजीत रक्कम रु.१०,५०,०००/- व साने गुरुजी रुग्णालय जागा वाहन तळा करीता मेंटेनंन्स खर्च वगळता अंदाजीत रक्कम रु.५,७५,०००/- देकार निश्चित करणेस तसेच उक्त वाहन तळ बाबत दोन जागां करीता स्वतंत्र निविदा दोन वर्षा करीता प्रसिध्द करणेस व वरील प्रमाणे दर पत्रक निश्चित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६२ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र.१३ :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या २५ कोटी अनुदानातुन शिल्लक ५ कोटी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१४ मधील डि.मार्ट ते रामेश्वर कॉलनीतील आदित्य चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामी मक्तेदार अतुल विलास पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दरास व येणारा एकूण रक्कम रु.४८,४८,५७६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.कैलास सोनवणे :-** गोराणे साहेब, गोराणे साहेब, आहो गोराणे साहेब.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, बोलायचे आहे मला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आलेले जे सर्व प्रस्ताव आहे ना ते सगळे विकास कामांचे प्रस्ताव आहे. तर मला वाटतं, १३ ते २१ सर्व प्रस्ताव मान्य करण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** सदरील विषयाला माझ अनुमोदन आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, विषय क्र.१३ वर बोलु द्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** गोराणे साहेब, सभा चालवत असतांना सभा नियमाने चालली पाहिजे ही जबाबदारी तुमची सुध्दा आहे. कारण तुम्ही नगरसचिव आहे. ६ नंबरच्या विषयाच काय झाल ते सांगा पहिले. गोराणे तुमची जबाबदारी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बहुमताने पारित झाला आहे अप्पा.

**श्री.कैलास सोनवणे :-** घेतलं कसं बहुमत.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** बहुमत सिध्द करा ना. बहुमत सिध्द करा नितीन भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई, बघा नियम आपल्याला माझ्यापेक्षा जास्त तुम्हाला कळतात. विषय क्र.६ ज्या वेळेला बहुमताने मान्य करण्यात आला. त्यावेळेला कोणीही सदस्याने मतदानाची मागणी केली नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** सगळेच नगरसेवक त्यावेळेला इकडुन मागणी करत होते नितीनभाऊ की, मतदान घ्या, बहुमत आहे तर ते सिध्द करा. आणि नितीनभाऊ मी तुम्हाला विनंती करते की, तुम्ही भिष्माचार्याच्या भुमिकेतुन तुम्ही बाहेर निघा नितीन भाऊ. हे जे चाललेल आहे हे असच चालु देऊ नका. बहुमत आहे ना आपल्याकडे सिध्द करा ना अडचण काय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई कुठल्याही चुकीचा प्रकार जो आहे ना तो. या सभागृहात होणार नाही.याची मी तुम्हाला खात्री देतो ताई. अस कुठलच होणार नाही ना.म्हणजे कोणा सदस्याला अडचणीत याव असा हेतु कोणाचाच नाही. घ्या पुढील विषय घ्या गोराणे साहेब.

**श्री.राजेंद्र पाटील :-** विषय क्र.१३ वर बोलायचे आहे महापौर महोदया,

**श्री.नितीन लढ्ढा :-** बोला राजुभाऊ बोला,

**मा.महापौर :-** बोला राजेंद्र भाऊ. विषय क्र.१३ वर बोला.

**श्री.राजेंद्र पाटील :-** २५ कोटीतील जे ५ कोटी शिल्लक राहिले होते. त्या ५ कोटींची मुदतवाढ आपण जी मिळवुन आणली त्याबद्दल महापौर म्हणुन मी आपले अभिनंदन करतो. तसेच प्रशासनाचे सुध्दा अभिनंदन करतो. आणि खास करुन जळगांव शहराचे आमदार राजुमामा भोळे...

**मा.महापौर :-** राजेंद्र भाऊ आपला आवाज येत नाही. नेट प्रॉब्लम असेल आपला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मेहरुण वाल्यांचा आवाज कोणी दाबुच शकत नाही.

**श्री.सुरेश सोनवणे :-** जाऊ द्या हो भाऊ, महासभा घेतच नका जा, बोलुच देत नाही तुम्ही कोणाला तर .

**श्री.नितीन लढ्ढा :-** अरे सुरेशभाऊ तुम्ही तुमच्या मनाची व्यथा मांडु शकता माझ्याकडे केव्हाही. मला वाटते ताई आपण पुढचा विषय घ्यावा राजु भाऊंचे विचार आपण नंतरही ऐकुन घेवु.

